सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com






## प्रमुख संकल्प

1. **लाडक्या बहिणींना** दरमहा मिळणार **₹2,100**, म्हणजेच **वर्षाला ₹25,200**
2. शेतकऱ्यांना मिळणार **कर्जमाफी, शेतकरी सन्मान निधी 12,000 रुपयांवरुन 15,000** आणि **एमएसपीवर 20% भावांतर योजना**
3. प्रत्येक गरीबाचं स्वप्न पूर्ण होईल, **भाजपा अन्न सुरक्षा आणि हक्काचं घर देईल**
4. वृद्धांना मिळणारी **पेन्शन आता ₹1500 वरून वाढवून ₹2100** केली जाणार
5. महागाई पासून मिळेल दिलासा, **राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती राहणार स्थिर**
6. **10 लाख विद्यार्थ्यांना मिळणार ₹10,000** विद्यावेतन आणि **25 लाख रोजगार निर्मिती** करणार
7. महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाला मिळणार नवी दिशा **45,000 गावांत पांदण रस्त्यांची बांधणी** होणार
8. अंगणवाडी आणि आशा सेविकांना **₹15,000 वेतन आणि विमा संरक्षण**
9. **वीज बिलात 30% कपात** होणार , सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देणार
10. 2028 पर्यंत महाराष्ट्र बनणार **1 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था**
11. सरकार स्थापनेनंतर 100 दिवसांच्या आत **'व्हिजन महाराष्ट्र @2029'** सादर करण्यात येईल.
12. **मेक इन महाराष्ट्र** बनवेल राज्याला फिनटेक आणि **AI ची राजधानी** नागपूर, पुणे, नाशिक सारखी शहरे बनणार एयरोस्पेस हब
13. खतांवरील SGST कर मिळणार परत **सोयबिनला प्रति क्विंटल किमान ₹6000** भाव देणार
14. 2027 पर्यंत **50 लाख महिलांना लखपती दिदी बनविणार**. 500 बचत गटांचे एक क्लस्टर आणि अशा क्लस्टर्ससाठी 100 कोटींचा फिरता निधी देणार
15. अक्षय अन्न योजनेद्वारे कमी उत्पन्न गटातील **कुटुंबांना मिळणार मोफत अन्नधान्य**
16. महारथी आणि अटल टिंकरिंग लॅब्स योजनेतून सर्व शासकीय **शाळांमध्ये रोबोटिक्स आणि AI** चे प्रशिक्षणाची संधी होईल उपलब्ध
17. महाराष्ट्रात होणार **कौशल्य जनगणना उद्योगांच्या** गरजेनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करणार
18. प्रत्येक जिल्ह्यात **छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र** स्थापन करून घडवणार **10 लाख उद्योजक**
19. SC, ST, OBC आणि VJNT समाजातून उद्योजक घडवण्यासाठी **15 लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज**
20. OBC, SEBC, EWS आणि VJNT विद्यार्थ्यांना **शिक्षण आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती मिळणार**
21. युवकांसाठी **स्वामी विवेकानंद युवा स्वास्थ्य कार्ड** आणि वार्षिक आरोग्य तपासणी
22. महाराष्ट्राच्या **गौरवशाली किल्ल्यांचे संवर्धन** आणि ऐतिहासिक वारशाचे जतन
23. ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्य धोरण **आधार-सक्षम सेवा** तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये स्वतंत्र ओपीडी
24. **सक्तीच्या धर्मांतरणाविरोधात कायदा** करणार फसव्या धर्मांतराला आळा बसणार
25. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने **मानव-वन्यजीव संघर्ष टाळणार** तसेच वन्यप्राण्यांपासून होणारी जीवितहानी रोखणार

शिवसेना

**भाजप-महायुती आहे, तर गती आहे**

**महाराष्ट्राची प्रगती आहे**

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

**भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र**

**भाजप-महायुतीला मतदान करा आणि विजयी करा**

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020



नांदेड- निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वजीराबाद पोलिसांनी एकास अटक करून त्याच्याकडून १ लाख ३२ हजाराची घातक शस्त्र जप्त केली. यात ७२ तलवारी ९ खंजर, १५ भाल्यांचा समावेश आहे.

# मतदार जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनला जिल्हाधिकाऱ्याच्या हस्ते हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

मागच्या निवडणुकीमध्ये ज्या ठिकाणी कमी मतदान झाले आहे, त्याठिकाणी एलईडी व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येईल. यामुळे मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केले. आजपासून केंद्रीय संचार ब्युरो यांच्यामार्फत नांदेड विधानसभा मतदार संघातील गावामध्ये एलईडी व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येणार आहे. आज या एलईडी व्हॅनला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी परिसरात हिरवी झेंडी दाखविण्यात आली.



यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, केंद्रीय संचार ब्युरोचे सुमीत डोडल आदींची उपस्थिती होती.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होत आहे. सर्व मतदार संघातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे. यासाठी स्वीपअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. मतदारापर्यंत पोहोचवून जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय तसेच स्वीपचे नोडल अधिकारी यांच्यामार्फत विविध मतदार जनजागृती साठी कार्यक्रम सुरु आहेत.

मागील निवडणुकीमध्ये ज्या ठिकाणी मतदान कमी झाले आहे, त्याठिकाणी हे एलईडी वाहन जावून जनजागृती करेल. या वाहनामार्फत दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन मतदाराना आवाहन करणारे मतदानाचा संदेश देणे या वाहनाचा उद्देश आहे. या वाहनासोबत जिल्ह्यातील व राज्यातील मान्यवरांचे आवाहानात्मक संदेश प्रसारित होणार आहे. या वाहनाच्या वापरामुळे जिल्ह्यात नक्कीच मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होणार असून, चांगल्या प्रकारे जनजागृती होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल उद्या नांदेडमध्ये

**नांदेड**-नांदेड लोकसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल हे उद्या दिनांक १३ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे व्यापारी



वर्गाशी संवाद साधणार आहेत. हॉटेल विसावा पॅलेस येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आलेल्या व्यापारी वर्ग संवाद बैठकीसाठी लोकसभेचे भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ.संतुकराव हंबर्डे यांच्यासह भारतीय जनता पार्टी, महायुतीतील अनेक मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत समस्त व्यापारी, सीए, डॉक्टर्स, बिल्डर्स, उद्योजक यांच्यासह भाजपा व्यापारी आघाडी महानगर नांदेडच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांशी केंद्रीय मंत्री पियूष गोयल संवाद साधणार आहेत.आयोजित व्यापारी वर्ग संवाद बैठकीला व्यापारी संघटनांचे पदाधिकारी व व्यापारी बांधवांनी उपस्थित आवर्जुन राहावे असे आवाहन भाजपा व्यापारी आघाडी महानगर अध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी यांनी केले आहे.

### लोकविधान पोर्टलचा वापर करावा: डॉ. सचिन खल्लाळ

**नांदेड**-विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व १६ लोकसभा पोटनिवडणूकीसाठी २० नोहेंबर रोजी मतदान होत आहे. निवडणूक प्रक्रियेतील सर्व बाबींची माहिती देण्यासाठी निवडणूक निरीक्षक सामान्य पत्लवी आकृती यांच्या मार्गदर्शनानुसार ८७ नांदेड दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खत्लाळ यांनी लोकविधान पोर्टल निर्माण केले आहे. या पोर्टल ची लिंक lokvidhaan.blogspot.com ही असून यात मतदान अधिकारी यांचे संपूर्ण कर्तव्य , ईव्हीएम मशीन हाताळणी प्रात्यक्षिक , मतदान यंत्र सिलींग , अभिरूप मतदान , विविध घोषणा पत्रे आदीचे सविस्तर विश्लेशन लोक विधान पोर्टल मध्ये करण्यात आले आहे. निवडणूक कर्तव्या वरील सर्व मतदानअधिकारी / कर्मचारी यांनी या पोर्टल चा वापर करून निवडणूक कार्य निर्भयपणे पार पाडावे असे आवाहन नांदेड दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.

### यशवंतराव नेत्रगावकर गुरुजी यांचे निधन

**उमरी**-उमरी तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षक यशवंतराव झेटीगंराव नेत्रगावकर यांचे निधन दि १० नोव्हेबर २०२४ रोजी



रविवारी ९ः २५ वाजता वृद्धपकाळाने निधन झाले आहे . मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्ष होते. त्यांचा अंत्यविधी दि ११ नोव्हेंबर रोजी सोमवारी दुपारी ४ वाजता त्यांच्या शेती चिंचाळा (प .उमरी ) येथे करण्यात आला आहे . त्यांच्या पश्चयात पत्नी, चार मुले, एक मुलगी नातंवड असा मोठा परिवार आहे. डॉ सुनिल नेत्रगावकर, शिक्षक अनिल नेत्रगावकर, मेडिकल शॉप राहूल नेत्रगावकर, विशाल नेत्रगावकर, स्वाती नेत्रगावकर यांच्या त्या वडिल होत.

# डॉ.संतुक हंबर्डे यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प बैठक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

जो हिन्दु हित की बात करेगा वही देश पर राज करेगा...जय श्री राम च्या घोषणा देत राजस्थानी समाज मंचच्या वतीने रामदेवबाबा जयंती निमित्त जम्मा जागरण मध्ये नांदेड लोकसभेचे भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या विजयासाठी विजयी संकल्प बैठक अत्यंत उत्साहात पार पाडली. यावेळी नांदेड दक्षिण चे उमेदवार आनंदराव बोंढारकर, नांदेड लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे, प्रदेश सदस्य ॲड. चैतन्य बापु देशमुख, अभिषेक सौदे, दिलीपसिंघ सोडी, शंकरमामा जाधव, राम लुटे, अशुतोष धर्माधिकारी बरबडेकर, बजरंगसिंह ठाकूर, बालाजी पा. शेळगांवकर,



अकेश हंबर्डे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखंड हिन्दुस्थानची अस्मिता आमचे दैवत प्रभु श्रीरामचंद्र यांचे मंदिर आयोध्येत उभारण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जन्म घ्यावा लागला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल ७० वर्ष कॉंग्रेस ने राम मंदिराचा मुद्दा जाणीवपुर्वक भिजत ठेवला होता. विशिष्ठ लोकांचा लाड पुरवण्यासाठी कॉंग्रेसने १०० कोटी हिन्दु बांधवांच्या भावनांशी खेळ खेळला परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अवघ्या कांही महिन्यातच आयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे मंदिर उभारूण प्राणप्रतिष्ठापना केली. खऱ्या अर्थाने आधुनिक हिन्दु धर्मरक्षक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख करावा लागतो. मोदी यांना शह देण्यासाठी, अखंड हिन्दुस्थानला तडे देण्यासाठी कॉंग्रस पाकिस्थानची भाषा बोलत आहे. कश्मीरमध्ये पुन्हा ३७० लागु करण्याची भाषा करत आहे. याचा अर्थ कॉंग्रेसला त्या देशातील १०० कोटी हिन्दु बांधवांची, अखंड हिन्दुस्थानची चिंता नाही त्यामुळे हिन्दु धर्मावर कोणतेही संकट येवू नये असे वाटत असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात अधिक बळकट करावे लागतील यासाठी होत असलेल्या नांदेड लोकसभेच्या निवडणूकीत कमळ या निशानी वरील बटन दाबून डॉ. संतुकराव हंबर्डे यांना लोकसभेत खासदार म्हणून जाण्यासाठी आशिर्वाद द्या असे भावनीक आवाहन डॉ. हंबर्डे यांनी केले.

जम्मा जागरणात लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे आणि नांदेड दक्षिण शिवसेनेचे उमेदवार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांचा राजस्थानी समाज मंचच्या वतीने स्वागत करण्यात आले. दरम्यान डॉ. हंबर्डे आणि बोंढारकर यांनी विश्व हिन्दु परिषद, बजरंग दल यांच्या कार्यसेवकांनी संयुक्तरित्या आयोजित बलीदान दिनाच्या रक्तदान शिबीरास भेट दिली. कारसेवकांशी संवाद साधला. याच वेळी भोई समाज बांधवांचीही बैठक पार पडली. भोई समाज बांधवांच्या समस्या सोडवीण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करू असा विश्वास डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी दिला. तर आ. हेमंत पाटील यांच्या उपस्थितीत जुना मोंढा येथे मंडप डेकोरेशन असोशिएशनची बैठक पार पडली.

## जेष्ठ मतदाराचे आज गृहमतदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

मतदानाचा टक्का वाढावा तसेच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत राज्य निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांच्या सूचनेनुसार एक ही मतदार मतदाना पासून वंचित राहू नये यासाठी ८५ वर्ष वयाच्या वरील मतदारांच्या घरी जाऊन आज मतदान करून घेतले.

# विकास कामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही : श्रीजया चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ११ नोव्हेंबर**

भोकर विधानसभा मतदारसंघात महायुती भाजपाचे अधिकृत उमेदवार अँड श्रीजया अशोकराव चव्हाण यांचा प्रचार जोरदार होत असून विशेष करून ग्रामिण भागातील महिलांशी संपर्क वाढला असल्यामुळे महिलांमध्ये पहिली पसंती म्हणून श्रीजया चव्हाण ह्याच दिसत आहेत. या भागातील महिलांच्या समस्या व अडिअडचणी जाणुन घेत आहेत दि. १० नोव्हेंबर रोजी मुदखेड तालुक्यातील माळकोठा, उमाटवाडी, डोंणगाव, येथे छोट्या खानी बैठकी घेण्यात आल्या या बैठकीत सांगीतले कि निवडणूकीच्या आचारसंहीता



संपन्न होताच भोकर मतदार संघातील महिलांच्या प्रलंबित प्रश्नाकडे विशेष लक्ष देवुन प्रश्न तात्काळ मार्गी लावणार असल्याचे विश्वास उमेदवार श्रीजया चव्हाण यांनी उपस्थित महिलांना मागदर्शन करताना म्हणाले. पुढे बोलताना म्हणाले कि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी या मतदारसंघात भरपुर विकास कामे केली आहेत आणि यापुढेही या मादारसंघासाठी नीधी कमी पडू देणार नाहीत. खा. अशोक चव्हाण यांनी मुदखेड तालुक्यातील ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष दिलं आहे. तसेच मी पण या भागाकडे विशेष लक्ष देणार येणाऱ्या दि. २० नोव्हेंबर रोजी तुम्ही मला मतदानरूपी आशिर्वाद द्या या भागात विकास कामासाठी नीधीची कमतरता भासु देणार नाही असे श्रीजया चव्हाण यांनी छोट्या खाणी बैठकीत असलेल्या महिलांना संबोधित केले. यावेळी डॉ माणिक जाधव, मारोती जाधव, विठ्ठल जाधव, शिवाजी पा. जाधव, भीमराव पाटील कल्याणे, मारोती किरकन, शहाजी जाधव, रामजी शिंदे, बालाजी शिंदे, यांच्यासह कौशल्याताई जाधव, दैवशाला शिंदे, भाग्यश्री जाधव, कलावतीबाई शिंदे, सुनीता कपाटे, शोभाबाई कल्याणे, सयाबाई हंबर्डे, निलाबाई कुरे, इंदुबाई गाडे, पार्वतीबाई पांचाळ, सारजाबाई जाधव, यासह आदिंची उपस्थीती होती.

## संविधानाने हक्काची व जगण्याची जाणीव करून दिली: अंजलीताई आंबेडकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून आम्हाला हक्काची जगण्याची जाणीव करून दिली. या बाबींची जाणीव ठेवून आपल्या हक्काच्या वंचित बहुजन आघाडी दक्षिणचे उमेदवार फारुख अहमद व लोकसभेचे अविनाश भोसीकर यांना बहुमताने विजय करण्याचे आवाहन अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी दिनांक १० डिसेंबर रोजी राहुल नगर येथे प्रचार सभेत केले. आगामी विधानसभा व लोकसभा पोट निवडणुकीचे प्रचार बाजी रंगली असून वंचित बहुजन आघाडीचे नांदेड दक्षिण विधानसभा मतदासंघाचे अधिकृत उमेदवार फारुख अहमद व लोकसभेचे उमेदवार अविनाश भोसेकर यांच्या प्रचारार्थ दिनांक १० डिसेंबर रोजी सायंकाळी ६



वाजता झालेल्या सभेस मतदारांना संबोधित करताना अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रस्थापितांना मुजोरी हुकूमशाही चालू देणार नाही यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला संविधानाच्या माध्यमातून आमच्या हक्काची जाणीव करून दिली आहे तेव्हा येथील प्रस्थापितांची संपूर्ण जातीवादी व्यवस्था जुगारून लावण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या दोन्ही उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी राहुल नगर वाघाळा येथे झालेल्या प्रचार सभेत केले.

# नांदेड जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महायुतीला साथ द्या : कुंटुरकर

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ११ नोव्हेंबर**

मराठवाड्यातील रजाकरी राजवटीत सर्वाधिक झळा पोहोचलेला जिल्हा म्हणून आपण नांदेड जिल्ह्याकडे पाहता. रजाकारी राजवटीतून आपण स्वतंत्र झालो. स्वतंत्र भारतात मराठवाडा विलीन झाला. त्यानंतर आपल्या विकासाची गंगा सुसाट वाहिल असे वाटले होते. परंतु दुर्दैवाने मराठवाड्याच्या मानगुटीवर कॉंग्रेसचे भूत बसले आणि नांदेड सह मराठवाड्याचा विकास खुंटला. नांदेड जिल्ह्याची झालेली वाताहत कॉंग्रेसमुळे झाली आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल, मोदीजींच्या विकसित भारतात आपल्याला नांदेड जिल्ह्याचा विकास बघायचा असेल तर होऊ घातलेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य राजेश कुंटूरकर यांनी केले.

नांदेड लोकसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे , नायगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपा चे उमेदवार आ. राजेश पवार यांच्या संयुक्त प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या धर्माबाद तालुक्यातील करखेली येथील बैठकीत ते बोलत होते . यावेळी लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे, नायगाव विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार तथा आ. राजेश पवार, ॲड. चैतन्य बापू देशमुख, व्यंकटेश जिंदम, दत्ताहरी चोळंबेकर, देविदास पाटील, दत्तराम पाटील, सचिन साठे, माणिकराव लोहगावे, दीपक पाटील सोळंके, श्रीराम पाटील जगदंबे, मोहित शेठ, देविदास पाटील, दत्ताजी पाटील,



गिरी महाराज, नागनाथ जिंकले, किशन दादा कुदळेकर , विठ्ठल पाटील चोळंबेकर, विजय पाटील डांगे, कुलकर्णी, हनुमंत जगदंबे, निवृत्त पोलीस निरीक्षक संभाजी उमरे, तालुका अध्यक्ष कृष्णा सर्जे , धनंजय सलगरे, विजय पाटील डांगे, सुधाकर पाटील कदम, दत्ता हरी पाटील चिकणेकर, गुलाबराव पाटील मोरे , संतोष पाटील मोरे, चंद्रकांत पाटील पांगरीकर, कुलकर्णी सर, व्यंकट येडपलवार, श्याम जाधव, मनीष शिंदे, गणेश लोलापूर ,अंकुश नरवाडे , चंद्रकांत कदम, शंकरमामा जाधव, आनंद लोणे, आशुतोष धर्माधिकारी बरबडेकर, राम लुटे, रामकिशन एगलोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. करखेली, येताळा आदी ठिकाणी भाजपाच्या प्रचार बैठका पार पडल्या.

या बैठकीत पुढे बोलताना राजेश कुंटूरकर म्हणाले की, राज्यात आणि केंद्रात भाजपा महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे या सरकारमध्ये सहभागी असलेल्या आमदार आणि खासदारांच्या मतदारसंघाचा जो विकास होतो आहे तो विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. कारण वाडपी आपला असला की आपण कोणत्याही कोणट्यात जेवायला बसलो तरी आपल्याला पोटभर मिळते. या नुसार नायगाव विधानसभा मतदारसंघात भाजपाचे आ. राजेश पवार यांनी निधी खेचून आणला त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात विकास कामे होऊ शकली. परंतु नांदेड लोकसभेचा खासदार आपला नसल्यामुळे जिल्ह्यात विकासाची कामे होऊ शकली नाहीत. त्यामुळे आता विकासाची कामे हवी असतील तर विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुकीला सर्वाधिक मताधिक्य भाजपला मिळवून देण्याची जबाबदारी आता कार्यकर्त्यांची आहे. नांदेड लोकसभा चा खासदार म्हणून डॉ. संततुकराव हंबर्डे हे कोणत्याही परिस्थितीत निवडून आले पाहिजेत. कारण डॉ. संतुकराव हंबर्डे हे जर निवडून आले तर आपल्या भागातील प्रत्येक माणूस हा खासदार झाल्यासारखे आपल्याला वाटेल. सर्वसामान्य माणसासोबत राहणारा, सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून गेल्या वीस वर्षापासून संतुकराव हंबर्डे सामाजिक राजकारणात काम करत आहेत. नांदेड लोकसभेवर कमळ फुलल्यानंतर निश्चितपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या जिल्ह्याच्या उन्नतीसाठी आणि भरभराटीसाठी भरीव असा निधी देतील. त्यासाठी गरज आहे आपल्या हक्काचा माणूस संसदेत जाऊन तिथून आपल्यासाठी निधी खेचून आणणारा. त्यामुळे येत्या २० तारखेला मनात कोणतेही किंतु परंतु न ठेवता मराठवाडा मुक्ती संग्रामाप्रमाणे आता मराठवाड्यातून कॉंग्रेसलाही मुक्ती देऊन टाका. तरच आपल्या विकासाचा मार्ग महायुतीचे सरकार अत्यंत दणकटपणे आणि प्रभावीपणे राबवू शकेल असेही ते म्हणाले.

# चिमुकल्यांची पथनाट्याद्वारे जवळ्यात मतदान जागृती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतदान होण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विविध शाळा महाविद्यालयांतून तसेच स्विपद्वारे मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या कामी जवळा दे. येथील काही विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन पथनाट्याचे उत्तम सादरीकरण केले. घरातच बसता का गं तुम्ही, मतदान करु या साऱ्या जणी...बाई बाहेर ये गे मत देऊन ये अशा प्रकारे गीतांच्या माध्यमातून पथनाट्याद्वारे जवळ्यात मतदानजागृती करण्यात आले. चिमुकल्यानी पथनाट्याद्वारे गावकऱ्यांचे लक्ष वेधले. लेखक गंगाधर ढवळे यांनी



लिहिलेल्या पटकथेवरुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळा दे. येथील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संतोष घटकार, हैदर शेख यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण मतदारसंघातील जवळा देशमुख ता मतदान केंद्रांतर्गत मतदान जनजागृतीसाठी शाळेतील शिक्षक, केंद्रप्रमुख तसेच विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. या पथनाट्याद्वारे मुलींनी गावातील सर्व महिलांना तसेच पुरुष मतदारांचे लक्ष वेधून मतदान करण्याबाबत आवाहन केले. दीपावली सुट्टी असतांनाही शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहशिक्षक संतोष घटकार तसेच केंद्रप्रमुख संतोष अंबुलगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली काही विद्यार्थ्यांनीनी पुढाकार घेत गावातील ठीक ठिकाणी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात मी मतदान करणारच! अशा टोप्या घातलेल्या ज्ञानवी पांचाळ, अपेक्षा गोडबोले, मोनिका गोडबोले, ज्ञानेश्वरी शिखरे, शिवानी शिखरे, आकांक्षा गोडबोले, आर्या गच्चे, श्रुती गच्चे आदी विद्यार्थ्यांनीनी मतदान जनजागृतीत सहभाग घेतला होता.

## मुस्लिम समाजाचा कोणत्याच उमेदवाराला पाठिंबा नाही

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ११ नोव्हेंबर**

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाचे उमेदवार हे आपणच श्रेष्ठ कसे व मतदार संघात कोणते विकास कार्य केलेले आहे व पुढे काय करायचे आहेत हे सांगण्यात व्यस्त आहेत. याच पार्श्वभूमीवर आज शिवपार्वती भोजनालय येथे शेख अहमद यांनी पत्रकार परिषद आयोजन करण्यात आले असून त्यात मुस्लिम समाज हे सध्या तरी कोणत्याच पक्षाच्या उमेदवारास पाठिंबा दिला नसल्याचे आपले मत व्यक्त केले.

पुढे बोलताना शेख अहेमद म्हणाले की, सध्या कोणीही मुस्लिम धर्मगुरू हे अमुक पक्षाला आमचा संपूर्ण पाठिंबा असल्याचे बोलत असून आमचा समाज सध्या तरी तटस्थ भूमिकेत असून कोणत्याही पक्षाच्या उमेदवारास पाठिंबा नाही. प्रत्येक नागरिकास संविधानाने हक्क दिला असून तुमचे व्यक्तिगत मत तुम्ही समाजावर लादू शकत नाही व ते समाज कदापि सहन करणार नाही असा घणघणात आरोप या वेळेस यांनी केला असून संपूर्ण समाज कोणा एकासाठी मक्तेदारी नसून ज्याचा त्याला हक्क आहे असेही शेवटी म्हणाले. या पत्रकार परिषदेत सय्यद अमीर अली, जाविद चाऊस यांच्यासह मुस्लिम समाजाचे नागरिक उपस्थित होते.


Format C-7

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other Individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party: Independent**
**Name of the Election: Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of State/UT: Maharashtra**
**(1) Name of the Constituency: 85-Bhokar**
**Name of the candidate: Jakir Sagir Shaikh**

| Sr. No. | | | |
|---|---|---|---|
| | | **Criminal antecedents** | 1. FIR No. 320/2021 punishable U/s 501 of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS Vazirabad. |
| 1 | a | Nature of Offence | 2. FIR No. 422/2021 punishable U/s 354 A (4), 501 of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS Vazirabad. |
| | b | Case No. | 1. S.C.C. No. 717/2022<br>2. R.C.C. No. 409/2022 |
| | c | Name of Court | 1. Hon'ble J.M.F.C. Nanded.<br>2. Hon'ble C.J.M. Nanded. |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1. No<br>2. No |
| | e | Date of Conviction, if any | NIL |
| | f | Details of Punishment undergone, if any | NIL |
| | g | Any other information required to be given | Both the cases are still under consideration before Hon'ble Court |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is a Social Worker and running member of NP Ardhapur, he had registered various crimes against corruption and saved the huge money of Government due to this work he has been awarded as Maharashtra Bhushan Award |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is contesting this election as independent candidate |

(2) Name of the Constituency: 85-Bhokar
Name of the Candidate: **JAKIR SAGIR SHAIKKKH**....and so on
* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency

**Jakir Sagir Shaikh**
R/o Barkatpura, Ardhapur, Nanded.

**Date: 08/11/2024**
**Place: Bhokar**

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मी एकमेव मुख्यमंत्री ज्याचं मुंबईत घर नाही, मी कधीही स्वत:चं घर भरण्याचा विचार केला नाही : फडणवीस

मुंबई : महाराष्ट्रातील आजवरच्या २० मुख्यमंत्र्यांपैकी मी एकटा मुख्यमंत्री आहे, ज्याचं मुंबईत स्वतःचे घर नाही. देवेंद्र फडणवीसने कधीही आपलं घर भरण्याचा विचार केला नाही. कधीही स्वतःचे उद्योग, व्यवसाय, शिक्षण संस्था उभारल्या नाहीत. माझे घर आजही नागपूर मध्येच आहे. असे म्हणत नागपूर दक्षिण पश्चिम या स्वतःच्या मतदारसंघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मतदारांना भावनिक साद घातली आहे. दक्षिण पश्चिम नागपूरच्या प्रचार सभेत काल (रविवारी) रात्री उशिरा त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

तुम्ही ५ वेळा सातत्याने आमदार म्हणून निवडून दिले. कधी विरोधी पक्षात काम केलं, तर कधी मुख्यमंत्री म्हणून काम केलं, विरोधी पक्षनेता म्हणून काम केलं, उपमुख्यमंत्री म्हणून ही काम केलं, मात्र मी महाराष्ट्रमध्ये या सर्व कारकिर्दीत आपल्या सर्वांची दक्षिण पश्चिम नागपूरच्या मतदारांची मान उंच ठेवली. कधीही तुम्हाला खाली पाहायला लावलं नाही. जो आमदार तुम्ही निवडून दिला त्या आमदाराने तुमचं नाव संपूर्ण महाराष्ट्रात नंबर १ वर आणून दाखवले, हे मी गर्वाने बोलू शकतो.

२५ वर्ष झाली विधानसभेत काम करतो आहे, त्याच्याआधी नगरसेवक आणि महापौर ही राहिलो आहे. मात्र मी माझ्या या राजकीय वाटचालीत नेहमी समाजासाठी काम करण्याचा तत्व ठेवलं. स्वतःचा विचार मी कधीच केला नाही. देवेंद्र फडणवीसने कधीही आपलं घर भरण्याचा विचार केला नाही. कधीही स्वतः चा उद्योग किंवा शिक्षण संस्था उभी केली नाही. मेडिकल कॉलेज उभारले नाही. स्वतःचा व्यवसाय उभा केला नाही. फक्त तुमच्यासाठी काम केलं. म्हणून महाराष्ट्रात आजवर २० मुख्यमंत्री झाले, या २० मुख्यमंत्र्यांपैकी मी एकटा मुख्यमंत्री आहे, ज्याचं मुंबईत स्वतःचे घर नाही. आजही माझं घर नागपूर मध्येच आहे आणि मला नागपूरकर असल्याचा पूर्णपणे गर्व आहे. असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आज फडणवीसांची मालवणीत सभा

सोमवारी देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील मालवण परिसरात सभा होणार आहे. याठिकाणी भाजपचे विनोद शेलार निवडणुकीच्या रिंगणात असून हा परिसर मुस्लीमबहुल आहे. आज रात्री ९ वाजता राजे शहाजी मैदानावर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. फडणवीसांची सभा लोखंडवालामध्ये वर्सोवा आणि गोरेगाव विधानसभेसाठी रात्री ८ वाजता होणार आहे. त्यामुळे मालाड पश्चिम मतदारसंघात देवेंद्र फडणवीस काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. भाजपकडून मालाड मालवणीत रोहिंग्या आणि बांग्लादेशींच्या घुसखोरीवर सातत्याने टीका केली जाते. धर्मांतर कायद्यासंदर्भात घोषणेनंतर मालाडमध्ये फडणवीसांच्या सभेकडे सर्वांचेच लक्ष लागलंय. 'बटेंगे कटेंगे'वर फडणवीस पुन्हा बोलणार का?, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## काँग्रेसकडून २८ बंडखोरांची हकालपट्टी; सहा वर्षासाठी निलंबन



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.११ नोव्हेंबर: विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने महाविकास आघाडी धर्म पाळत बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. विविध मतदासंघांत बंडखोरी करणाऱ्या २८ उमेदवारांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सूचनेनुसार त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित केले आहे.

हाकालपट्टी करण्यात आल्याची नावे अशी: आनंदराव गेडाम, शिलु चिमूरकर, सोनल कोवे, भरत येरमे, अभिलाषा गावतूरे, राजु झोडे, प्रेमसागर गणवीर, अजय लांजेवार, विलास रघुनाथ पाटील, आसमा जव्वाद चिखलेकर, हंसकुमार पांडे, कमल व्यवहारे, मोहनराव दांडेकर, मंगल विलास भूजबळ, मनोज शिंदे, सुरेश पाटीलखेडे, विजय खडसे, शबीर खान, अविनाश लाड, याज्ञवल्क्य जिचकार, राजेंद्र मुळक, शामकांत सनेर, राजेंद्र ठाकूर, आबा बागुल, मनिष आनंद, सुरेशकुमार जेथलीया, कल्याण बोराडे, चंद्रपाल चौकसे.

## भाजपाचे संकल्पपत्र ही २०२९ पर्यंत राज्याच्या वेगवान विकासाची हमी : पीयूष गोयल



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.११ :भारतीय जनता पार्टीचे संकल्पपत्र हे २०२९ पर्यंत राज्य विकासाची व्यापक दृष्टी आणि त्या दिशेने वेगाने कृती करण्याची खात्री देणारे आहे. महायुती सरकार कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांच्या विकासासाठी कार्यरत आहे. राज्यातील जनतेचे जीवन उज्वल आणि सुकर व्हावे यासाठी महायुती सरकार काम करत आहे. विकसित महाराष्ट्रासाठी महाराष्ट्रात पुन्हा महायुती सरकारच हवे ,असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केले.

ते म्हणाले,' जनतेच्या मनात कायम भ्रम निर्माण करून आपले राजकीय हित साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या महाविनाश आघाडीचा पराभव निश्चित आहे . जनता आघाडीला धडा शिकवेल,केंद्रातील एनडीए सरकारच्या साथीने महायुती सरकार तिप्पट वेगाने प्रगती करून तिप्पट परिणाम साध्य करत आहे. मोदी यांच्या सरकारने देशाला नव्या उर्जेसोबत विकासाचे नवे पंखही दिले आहेत. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत केंद्र आणि राज्यातील सरकारच्या जनकल्याणाच्या योजनांचे लाभ पोहोचवण्यासाठी आमचे सरकार तत्पर आहे. तर दिलेले कोणतेही आश्वासन न पाळणाऱ्या महाविनाश आघाडीने दिलेल्या वचनांवर जनतेचा आता काडीमात्र ही विश्वास नाही. काँग्रेसने त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमधील शेतकरी, युवावर्गाची दिशाभूल करून एकाही आश्वासनाची पूर्तता न करता निव्वळ फसवणूक केली आहे याची ही आठवण त्यांनी करून दिली.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपायी बाळासाहेब ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या विचारांना मूठमाती दिली असून त्यांनी राहुल गांधी यांच्याकडून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल दोन वाक्ये वदवून घ्यावीत. ते त्यांना अजिबात जमणार नाही. त्यामुळे महाभकास आघाडीत त्यांचे काहीच चालत नाही, हेही स्पष्ट झाल्याचे गोयल यांनी सांगितले. देशातील १४० कोटी जनतेच्या एकत्रित विकासाची चिंता केली तरच हा देश सुरक्षित राहील, अशी नरेंद्र मोदी यांची धारणा आहे. धर्म, जात, भाषा आणि प्रांतानुसार होणारी वाटणी आम्हाला मान्य नाही. आम्ही सर्वांनाच एकत्र घेऊन वाटचाल करत असल्याने आम्हाला सर्वांचीच साथ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# महाविकास आघाडीच्या पोटात दूखतय : पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**

**भोकर,दि. ११ नोव्हेंबर**

भोकर(प्रतिनिधी)पंतप्रधान मोदी यांना गरीबीची जाण आहे यामुळे त्यांनी विविध योजना राबविल्या. राज्यात हि लाडकी बहीण योजना आली. या योजनेमुळे आघाडी च्या पोटात दुखत असून काँग्रेस ला गरीबी माहीत नाही असे प्रतिपादन आ. पंकजा मुंडे यांनी भोकर येथील भाजप महायुतीच्या प्रचार सभेत केले

मोंढा मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात आ. बाबुसिंग महाराज राठोड, आ. रामराव पाटील पवार, सचिन साठे, नेहा बग्गा, विक्रांत सिंह, मंगाराणी अंबुलगेकर, लोकसभेचे उमेदवार संतुकराव हंबर्डे, विधानसभेचे उमेदवार श्रीजया चव्हाण, अमर राजूरकर, भगवान दंडवे,संतोष पांडागळे, प्रविण गायकवाड, मारोती कवळे, दिवाकर रेड्डी,विनोद चिंचाळकर, यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या



कै. शंकरराव चव्हाण यांनी पक्षाची बंधने झुगारून कै. गोपीनाथ मुंडे ला सहकार्य केले. राजकारणात असा मोठेपणा आता दिसत नाही. पंतप्रधान मोदी यांनी महिलांचे सक्षमीकरण केले २०१४ ला महिलांचे बँकेत खाते काढल्यामुळे आज लाडक्या बहिणीचे पैसे खात्यावर जमा होत आहेत. तुम्ही मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी आहात. आज सरकार तुमच्या पाठीशी आहे आता तुम्ही युतीचे पाठिराखे व्हा. चुकीच्या प्रचाराला बळी न पडता भाजपाचे उमेदवार संतुकराव हंबर्डे व श्रीजया चव्हाण यांना निवडून द्या. मी २००९ पासून भाजपाची स्टार प्रचारक आहे. महायुती चे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी जे योगदान देता येईल ते देत आहे. संविधान बाबत महाआघाडी करून अपप्रचार करण्यात येत आहे. पण मागील दहा वर्षात मोदींनी संविधान बदले नाही ना कोणाच्या केसाला धक्का दिला नाही. या वेळी आ. बाबुसिंग महाराज राठोड, आ. रामराव पाटील पवार, सचिन साठे, संतुकराव हंबर्डे, श्रीजया चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

# सिडकोतील लिज होल्ड घरे फ्री होल्ड करण्याची ऐतिहासिक घोषणा

### महायुती सरकार नागरिकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध : अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर : महायुती सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत, सिडकोतील लिज होल्ड घरे फ्री होल्ड करण्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे. यामुळे येथील रहिवाशांना मालकी हक्काची सुविधा मिळणार असून, त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याला बळकटी मिळणार आहे. महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी नागरिकांशी संवाद साधत महायुती सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

एन ५ वार्ड क्रमांक ६४ येथील गुलमोहर कॉलनीत पदयात्रा काढून मतदारांशी संवाद साधताना श्री. सावे यांनी विकासाच्या उद्दिष्टांचा आढावा घेतला. महायुती सरकारने राबवलेले विविध विकासप्रकल्प, इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सुविधांवर दिलेले लक्ष याबद्दल त्यांनी मतदारांना माहिती दिली. महायुती सरकार नागरिकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध आहे, असे सांगत श्री. सावे यांनी मतदारांना महायुतीला मतदान करून स्थिर आणि प्रगतीशील सरकारला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

त्यांनी प्रखर हिंदुत्व आणि सर्वसमावेशक विकास हे महायुतीचे प्रमुख ध्येय सांगितले आणि मतदारांनी या उद्दिष्टाला साध्य करण्यासाठी आपला आधार देण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी अभिजीत देशमुख, प्रशांत देसरडा, शिवाजी दांडगे, रेखा जैस्वाल, अशोक विरकर, अरविंद मोदी, जनार्दन अमृतकर, महेश बुराडे, निलेश सुरासे, उदय काळे, रवी एडके, राहूल गाडीवान, तेजस व्यवहारे, बद्री ठोंबरे, सरिता घोडतुरे, लुंगारे ताई, शुभाष लोखंडे, दिगंबर खरात, दत्ता भांगे, नागेश भालेराव, आकाश राऊत, ज्ञानेश्वर शेळके, नितीन खरात, महेश राऊत, गणेश तेलोरे, शुभम पवार, अरविंद कामटीकर, मिलिंद घुसले, दशरथ मानवतकर, सागर भारती, शारुख पटेल, पावन धीरगावकर, यादव राव सूर्यवंशी,नितीन चित्ते, गणेश नावंदर, अरुण पालवे, राज गौरव वानखेडे, रामेश्वर भादवे, मुकेश जैन, सागर पाले,लक्ष्मी गायकवाड, विद्या गायकवाड, पांडे ताई, अरोरा ताई, नलिनी कुलकर्णी, विक्रम पवार, राहूल खरात, चरणसिंग पाटील,अनिल शिसोदे, अनुपमा भोंडवे, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

# मुंबई विमानतळावर २.६७ कोटींचे सोने जप्त

### तस्करीत दोन कर्मचाऱ्यांना अटक

मुंबई: महसूल गुप्तचर संचालनालयाने शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर कारवाई करत सुमारे २.६७ कोटी रुपयांचे साडेतीन किलो सोने जप्त केले. अबुधाबीहून सोन्याची तस्करी करण्याचा प्रयत्न केला जात होता. यात विमानतळावर काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. डीआरआयला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, अबुधाबीहून येणाऱ्या विमानातून हे सोने आणले जाणार होते. त्याप्रमाणे डीआरआयने विमानतळावर सापळा रचला आणि ग्राहक सेवा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या एका महिला कर्मचाऱ्यास ताब्यात घेतले. तिच्याकडून झडती घेतल्यावर ३,३५० ग्रॅम सोन्याची पेस्ट आढळली. तिच्या चौकशीतून ग्राउंड स्टाफ सदस्याचाही यात सहभाग असल्याचे उघड झाले. या दोघांनी सोने विमानातील कर्मचऱ्याच्या कंटेनरमधून बाहेर काढून तस्करीचा प्रयत्न केला होता. डीआरआयच्या माहितीनुसार, महिला कर्मचाऱ्याला सोने पुढे सुपूर्द करण्यासाठी एक व्यक्ती येणार होता. मात्र, त्या आधीच डीआरआयने दोन्ही कर्मचाऱ्यांना अटक केली. सेलेबी एनएएस एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि.च्या ग्राउंड हँडलिंग स्टाफ सदस्यासह या महिला कर्मचाऱ्याचा या कारवाईत सहभाग आढळला आहे. डीआरआयने जप्त केलेल्या सोन्याची किंमत सुमारे दोन कोटी ६७ लाख रुपये आहे. पुढील तपास सुरू असून या प्रकरणातील तस्करीचे विस्तृत जाळे शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## 'बटेंगे तो कटेंगे', 'एक हैं तो सेफ हैं' सारख्या घोषणांवर निवडणूक आयोग कारवाई का करत नाही? : अशोक गेहलोत

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ११ नोव्हेंबर.

भारतीय जनता पक्षाने विरोधी पक्षांची सरकारे घोडेबाजार करून पाडली हा देशाच्या इतिहासातील काळा अध्याय आहे. महाविकास आघाडीचे सरकार भाजपाने चोरले,त्याचा बदला घेण्याची वेळ आता आली असून भाजपाला विधानसभेच्या निवडणुकीत धडा शिकवून घरी बसवा व मविआचे सरकार विजयी करा,असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केले आहे.

पत्रकारांशी बोलताना त्यांनी बटेंगे तो कटिंग एक है तो सेफ है यासारख्या घोषणाकडे निवडणूक आयोग कारवाई का करत नाही असा सवाल ही उपस्थित केला. ते म्हणाले,'मध्य प्रदेश, कर्नाटक, गोवा, महाराष्ट्रात भाजपाने घोडेबाजार करून सरकार स्थापन केली. राजस्थान मध्येही भाजपाने प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. महाराष्ट्राने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर देशाला दिशा दाखवण्याचे काम केले आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. महाराष्ट्र देशातील आघाडीचे राज्य असून विधान सभेची ही निवडणुकी देशाची दिशा व दशा ठरवणारी आहे, या निवडणुकीचा संदेश देशभर जाणार आहे. काँग्रेस मविआकडे अनेक अनुभवी नेते आहेत काँग्रेसच्या ५ गॅरंटी व मविआने महाराष्ट्रनामा मधून जनतेच्या हिताचे वचन दिले आहे. महिलांना प्रति महिना ३००० रुपये, मोफत बस प्रवास, २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, शेतकऱ्यांना ३ लाखांची कर्जमाफी यारख्या लोकोपयोगी योजनांचे आश्वासन दिले आहे. भारतीय जनता पक्ष फक्त जाहिरताबाजी करून जनतेची दिशाभूल करत असते. पण त्याला आता महाराष्ट्रातील जनता भूलणार नाही.

भाजपा एक मुख्यमंत्री 'बटोंगे तो कटोंगे' असा नारा देत आहे तर दुसरीकडे पंतप्रधान 'एक हैं तो सेफ हैं',चा नारा देत आहेत. पण निवडणूक आयोग त्यावर काहीच कारवाई करत नाही. निवडणूक आयोगही सरकारच्या दबावाखाली काम करत आहे. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या तारखा ज्या पद्धतीने जाहीर करण्यात आल्या आहेत त्यामागेही मोठे षडयंत्र आहे, असे अशोक गेहलोत म्हणाले. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, भाजपा युती सरकारच्या काळात आरोग्य सेवा पूर्णपणे कोलमडलेली असून मुंबईत २७ टक्के वैद्यकीय कर्मचारी कमी आहेत. ' यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सचिन सावंत, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते युवराज मोहिते आदी उपस्थित होते.

# ठाकरे बंधू, देवरा, पटेल, शायना एनसी, नांदगावकराचा लागणार कस!

मुंबई शहर जिल्हा वार्तापत्र

जमीर काझी

महाराष्ट्राचे राजकीय व प्रशासकीय सत्ता केंद्राचे मुख्यालय , गेटवे ऑफ इंडिया,उच्च न्यायालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, हाजी अली, मुंबादेवी यासारख्या ऐतिहासिक व जागतिक दर्जाचे पर्यटन, धार्मिक स्थळे आणि सर्व प्रमुख राजकीय पक्षाचे मुख्यालये आदीचा समावेश असलेल्या मुंबई शहर जिल्ह्यातील दहाही विधानसभा मतदारसंघातील लढती यावेळी विविध कारणांनी लक्षवेधी ठरल्या आहेत शिवसेनेतील फूटीनंतर त्यांचा बालेकिल्ला असलेल्या या भागात पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक होत असून प्रामुख्याने लढती उद्धव ठाकरे व शिंदे गट, भाजपात होत आहे . त्याचबरोबर गेल्या अडीच तीन दशकापासून स्वतःहून कोणतीही ही निवडणूक लढविली नसलीतरीही प्रत्येक निवडणुकीत 'गर्जना'वीर म्हणून आकर्षणाचा भाग असलेल्या मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र प्रत्यक्ष पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात नशीब आजमावत आहेत. बहुतांश ठिकाणी तिरंगी व चौरंगी लढती होत असून मतविभागणी वरच दिग्गजांच्या विजयाचे समीकरण निश्चित होणार आहे.

वरळी मतदारसंघ:

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे पुत्र व माजी मंत्री आणि ठाकरे गटाचे युवाप्रमुख आदित्य ठाकरे या ठिकाणाहून दुसऱ्यांदा नशीब आजमावत आहेत सेनेतील फुटीनंतर आदित्य यांनी मोठ्या हिमतीने आपल्या पित्याच्या पाठीशी उभे राहत महाराष्ट्रभर दौरे करत पक्षाची मोट बांधण्यात मोलाची भूमिका बजावली आहे त्याचबरोबर महायुती,भाजपा व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अनेक वादग्रस्त निर्णय व कार्यपद्धतीबाबत केवळ शाब्दिक हल्ले न करता आकडेवारीनिशी उघडे पाडत राहिले . त्यामुळे ते फडणवीस , शिंदे यांच्या 'टार्गेट 'वर असून त्यांना पराभूत करण्यासाठी राज्यसभेतील खासदार मिलिंद देवरा यांना मैदानात उतरवले आहे वास्तविक लोकसभा निवडणूक देवरा आहे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते मात्र लोकसभेवेळी दक्षिण मुंबई हा मतदार संघ ठाकरे गटाच्या वाट्याला जाणार असल्याचे निश्चित झाल्यानंतर गेल्या पाच दशकापासून काँग्रेसची एकनिष्ठ असलेल्या देवरा कुटुंबाने शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करीत राज्यसभा मिळवली. या मतदारसंघातील

**राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना शून्य स्थान**

**मुंबई शहर जिल्हा मतदार संघातील दहा मतदार संघात महायुती व महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना एकही जागा मिळालेली नाही. महायुतीकडून भाजपाचे चार तर शिंदे गटाचे पाच उमेदवार निवडणूक लढवीत असून शिवडीतून त्यांनी मनसेच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. तर महाविकास आघाडीतून ठाकरे गट ६ ठिकाणी जागा लढवित असून काँग्रेस ४ ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत.**

गुजराती मतांचे प्रमाणही लक्षणीय असल्याने विधानसभेसाठी त्यांना उमेदवारी देण्यात आली तर मराठी मतांची विभागणी व्हावी, यासाठी गेल्यावेळी आदित्य यांच्याविरोधात उमेदवार न देणाऱ्या मनसेशी महायुतीने 'अंडरस्टँडिंग' करून उमेदवार दिला असल्याचे मतदारसंघात होत आहे. त्यांचे समीर देशपांडे रिंगणात असलेतरी प्रमुख लढत ही आदित्य व मिलिंद देवरा यांच्यात होत आहे.

माहीम मतदारसंघ

वरळीलाच लागून असलेल्या माहीम दादर मतदारसंघ यंदा आदित्य ठाकरे यांचे चुलत बंधू व राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्या उमेदवारीमुळे सुरुवातीपासून चर्चेत राहिला आहे निवडणुकीच्या रिंगणात प्रथमच नशीब आजमावत असून लोकसभेला राज ठाकरे ने ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता त्याची उतराई म्हणून परतफेड म्हणून आम्ही ठाकरे यांना पाठिंबा देण्याची उघड भूमिका भाजपाने घेतली होती मात्र राज यांनी पुढील मुख्यमंत्री भाजपाचा असेल असे वायरमवार जाहीर करत राहिल्याने मुख्यमंत्री शिंदे त्यांच्यावर नाराज झाले आहेत, त्याचाच परिपाक म्हणून त्यांनी आपले खंदे समर्थक व विद्यमान आमदार सदा सरवणकर यांना उमेदवारी मागे घेण्याबाबत आग्रह केला नसल्याचे सांगितले जाते या दोघांसह मराठी माणसाचा वरचष्मा असलेल्या या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाने महेश सावंत या निष्ठावंत शिवसैनिकाला उमेदवारी दिली आहे .त्यामुळे या तिरंगी लढतीत ठाकरे घराण्याच्या तिसऱ्या पिढीतील दुसरा युवा नेता विधानसभेत प्रवेश होतो की नाही?, याकडे राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

मुंबादेवी मतदार संघ

बहुभाषिक मतदारांचा पगडा असलेल्या मुंबादेवी मतदार संघातून काँग्रेसचे अमीन पटेल सलग चौथ्यांदा विधानसभेत जाण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पहिल्यांदा मुरली देवरा व त्यानंतर त्यांचे पुत्र मिलिंद यांच्याशी एकनिष्ठ असलेल्या पटेल यांना आपल्या सोबत घेण्यासाठी शर्तीचे प्रयत्न देवरायांनी केले होते मात्र अमीन पटेल हे काँग्रेसची एकनिष्ठ राहिले आणि लोकसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार अरविंद सावंत यांना मताधिक्य मिळवून देण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यामुळे त्यांना पराभूत करण्याचा चंग देवरा यांनी बांधला असून त्यासाठी तुल्यबळ उमेदवार असावा म्हणून निवडणूक अर्ज भरण्यापूर्वी एक दिवस अगोदर भाजपाच्या शायना एनसी या बहुचर्चित व्यक्तिमत्त्वाला शिंदे गटात प्रवेश देऊन उमेदवारी देण्यात आले अमीन पटेल हे मतदारसंघातील विविध कामामुळे त्यांची सकारात्मक प्रतिमा सर्व मतदारात आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी ओरिजनल माल व इम्पोर्ट माल असा असे वक्तव्य केल्यानंतर भाजपाच्या स्थानिक पासून ते दिल्लीतील राष्ट्रीय नेत्यांनी त्याविरोधात प्रतिक्रिया देत मोठा गाजावाजा केला या ठिकाणी महायुतीकडून' व्होट जिहाद' ची वातावरण निर्मिती करण्याचा कसोशीने प्रयत्न केला जात आहे.

शिवडी विधानसभा:

महायुतीने उघडपणे मनसेच्या उमेदवाराला पाठिंबा दिलेला राज्यातील २८८ मतदार संघातील हा एकमेव मतदार संघ आहे या ठिकाणी ठाकरे गटाचे अजय चौधरी व मनसेचे बाळा नांदगावकर यांच्यात पारंपारिक लढत होत आहे. यावेळी ठाकरे गटाकडून सुधीर साळवी यांनी उमेदवारी मिळवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले होते. मात्र फुटीच्या काळात ठाकरेंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या अजय चौधरी यांनाच मातोश्रीने प्राधान्य दिले त्यामुळे लालबागच्या राजा मंडळाच्या कामानिमित्याने परिचित असलेले साळवी यांचे समर्थक नाराज झाले होते परंतु उद्धव ठाकरे यांनी साळवींना मातोश्री बोलावून त्यांची नाराजी समजूत काढण्यात यश मिळवले .मात्र महायुतीच्या पाठिंबामुळे प्रचारात आघाडी घेतलेल्या बाळा नांदगावकर यांना पुन्हा चितपट करण्यासाठी साळवी समर्थकांची किती साथ मिळते ? हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# १४ नोव्हेंबरपासून शहरात डॉक्टरांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन

### हजार खेळाडूंचा सहभाग, १३ खेळांचा समावेश

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने १४ ते १७ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा स्पर्धा आयएमएच्या दिल्ली येथील मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास हजारांहून अधिक अलिओपॅथिक डॉक्टर खेळाडू शहरात दाखल होणार आहेत, अशी माहिती सोमवारी, ११ रोजी येथे विशेष पत्रपरिषदेत देण्यात आली.

विविध मैदाने सज्ज

या स्पर्धांमध्ये १३ खेळांचा समावेश करण्यात आलेला आहे, यामध्ये पुरुष क्रिकेट, महिला क्रिकेट, बॅडमिंटन, बास्केटबॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, जलतरण स्पर्धा, वॉकथॉन, मॅरेथॉन, सायक्लोथॉन, थलेटिक्स आदी खेळ घेण्यात येणार आहेत. यासाठी शहरातील विविध मैदाने सज्ज करण्यात आलेली आहे. विभागीय क्रीडा संकुल, गरवारे क्रिकेट मैदान, एडीसीए एन-२, सिडको क्रिकेट मैदान, इंड्यूरन्स ग्राउंड, बॅक वूड अरेना टर्फ या ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना वेलकम किट, सहभाग प्रमाणपत्र , एमएमसी ६ क्रेडिट पॉईंट दिले जातील, तर विजेत्या खेळाडूंना सन्मान पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. येणाऱ्या खेळाडूंच्या भोजनाची व्यवस्था आयएमए कडून करण्यात आली आहे.

मेडिसीन परिषदही होणार

याच वेळी तीन दिवसीय स्पोर्ट्स मेडिसिन परिषदेचेही आयोजनही १४ ते १६ नोव्हेंबरला होणार आहे. यात शहरासह महाराष्ट्र तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ डॉक्टर विविध खेळांमध्ये घ्यावयाची काळजी, समस्या, निदान व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, एमजीएम मेडिकल कॉलेज, रामचंद्र इन्स्टिट्यूट, सीएसएमएस मेडिकल कॉलेज आणि बदनापूर मेडिकल कॉलेजचे यासाठी सहकार्य लाभणार आहे.

## अग्रलेख...

# राजकारणाचा दर्जा का, केव्हा व कसा घसरला?

महाराष्ट्रातील राजकारणाचा दर्जा घसरला आहे, राजकीय नेत्यांनी भाषेची पातळी सोडली आहे, राजकारणाचा वीट आला आहे, अशी भावना राज्यातल्या सामान्यजनांकडून व्यक्त होते आहे. आज जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे त्याला सर्वस्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे, त्यांचे विश्वप्रवक्ते वाचाळवीर संजय राऊत आणि पावसात भिजून सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होत स्वत:ला जाणते म्हणविणारे काका जबाबदार आहेत. २०१९ साली विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी भाजपा-शिवसेनेला स्पष्ट बहुमतापेक्षाही जास्त जागा दिल्या होत्या. पण, अहंकाराने आणि सूडाने पेटलेल्या उद्धवांनी स्वत:च्या संकुचित स्वार्थासाठी वेगळी वाट धरली. ज्यांना मतदारांनी नाकारले होते, त्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशी अभद्र युती केली. तिथपासूनच महाराष्ट्रात राजकारणाचा स्तर घसरायला सुरुवात झाली. देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करण्यास प्रारंभ झाला. देवेंद्र फडणवीस हे केवळ ब्राह्मण आहेत म्हणून त्यांना लक्ष्य करण्यात आले नाही, तर ते एक सक्षम नेते आहेत; त्यांनी पाच वर्षांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण केला होता. दुसरा कार्यकाळही त्यांनी गाजवला असता आणि म्हणूनच पावसात भिजलेल्या काकांनी उद्धवांना पद्धतशीरपणे जाळ्यात अडकवून व हाताशी धरून फडणवीसांचा सत्तेचा मार्ग अवरुद्ध केला, हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे. मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा सन्मान करत उद्धवांनी जनतेशी गद्दारी केली नसती तर आज राज्यात जी राजकीय परिस्थिती अनुभवास येत आहे, ती आली नसती. शिवसैनिकाला पालखीत बसवण्याची भाषा करता करता उद्धव स्वत:च पालखीत बसले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत; त्यांनी स्वत:च्या मुलालाही कॅबिनेट मंत्री केले. तिथपासूनच शिवसेनेत खदखद सुरू झाली होती. त्याचे परिणाम उद्धव यांना त्यांच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत दिसलेच. ५६ पैकी ४० आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात त्यांना सोडून गेले. सामान्य शिवसैनिकाला म्हणजेच आजच्या मुख्यमंत्र्यांना, एकनाथ शिंदे यांना तेव्हाच देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री केले असते अन् उद्धव 'किंगमेकर'च्या भूमिकेत राहिले असते तर आज जे राजकीय प्रदूषण निर्माण झाले आहे, ते दिसलेच नसते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी कधीच कुणाचे उंबरठे झिजवले नाहीत. भाजपाचे सगळे ज्येष्ठ नेते त्यांना भेटायला मातोश्रीवर जात असत. मातोश्रीची एक प्रतिष्ठा होती, तिला बाळासाहेब हयात असताना कधीच धक्का लागला नव्हता. परंतु, आज परिस्थिती बदलली आहे. बाळासाहेबांचे पुत्र सिल्व्हर ओकवर फेऱ्या मारतात, कधी कधी तर त्यांना प्रतीक्षा करायला लावली जाते. दिल्लीत सोनिया-दरबारी जाऊन ते कुर्निसातही घालून आले. बाळासाहेबांनी कट्टर हिंदुत्वाचा विचार कधीच सोडला नव्हता. ते उघडपणे हिंदुत्वाचा पुरस्कार आणि जागर करायचे. त्यांचे पुत्र उद्धव यांना मात्र वडिलांच्या वारशाचा संपूर्ण विसर पडला आहे, हे अतिशय दुर्दैवी होय. ज्यांनी स्वत: मतदारांनी दिलेला कौल नाकारून लोकशाहीची हत्या केली, ते उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि त्यांचे आधुनिक भारतातील अधू दृष्टीचे संजय हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्यांना गद्दार म्हणतात, त्यांना खोक्यांची उपमा देतात, हे सगळे हास्यास्पद आहे. देवेंद्र फडणवीसांवर व्यक्तिगत टीका केली जाते. शेंडी जानव्याचे हिंदुत्व नाही, असे सांगत संयमी असलेल्या ब्राह्मणांचा अपमान केला जातो, हे उद्धवांना शोभते काय?

महाराष्ट्राच्या राजकारणाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत चालला आहे. गेली अडीच वर्षे महाराष्ट्रातील राजकारण खोके, गद्दार, धडा शिकवणार, करेक्ट कार्यक्रम करणार यासारख्या शब्दांभोवतीच फिरले. सामान्य जनतेला या सगळ्याचा कंटाळा आला आहे, उबग आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात राज्याला प्रगतिपथावर नेले, अनेक लोकोपयोगी कामे केली. जलयुक्त शिवारसारख्या योजना यशस्वीपणे राबवून शेतकरी हित साध्य केले. त्यांनी स्वकर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:ला प्रस्थापित केले. नेमके याच बाबीमुळे पावसात भिजलेल्या काकांना पोटदुखी झाली आणि त्यांनी उद्धवांना हाताशी धरून मुख्यमंत्रिपद देत फडणवीसांना सत्तेपासून दूर ठेवले, हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. आपल्यापेक्षाही सरस ठरू पाहणाऱ्या फडणवीसांना आताच रोखले नाही तर सर्वाधिक काळ सक्रिय राजकारणात राहण्याचे श्रेय आपल्याला मिळणार नाही, या ईर्ष्येतून काकांनी फडणवीस यांना लक्ष्य केले आणि त्यात ते काही प्रमाणात यशस्वीही झाले. स्वत:ला यशवंतरावांचे शिष्य म्हणविणारे काका खरेच त्यासाठी पात्र आहेत का, याचा विचार त्यांनीच करायला हवा. कारण, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राहिलेले यशवंतराव चव्हाण हे संकुचित नव्हते, स्वार्थी तर मुळीच नव्हते. त्यांच्याकडे राजकीय औदार्य होते, मनाचा मोठेपणा होता. राजकीय शत्रूंशीही चांगले संबंध होते. विरोधकांचा सन्मान करण्याची दानत त्यांच्याकडे होती. त्यामुळे त्यांचे शिष्य म्हणवून घेणाऱ्या पवारांनी आता या वयात तरी द्वेषाचे, जाती-पातीचे राजकारण सोडले पाहिजे, ही अपेक्षा करणे व्यर्थ ठरू नये. स्वत:चे श्रेष्ठत्व कायम ठेवण्यासाठी इतरांचे श्रेष्ठत्व अमान्य करण्याचा कोतेपणा त्यांनी करू नये, असे सामान्यांना वाटणे स्वाभाविक आहे. पण, तसा मोठेपणा काका दाखवतील आणि राजकारणात झालेला चिखल दूर करतील, याची शक्यता कमीच. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी फडणवीस यांनी केलेले प्रयत्न लपून राहिलेले नाहीत. त्यांनी मराठा आणि ओबीसी बांधवांच्या कल्याणासाठी केलेली कामे जगजाहीर आहेत. असे असतानाही केवळ त्यांनाच लक्ष्य करण्यात आले. मनोज जरांगे यांनी जातीवरून फडणवीस यांची हेटाळणी केली. तरीही फडणवीस यांनी संयम ढळू न देता आपले काम सुरू ठेवले. असो. जनता म्हणजेच मतदार हुशार आहे. २० नोव्हेंबर रोजी ते योग्य तो निर्णय घेतील, याची खात्री आहे. राज्यात सध्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली आणि नेत्यांची खरी रूपे जनतेच्या डोळ्यांसमोर येऊ लागली. तिकीट मिळाले नाही म्हणून धाय मोकलून रडणारे, घरातून गायब होणारे, नाराज होऊन पक्ष बदलणारे आणि बंड पुकारून स्वत:च्याच पक्षाविरुद्ध उभे राहणारे नेते पाहून आपण नेमके कुणाला आणि का निवडून देत आहोत, हे सामान्य जनतेला कळेनासे झाले आहे. आपल्या पक्षाशी आणि पक्षविचारांशी कोणतेही देणे-घेणे नसलेल्या या उमेदवारांना जनतेशी नव्हे, तर स्वार्थासाठी सत्ता हवी आहे, हे न कळायला जनता मूर्ख नाही, हे या मंडळींनी लक्षात घ्यायला पाहिजे. जगण्यासाठी आवश्यक ते लोकांना हवे आहे. लहान मुले, तरुण, ज्येष्ठ आणि अतिज्येष्ठ या प्रत्येकालाच सहज आणि सुखद जगण्यासाठी या किमान गोष्टी हव्या आहेत आणि महत्त्वाचे म्हणजे यासाठी कष्ट करायला जनता तयार आहे. त्यांना माणसासारखे जगायचे आहे. जगण्याचा आनंद घ्यायचा आहे. लोकांना सुरक्षा हवी आहे. लहान मुलांना आणि महिलांना मोकळेपणाने जगण्याची संधी हवी आहे. विनयभंग आणि बलात्कारासारख्या संकटांना सामोरं जाणाऱ्या स्त्रियांना आणि मुलींना क्रूर नराधमांपासून सुरक्षा हवी आहे. गैरव्यवहार करणारा; मग तो कुणीही असो, योग्य शिक्षा आणि तीही लवकरात लवकर झाली पाहिजे, ही आज लोकांची अपेक्षा आहे. गुन्हे आणि अपराध करणाऱ्यांना पाठीशी घालणारा कुणीही असो, शिक्षा झालीच पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. आपण निवडून देत असलेल्या उमेदवारांचे चारित्र्य स्वच्छ असावे, त्यांना खरोखरीच देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची तळमळ असायला हवी, अशी लोकांची अपेक्षा आहे. खरा आणि कोणत्याही दबावाशिवाय मिळणारा न्याय लोकांना हवा आहे. तेव्हा, जाती-पातीच्या राजकारणाला, भूलथापांना बळी न पडता मतदारांनी स्वत:च्या विवेकाचा वापर करूनच मतदान करायचे आहे. ते काकांच्या पक्षाला करायचे, उबाठांच्या मशालीला करायचे, भाजपाच्या कमळाला करायचे, शिंदेंच्या धनुष्यबाणाला करायचे, हिंदुत्वाला करायचे की अन्य कुणाला, याचा सर्वाधिकार मतदारांकडे आहे. ते योग्य फैसला करतील अन् आपले लोकप्रतिनिधी निवडतील, यात शंका नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# एका सरन्यायाधीशाची निवृत्ती!

न्या. मोहम्मद करीम छागला म्हणजे भारताच्या न्यायव्यवस्थेतील एक चमकता तारा! न्या. छागला यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे, ''आम्ही न्यायाधीश मंडळी आयुष्यभर दुसऱ्यांचे निवाडे लिहितो. आमचा निवाडा कोण लिहिणार?'' आणि या प्रश्नाचे उत्तर स्वत:च देत त्यांनी म्हटले आहे, ''इतिहास!'' आमचा निवाडा इतिहास लिहीत असतो. किती मार्मिक व परखड उत्तर त्यांनी दिले आहे. सेवानिवृत्तीकडे झुकलेल्या प्रत्येक न्यायाधीशास हा प्रश्न भेडसावीत असतो. म्हणूनच काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात बोलताना मावळते सरन्यायाधीश न्या. चंद्रचूड यांनी 'इतिहास आपल्या कार्यकाळाचे मूल्यांकन कसे करील?' या प्रश्नाचे काहूर आपल्या मनात उठले असल्याचे म्हटले होते. सरन्यायाधीश न्या. चंद्रचूड आता निवृत्त झाले असून नवे सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. न्या. खन्ना यांचा कार्यकाळ सहा-सात महिन्यांचा राहणार आहे. ते मे महिन्यात निवृत्त होतील. मागील काही वर्षांत सरन्यायाधीशांना सरासरी वर्षभराचा वा ८-१० महिन्यांचा कार्यकाळ मिळाला आहे. या तुलनेत न्या. चंद्रचूड यांना दोन वर्षांचा कार्यकाळ मिळाला; जो प्रदीर्घ मानला पाहिजे.



**ऐतिहासिक निवाडे** : न्या. चंद्रचूड यांनी काही ऐतिहासिक निवाडे दिले. यासाठी त्यांचे नाव इतिहासात निश्चितच चांगल्या प्रकारे नोंदविले जाईल. पण, त्यांच्याकडून दोन महत्त्वाच्या अपेक्षा होत्या. न्यायदानाची प्रक्रिया वेगवान करणे आणि पारदर्शक करणे. या दोन आघाड्यांवर ते काही तरी करतील, असे वाटत होते. कारण त्यांनी आपली कारकीर्द सुरू असताना 'माझे कोर्ट तारीख पे तारीख' असे असणार नाही, असे भाष्य केले होते. याचा विचार करता न्या. चंद्रचूड काही आमूलाग्र बदल करतील, असे वाटते होते. ते झाले नाही. बहुधा कामाच्या दबावात त्यांना यासाठी वेळ काढता आला नसावा. मात्र, न्यायदानात होत असलेल्या विलंबामुळे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. न्या. चंद्रचूड यांनी सूत्रे हाती घेतली तेव्हा आणि त्यांचा कार्यकाळ संपला तेव्हा प्रलंबित खटल्यांची संख्या न घटता, उलट ती अधिक वाढली. येणाऱ्या काळात हीच स्थिती कायम राहणार आहे. म्हणजे न्यायदानास आणखी विलंब होणार आहे. सामान्य जनतेसाठी ही बाब त्रासदायक ठरणारी असेल.

**राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री** : सरन्यायाधीश म्हणून न्या. चंद्रचूड यांनी वेगवेगळ्या राज्यांत उद्भवलेल्या राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री वादात महत्त्वाचे व मोलाचे निर्णय दिले. हे सारे निर्णय त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी दिले. पंजाबमध्ये तत्कालीन राज्यपाल बनवारीलाल पुरोहित विरुद्ध मुख्यमंत्री भगवंत मान असोत की तामिळनाडूत राज्यपाल रवी विरुद्ध मुख्यमंत्री स्टॅलिन असोत; न्या. चंद्रचूड यांनी लोकनिर्वाचित सरकारच्या बाजूने निवाडा देत योग्य भूमिका घेतली. केरळमध्ये राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी राज्य विधानसभेने पारित केलेल्या काही विधेयकांची मंजुरी काही वर्षांपासून रोखून धरली होती. त्यातही चंद्रचूड यांनी योग्य निवाडा दिला. पण हे सारे करीत असताना सर्वोच्च न्यायालयाला काही पायंडे घालून देता आले नसते काय? उदा. राज्य विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांबाबत राज्यपालांनी सहा महिन्यांत वा तीन महिन्यात निर्णय घेतलाच पाहिजे, असे बंधन सर्वोच्च न्यायालयाला घालता आले नसते काय? न्या. चंद्रचूड यांनी असे काही निवाडे दिले असते तर इतिहासात त्यांची ठळक अक्षरात नोंद झाली असती.

**न्यायपालिकेचे स्वातंत्र्य** : न्यायपालिकेने सरकारच्या विरोधात निवाडे दिले तरच न्यायपालिका स्वतंत्र आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही, असे प्रतिपादन न्या. चंद्रचूड आपला कार्यकाळ संपता संपता केले. त्यांची ही भूमिका योग्य आहे. सरकारने पायाभूत प्रकल्पांच्या विकासासाठी काही निर्णय घेतल्यास त्यात न्यायालयाने प्रत्येक वेळी खोडा घातलाच पाहिजे, असे नाही. न्यायालयाने सरकारचे निर्णय उचलून धरल्यास न्यायालय सरकारच्या दबावाखाली काम करीत आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. शेवटी सरकार जनतेच्या भल्यासाठी काम करीत असते. संसद जनतेसाठी कायदे करीत असते. अशा स्थितीत संसदेने पारित केलेल्या कायद्यांना बेकायदेशीर ठरविणे फार प्रगल्भ मानले जात नाही.

**थेट प्रक्षेपण** : न्या. चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचे न्यायालयाच्या वेब साईटपर थेट प्रक्षेपण करण्याची एक नवी परंपरा सुरू केली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजात काही प्रमाणात पारदर्शकता आणली गेली. हा त्यांचा उपक्रम अभिनंदनीय मानला पाहिजे.

**अनावश्यक विवाद** : अयोध्येचा निवाडा देताना प्रभू रामचंद्रांनीच आपल्याला मदत केली, अशा आशयाचे एक विधान चंद्रचूड यांनी केले होते आणि त्यावरून त्यांच्यावर जोरदार टीका झाली होती, जी अनावश्यक होती. त्यांची ती प्रतिक्रिया साधारण होती. जेव्हा आपणही एखाद्या संकटातून बचावतो, तेव्हा देवच माझ्या मदतीला धावून आला असे म्हणतो. वास्तविक, देव धावून आलेला नसतो. पण, ती आपल्या मनातील एक भावना असते व तिचे प्रकटीकरण होत असते. याच मानसिकेततून चंद्रचूड यांनी ते विधान केले असावे. यासाठी त्यांच्यावर टीका करणे योग्य ठरणार नाही.

**निवाडा महाराष्ट्राचा** : महाराष्ट्राबाबतचा निवाडा चंद्रचूड यांनी दिला नाही यासाठी त्यांच्यावर जोरदार टीका केली जात आहे. या प्रकरणाचा निवाडा त्यांच्या कार्यकाळात आला असता तर ते बरे झाले असते. कारण या खटल्याची चर्चा प्रसिद्धी माध्यमांमध्ये होत होती. अशा प्रकरणात निवाडाच दिला जात नाही, याचा योग्य संदेश गेला नाही. एक तर शिंदेंचे आमदार पात्र वा मग अपात्र, अजित पवार यांचे आमदार पात्र वा अपात्र. सर्वोच्च न्यायालयाला जो निवाडा योग्य वाटत असावा तो त्यांनी द्यावयास हवा होता. काहींनी त्या निवाड्याचे स्वागत केले असते, काहींनी विरोध केला असता. पण, निवाडाच नाही ही स्थिती कशी स्वीकारता येईल? सामान्य जनतेचा न्यायालयावर विश्वास आहे. त्याला धक्का लागता कामा नये. एक म्हण आहे, केवळ न्याय करून चालत नाही, न्याय झाला हे लोकांना दिसलेही पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रकरणात हे व्हावयास हवे होते.

**स्वत:चा निवाडा बदलविला** : देशाच्या न्यायिक इतिहासात न्या. हंसराज खन्ना, न्या. कृष्णा अय्यर, न्या. छागला यांची नावे फार आदराने घेतली जातात. आदर मागून मिळत नाही, तो मिळवावा लागतो. न्या. छागला यांनी किमान तीन वेळा आपला मूळ निवाडा बदलविणारा निवाडा दिला होता. यासाठी फार मोठे मन लागते, ते छागलांजवळ होते. म्हणूनच तर ते मोठे झाले. त्यांचे व्यक्तित्व उत्तुंग ठरले. इतिहासात त्यांची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली.

**क्रूर आणि विचित्र** : 'इतिहास' तसा क्रूर आणि विचित्र असतो. सर्वोच्च न्यायालयातून राजीनामा दिलेले न्या. हंसराज खन्ना यांची नोंद सुवर्णाक्षरांनी झाली तर सर्वोच्च न्यायालयाच्या आजवरच्या इतिहासात सर्वाधिक काळ म्हणजे ७ वर्ष ४ महिने सरन्यायाधीश पदावर राहणारे न्या. यशवंत विष्णू चंद्रचूड यांचे नाव काळ्या अक्षरांनी लिहिले गेले. १९७६ च्या गाजलेल्या हेबियस कॉर्पस खटल्यात न्या. खन्ना यांनी सरकारच्या विरोधात निवाडा दिला होता तर न्या. चंद्रचूड यांनी सरकारच्या बाजूने निवाडा देत, राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार दिला असला, तरी आता आणिबाणी असल्याने त्याला हा अधिकार नाही, असा निवाडा दिला होता. हा एक निवाडा त्यांच्या कारकीर्दीवर पाणी फेरणारा ठरला.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# टारगेट एकच, देवेंद्र...!

सध्याच्या महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निमित्ताने एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत आहे; ती म्हणजे 'टारगेट देवेंद्र...!' त्यातही विशेषत: आपले स्वयंप्रकाशी जाणते राजे शरद पवार आणि आद्य मराठाहितैषी, महान क्रांतिवीर मनोज जरांगे या दोघांच्या तर मळमळीचाच विषय आहे, देवेंद्र फडणवीस...! फडणवीसांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत महाराष्ट्रात पेशवाई आली असल्याचे या जाणत्या राजांनी स्पष्टपणे बोलूनही दाखवले होते. महाराष्ट्रात जे जे काही वाईट घडले, मराठा आरक्षणाचा जो काही खेळखंडोबा झाला, राज्याच्या विकासाची जी काही वाट लागली, जे काही जाती-जातीत समज-गैरसमज झाले, त्या साऱ्यांसाठी केवळ एकच माणूस, एकच मुख्यमंत्री, एकच नेता जबाबदार आहे, असेही दोन महापुरुष महाराष्ट्रावर बिंबवण्याचा प्रयत्न सातत्याने करत असतात. पुरोगामी महाराष्ट्राचा वसा सांगणाऱ्या या महान नेत्यांची देवेंद्र फडणवीसांवरची ही आगपाखड कशामुळे असते, हे आता येथील सर्वसामान्यांनाही चांगलेच कळले आहे. एकीकडे जातपातविरहित राजकारण, समाजकारणाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे निव्वळ जातीचाच विचार करून स्वत:ला छत्रपती शिवरायांचे पाईक म्हणवून घ्यायचे, ही मानसिकता आता अनेकांची दिसून येऊ लागली आहे. अशा पवार, जरांगे मानसिकतेच्या लोकांसोबत काही प्रसारमाध्यमेही हाच उद्योग करत असतात. उकरून काढून, नको तिथे, चुकीच्या पद्धतीने खोदकाम करून ते नरेंद्र आणि देवेंद्रांनी या देशाला कुठे नेऊन ठेवले आहे, याचे फालतू आणि बकवास 'नॅरेटिव्ह' मांडत असतात. नरेंद्र मोदींनी देश कसा मातीत घातला आहे हे ओढून ताणून, लांड्यालबाड्या करून सांगणाऱ्या, फेकाफेक करणाऱ्या काही महान समाजसेवींनी खरे तर आता मोदी नाही तर कोण, कसा, का, हेही ठोस मुद्द्यांनिशी सांगायला हवे आहे. परवा अशाच एकाने राज्यातील निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर देवेंद्र फडणवीसांच्या प्रभावकाळात, म्हणजेच गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्र राज्य कसे माघारले आहे, हे सांगण्याची उठापटक केली आहे, अगदी व्यवस्थित ओढूनताणून...! हे जे काही छापले गेले ते पाहून काहींच्या हातात कोलीतच मिळाले. ही 'माघार' आर्थिक संदर्भातील मांडली असल्यामुळे महाराष्ट्रातील मान्यवर आर्थिक अभ्यासक आनंद देवधर यांनी हा मुद्दा ऐरणीवर घेतला. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे सदस्य अर्थतज्ज्ञ संजीव सन्याल व त्यांच्या सहकारी आकांक्षा अरोरा यांनी '१९६०-६१ ते २०२३-२४ या कालावधीतील सर्व राज्यांची कामगिरी' या विषयावर एक अहवाल तयार केला आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात या तज्ज्ञांनी 'राज्याचे सकल उत्पन्न' म्हणजेच 'स्टेट जीडीपी' आणि 'दरडोई उत्पन्न' म्हणजेच 'पर कॅपिटा इन्कम' या दोन मुद्द्यांवर राज्यांची तुलना केली आहे. १९६०-६१ या वर्षी महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न १३३.७ टक्के आणि गुजरातचे ११८.३ टक्के होते. ही महाराष्ट्राची आघाडी २०१०-११ पर्यंत कायम होती, पण २०१०-११ मध्ये गुजरातने महाराष्ट्राला मागे टाकले, असे या अहवालात म्हटले आहे. या काळात नरेंद्र मोदी गुजरातचे नेतृत्व करत होते आणि महाराष्ट्रात काँग्रेसी आघाडीचे सरकार विकासशून्य राजकारण करत होते, हे देवधरांनी लक्षात आणून दिले आहे. त्यानंतर हेच दरडोई उत्पन्न २०१०-११ मध्ये १५७.१०, २०२०-२१ मध्ये १४४.४ आणि २०२३-२४ मध्ये १५०.७ वर पोहोचले होते. यात घसरगुंडी झालेल्या २०२०-२१ मध्ये उद्धव ठाकरे यांचे निर्णयशून्य व विकासद्रोही स्थगिती सरकार होते, असाही टोला देवधरांनी हाणला आहे. याचाच दुसरा आणि महत्त्वाचा अर्थ, गेल्या दोन-अडीच वर्षांत महाराष्ट्राने दरडोई उत्पन्नात पुन्हा सुधारणा केली आहे, असाच आहे. यातील दुसरा मुद्दा आहे जीडीपीचा. 'जीडीपी' म्हणजे 'ग्रॉस डोमॅस्टिक प्रॉडक्ट.' एका विशिष्ट कालावधीत देशात बनविलेल्या सर्व तयार वस्तू आणि सेवांचे आर्थिक मूल्य म्हणजे जीडीपी. देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार आणि त्याची वाढ मोजण्यासाठी जीडीपीचा वापर केला जातो. या अहवालात महाराष्ट्राचा जीडीपी दर किंचित घसरला असला, तरी तो देशात अव्वलच आहे, असेही नमूद करण्यात आले आहे. २०२०-२१ मध्ये जीडीपी दरवाढ १३ टक्के होती; आता २०२३-२४ मध्ये ती १३.३ झाल्याचे हा अहवाल म्हणतो. याचाच अर्थ असा की, महायुतीचे सरकार आल्यानंतर परिस्थिती पुन्हा सुधारू लागली आहे. जीडीपी मोजण्याच्या नव्या जागतिक पद्धतीला भारताने २०१५ पासून स्वीकारले आहे. या अहवालातील २०१०-११ चा १५.२ टक्के हा दर जुन्या पद्धतीने काढला असून त्याचे आधारभूत वर्ष २००४-०५ आहे तर २०२०-२१ चा वाढीचा दर नव्या पद्धतीने काढला असून त्याचा वाढीचा दर १३ टक्के आणि आधारभूत वर्ष २०११-१२ आहे, असे आनंद देवधर यांनी समजावून सांगितले आहे. आधारभूत वर्ष आणि पद्धत बदलली तरी महाराष्ट्राचा देशाच्या जीडीपीमधील वाटा सर्वात जास्त आहे. २०१०-११, २०२०-२१ आणि २०२३-२४ या तिन्ही वर्षांत दुहेरी आकड्यात टक्केवारी असलेले महाराष्ट्र हे या देशातील एकमेव राज्य आहे. थोडक्यात, देशात महाराष्ट्रच अव्वल आहे. कोणी कितीही आणि कसेही खडे फोडले 'योद्धा' देवेंद्र फडणवीसांच्या नावाने तरीही...!

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# मतदान राष्ट्रीय मुद्यांवर आधारित हवे

निवडणुकीचा बिगुल वाजलेला आहे. वेगवेगळे पक्ष आणि त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध झालेले आहेत. प्रत्येक राजकीय पक्षाचा आपला एक मतदार वर्ग असतो. त्यामुळे विविध राजकीय पक्ष विविध स्वरांचे वाद्य वाजविताना आपल्याला दिसतात. मतदारांना आकृष्ट करणे हा सर्वांचा एकमात्र ध्यास असतो. निवडणुका या स्थानिक मुद्यांवर आधारित व्हायला हव्या की राष्ट्रीय मुद्यांवर आधारित व्हायला हव्या, हा नेहमी विचारला जाणारा प्रश्न आहे. सोयीस्करपणे लोक याचे उत्तर देताना म्हणतात की, विधानसभेच्या आणि त्या खालच्या निवडणुका असल्यास स्थानिक मुद्यांवर आधारित मतदान व्हायला पाहिजे. परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, प्रादेशिक पक्ष हे नेहमी प्रादेशिक मुद्यांच्या आधारावर अस्तित्वात येतात व आपले अस्तित्व टिकवण्यासाठी ते प्रादेशिक मुद्यांना कधी संपू देत नाही. त्यांना ते नेहमीच जिवंत ठेवतात. परंतु, मतदान करताना नेहमीच जे राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवतात अशा पक्षांनाच मतदान करायला पाहिजे. उदा. काश्मीरमध्ये ३७० कलम रद्द करणे ही मोदी सरकारची एक ऐतिहासिक उपलब्धी आहे. कुठल्याही प्रादेशिक पक्षाला किंवा काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला या मुद्याशी काही देणेघेणे नव्हते. परंतु, काश्मीर हे भारतमातेचे मस्तक आहे. काश्मीर हे भारताचे अविभाज्य अंग आहे. त्यासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे बलिदान झालेले आहे. त्यामुळे तेथे ३७० कलम रद्द झालेच पाहिजे, अशा पद्धतीची भूमिका भारतीय जनता पक्षाने घेतली व १९५२ ते २०१९ ला ३७० कलम रद्द करीत पर्यंत ही भूमिका त्यांची कायम होती. ज्या मुद्याला धरून त्यांनी आंदोलन उभे केले तो मुद्दा त्यांनी आपल्या जीवनकाळात पूर्ण केलेला आपल्याला दिसून येतो.

१९९० यावर्षी लालकृष्ण अडवाणी यांनी अयोध्येच्या राम जन्मभूमीवर प्रभू रामचंद्रांचे मंदिर व्हावे यासाठी सोमनाथपासून अयोध्येपर्यंत रथयात्रा काढली, जनजागृती केली. त्याचा फायदाही भाजपाला झाला. केंद्रात भाजपा सत्तेवर आला. भाजपाने याला केवळ निवडणुकीपुरता मर्यादित मुद्दा न ठेवता 'याची देही याची डोळा' राम मंदिर राम जन्मभूमीवर बांधण्याचे स्वप्न पूर्ण केले. यावरून आपल्याला राष्ट्रीय पक्षाच्या सचोटीची कल्पना येते.



१९४७ पासून लाखो हिंदूंना पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश या देशांमध्ये ते हिंदू आहेत म्हणून अत्याचारांचा सामना करावा लागत होता. १९४७ साली देशामध्ये असलेल्या पंडित नेहरू यांच्या सरकारपासून कोणत्याही काँग्रेसच्या सरकारने हिंदूंच्या या अवस्थेकडे लक्ष दिले नाही. परंतु, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने नागरिकता संशोधन विधेयक पारित करून या देशातील नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्याचा मार्ग मोकळा केला. त्या अंतर्गत शेकडो लोकांना आतापर्यंत नागरिकत्व मिळालेले आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये धुळ्याचे भाजपाचे उमेदवार सुभाष भामरे यांना सर्वच विधानसभा क्षेत्रामध्ये आघाडी होती तरी त्यांची सर्व आघाडी एकट्या मालेगावमध्ये भरून निघाली व त्यांचा पराभव झाला. इतर सर्व विधानसभा क्षेत्रांमध्ये १ लाख ९० हजार मतांपेक्षा अधिकची आघाडी असून एकट्या मालेगावात विशिष्ट धर्माच्या लोकांनी काँग्रेस उमेदवाराला मतदान केल्यामुळे १ लाख ९५ हजार मतं विशिष्ट धर्माची काँग्रेस उमेदवाराला मिळाली व त्यांचा उमेदवार अवघ्या ५००० मतांनी विजयी झाला. हा इतिहास आहे. त्यामुळे एखादा विशिष्ट धर्माचे लोक आपल्या धर्माच्या धोरणानुसार जर मतदान करीत असतील तर हिंदूंनी अमुक एका जातीचे म्हणून मतदान करणे अतिशय चुकीचे आहे. हिंदूंनी हिंदू म्हणूनच शत-प्रतिशत मतदान केले पाहिजे व राष्ट्रीय मुद्यांना प्राधान्य देणाऱ्या पक्षांना, हिंदुत्ववादी पक्षांना निवडून आणण्यामध्ये आपली भूमिका पार पाडली पाहिजे.

काँग्रेसच्या काळामध्ये हिंदू समाजाला नेहमीच दुय्यम भूमिका मिळालेली आहे. काश्मीर घाटीमध्ये काश्मिरी हिंदूंना काश्मीर सोडून पलायन करावे लागले. बंगालमध्ये हजारो हिंदूंचे शिरकाण करण्यात आले. तेथे मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी घुसखोरांना वसविण्यात आले. उत्तरप्रदेशमध्ये मुस्लिम गुंडांची दहशत कायम होती. वक्फ बोर्डाच्या घशामध्ये लाखो एकर जमीन घालण्यात आली. उत्तराखंडमध्ये रेल्वेची जमीन विशिष्ट धर्माच्या लोकांना अतिक्रमित करता आली. संपूर्ण देशभरामध्ये दिल्ली, कोलकाता, मुंबई, अहमदाबाद अशा सर्व ठिकाणी बॉम्बस्फोट होत होते. देश आयएसआयचा केंद्रबिंदू झालेला होता. भ्रष्टाचार शिगेला पोहोचला होता. विदेशातून शस्त्र भारतात दहशतवादी संघटनांना पुरविली जायची. हजारो खोट्या संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत विदेशातून पैसा यायचा आणि इथल्या निवडणुका जिंकल्या जायच्या, पीएफआय, सिमीसारख्या (स्टुडंट इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया) संघटना देशभरामध्ये फोफावल्या होत्या. एक ना दोन अशा अनेक गोष्टी काँग्रेसच्या राज्यात झालेल्या आहेत. या सर्वच गोष्टी हिंदुहित विरोधी व राष्ट्रविरोधी होत्या. त्यामुळे आता लोकशाहीच्या नावाखाली, धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली हिंदूंचा आवाज दाबून टाकण्याचे कार्य करणाऱ्या या पक्षांना डोके वर काढू देण्याची संधी हिंदू मतदारांनी देता कामा नये आणि म्हणून येणाऱ्या विधानसभेत हिंदुत्ववादी पक्षांना विजयी करण्याची जबाबदारी हिंदू मतदारांची आहे. ती त्यांनी पार पाडल्यास प्रगत महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र आपल्याला दिसू शकेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### कर्कश हॉर्नवर नियंत्रण

आजच्या आधुनिक जगात टेक्नॉलाजीच्या विकासामुळे कर्कश हॉर्नवर नियंत्रण ठेवणे व कर्णबधिर करणाऱ्या या त्रासदायक वाईट सवयींवर सेंसरद्वारे दंड ठोठावणे सोपे झाले आहे. विकसित देशात वाहनांचा कर्कश आवाज तुरळक ऐकू येतो. आवाजाने मानवाचे कर्णपटलाचे नेहमीकरिता नुकसान होऊ शकते. भारतात मात्र याचे ज्ञान सामान्य जनतेलाच काय, पण वाहतूक अधिकाऱ्यांनाही नसावे असे दिसते. दुचाकी व चारचाकी वाहने अगदी मनसोक्तपणे आपले कर्कश हॉर्न वाजवत बिनधास्त जात असतात. त्यांना टोकायचे कुणाच्याच मनात येत नाही. इलेक्ट्रॉनिक युगात सेंसरचा उपयोग करून एखाद्या वाहनाने किती वेळा जास्त तीव्रतेचा (डेसिबल) हॉर्न वाजविला, याची नोंद करता येते व त्यानुसार चालकाला बिल किंवा दंड आकारता येऊ शकतो. माझी अशी शासनाला नम्र विनंती आहे की, याकरिता ते उपकरण बनवायला वैज्ञानिकांना प्रोत्साहन देऊन सर्व वाहनांवर ते बसवणे कायद्याने अनिवार्य करावे म्हणजे जो चालक जास्त कर्कश हॉर्न वाजवेल त्याला जास्त बिल येईल; जेणेकरून तो बेफिकीरपणे हॉर्न वाजवणार नाही व समाजाची या उपद्रवापासून सुटका होईल.



**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### अखेर घेतली माघार

मनोज जरांगे मराठ्यांना निव्वळ उल्लू बनवत आहेत. वैयक्तिक स्वार्थासाठी मराठ्यांना वेठीस धरत आहेत. ओबीसीमधूनच मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे तसेच सगेसोयऱ्यांचा त्यात समावेश करावा, कुणबी प्रमाणपत्र देऊन मराठ्यांना ओबीसीमधून घटनाबाह्य आरक्षण द्यावे, असा बालहट्ट ते करू लागले. ज्यांनी १९९४ पासून मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध केला, ज्यांनी सत्तेसाठी जाती-पातीत वैमनस्य निर्माण करून तुष्टीकरणाचे राजकारण केले. त्यांचा बोलविता धनी कोण आहे ते यातून सहज कळते. जरांगेंनी गेल्या दीड वर्षापासून मराठ्यांना चेतवले व ऐन निवडणुकीच्या वेळी माघार घेऊन जाणत्या राजाला खूश करण्याचे काम केले; यावरून त्यांचे आंदोलन फसवे होते, हे सिद्ध झाले. आता तरी मराठ्यांनी सावध होऊन आपले हित कशात आहे, हे लक्षात घेऊन मतदानास सामोरे गेले पाहिजे.

**शशिकांत दंडे**/नागपूर

## वाचक पत्रे

### उमेदवारांना मतदारच जिंकवतात

राज्यात विधानसभेची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवार जिंकून यावा म्हणून प्रचार-प्रसाराचे अनेक माध्यमांद्वारे मतदारापर्यंत पोहोचले जात आहे. उमेदवार कित्येक आश्वासनं देत काम करण्याचं वचन देतात. स्वतः उमेदवार आणि कार्यकर्ते निवडणुकीच्या प्रचारात मोठ्या जोमाने कामाला लागले आहेत. सोशल मीडिया, सभा कार्यक्रम घेऊन जनतेशी संपर्क करण्यासाठी दिवस-रात्र एक करीत आहेत. या विधानसभा निवडणुकीत मतदारांचा प्रचार आणि मानसिकता यावरच उमेदवाराचा विजय निश्चित असतो. उमेदवारांच्या स्वभाव आणि कामाप्रती तत्परता याकडे मतदार जातीने लक्ष देऊन आपला उमेदवार निश्चित करून जिंकून आणतो. सामान्य मतदार उमेदवारांच्या कोणत्याही प्रलोभनाला भुलत नाही. आपला उमेदवार आपल्या मताद्वारे निश्चित करून लोकप्रतिनिधी निवडून आणत असतो.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### उद्धव ठाकरे इतिहास विसरले का?

छत्रपती शिवरायांचे मंदिर उद्धव ठाकरे सुरतेत बांधणार, अशी त्यांनी घोषणा केली. ती करताना इंग्रजांना विरोध करायला महाराजांनी सुरत लुटली, असे ठाकरे म्हणाले, हे 'तरुण भारत'च्या ६ नोव्हेंबरच्या बातमीत वाचले. पण सुरत तर तेव्हा औरंगजेबाच्या मोगलाईत येत होते. इंग्रज आणि डचांच्या तिथे केवळ लहान वखारी होत्या. सुरत स्वारी अगोदर तीन वर्षे शाहिस्ते खान स्वराज्यावर विळखा घालून बसला असताना त्याने राज्याची अतोनात नासधूस केली. त्यामुळे त्याची भरपाई मोगलाई मुलुखातूनच व्हावी यासाठी महाराजांनी सुरतवर स्वारी केली. सुरतेचा मुघल सुभेदार इनायतखान हा प्रचंड जुलमी होता. स्वराज्याची निकराची लढाई तेव्हा औरंगजेबासोबत होती. हे सगळे इतिहासाने आपल्याला ज्ञात करून दिले असतानाही औरंगजेबाचे नाव न घेता इंग्रजांना विरोध करायला सुरत स्वारी, असे उद्धव ठाकरे म्हणतात ते कोणत्या कारणाने, हे राजकारणाचे बदललेले समीकरण बघितले तर सहज लक्षात येते. राजकारण कसेही करायला हरकत नाही, पण त्यासाठी इतिहासाची मोडतोड होणे योग्य नाही, हे मात्र निश्चित!

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नांदेड परिसरात दर्जेदार कलावंत घडवण्याचे कार्य पं. वसंतराव शिरभाते आणि स्व. पं. यशवंत देशपांडे यांनी केले

## कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात सुरमणी पंडित कमलाकर परळीकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

गुरुंनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे योग्य दिशा, संकटांना तोंड देण्यासाठी बळ आणि यश मिळवायला मदत होते. गुरुंच्या साथीने शिष्य स्वत:ची अशी वेगळी ओळख निर्माण करतात. ते यशाच्या शिखरावर पोहोचतात. नांदेड परिसरात असे दर्जेदार गुणी कलाकार घडविन्याचे महान कार्य स्व. पं. वसंतराव शिरभाते व स्व. पं. यशवंतराव देशपांडे यांनी केले आहे. असे प्रतिपादन महामहोपाध्याय सुरमणी पं. डॉ. कमलाकर परळीकर यांनी केले. निमित्त होते

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबईतर्फे नांदेड परिसरातील संगीत भूषण असलेले दोन संगीत तपस्वी स्व. पं. वसंतराव शिरभाते आणि स्व. पं. यशवंतराव देशपांडे यांना नुकतेच मरणोत्तर संगीत रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या बद्दल या दोन महान विभूतींच्या प्रति आदरभाव म्हणून शारदा संगीत विद्यालय नांदेड परिवाराकडून शुक्रवारी (ता.२०) सायंकाळी साडेसहा वाजता गिरिराज मंगल कार्यालय येथे कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामहोपाध्याय सुरमणी पं. डॉ. कमलाकर परळीकर (परभणी), प्रमुख अतिथी अ.भा.गां.म.वि. मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सूर्यवंशी, अ.भा.गां.म.वि. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. देवेंद्र कुलकर्णी तसेच पंडीता सिताभाभी राव आणि आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त भगवानराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शारदा संगीत विद्यालय चे विद्यार्थ्यांनी जय जगदीश हरे आणि शारदा स्तवन सादर केले. आरंभी पं. वसंतराव शिरभाते व पं. यशवंतराव देशपांडे यांचा जीवन प्रवास डॉ. जगदीश देशमुख आणि पं. संजय जोशी यांनी उलगडून सांगितला. त्यानंतर शिरभाते व देशपांडे परिवारातील सर्व सदस्यांचा गांधर्व मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. तसेच पं. रत्नाकर अपस्तंभ, पं. बाबुराव उप्पलवार, प्रा. व्यंकटेश कोत्तापल्ले यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. गांर्धव मंडळाच्यावतीने यापुढेही संगीत क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या तळागळातील कलावंताचा गौरव करण्यात येणार असल्याचे गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष सूर्यवंशी यांनी सांगितले. याच वेळी भगवानराव देशमुख, पंडिता सीता भाभी तसेच डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांनीही वसंतराव व यशवंतराव यांच्या प्रती आदरभाव व्यक्त केला.

# संगीत क्षेत्राच्या संवर्धनासाठी अनेक योजनेसह अखिल भारतीय गांधर्व मंडळ मुंबईची शासन मान्यतेची कार्यवाही सुरु

## गांधर्व मंडळाच्या प्रबंध परिषदेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

मानवी जीवनाला समृद्ध करणारे संगीत विषयाला चांगले दिवस येतील असा महाराष्ट्र शासनाने नुकताच शासन निर्णय काढला आहे त्यामध्ये शालेय तसेच महाविद्यालय पातळीवर पदे भरण्याबाबत सकारात्मक योजना, गुरुशिष्य परंपरा साठी अनुदान योजना, तालुका पातळीवर संगीत कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल निर्मिती, जेष्ठ कलावंत मानधन योजनेत भरीव अनुदान, अभिजात संगीतासह लोक संगीतासही संवर्धनासाठी योजना, संगीत कलाकारांसाठी मैफली, महात्सवांचे आयोजनासह कलावंत आदानप्रदान योजना अशा अनेक योजनांसह अभिजात संगीताच्या प्रसारासाठी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी १९०१ साली स्थापित केलेल्या अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाला एक शतकापेक्षाही अधिक काळ लोटला तरी त्यांच्या संगीत विशारद आणि अलंकार, आचार्य परीक्षांना शासन मान्यता नाहीय ती देणेबाबत शासनाने सकारात्मक विचार केला आहे आणि शासन मान्यतेची कार्यवाही सुरू केली आहे. यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यासाठी गांधर्व मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सूर्यवंशी, उपाध्यक्ष डॉ. देवेंद्र कुलकर्णी , रजिस्ट्रार विश्वास जाधव आणि मंडळाचे प्रबंध परिषदेचे संपूर्ण पदाधिकारी यांनी सातत्याने केलेला पाठपुरावा यामध्ये सर्व आजीवन सदस्य, संगीत शिक्षक, केंद्र व्यवस्थापक, विद्यार्थी व मंडळाचे हितचिंतक सहयोगी या सर्वांचे हे सामुदायिक यश आहे. शारदा संगीत विद्यालय नांदेड परिवाराचे संचालक डॉ. प्रमोद देशपांडे व सौ. मंजुषा देशपांडे तसेच नांदेडच्या संगीत क्षेत्रातील डॉ. जगदीश देशमुख, सुरमणी प्रा. धनंजय जोशी, पंडिता सीताभाभी, पंडित रत्नाकर आपस्तंब , पंडित संजय जोशी,संस्कार भारती नांदेडचे अध्यक्ष जयंतराव वाकोडकर, सौ. राधिका वाळवेकर, सौ. विजया कोदंडे, पंडीत व्यंकट कोतापल्ले, अभिजित अपस्तंब, सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक पंकज शिरभाते, आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त भगवानराव देशमुख यांचेसह अनेक मान्यवरांकडून या शासन निर्णयाचे स्वागत करण्यात येऊन या यशासाठी सर्व पातळीवर वेळोवेळी पाठपुरावा करणाऱ्या सर्व संबंधितांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांचा संस्कार भारती नांदेडच्या वतीने हृद्य सत्कार



नांदेड, (प्रतिनिधी ) काल दि. १० नोव्हेंबर रोजी,

संस्कार भारती देवगिरी प्रांताचे लोककला विधाप्रमुख प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, किनवट यांचा त्यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई सदस्य पदी पुनर्नियुक्ती करण्यात आल्याबद्धल सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ गीतरामायण गायक पंडित संजय जोशी यांच्या निवासस्थानी त्यांचा पारिवारिक स्वरूपाचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी हे सरस्वती कला महाविद्यालय किनवट येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून संत साहित्याचे अभ्यासक, शाहीर व व्याख्याते म्हणून सुप्रसिद्ध आहेत. माहूरच्या रेणुकेचे भक्त संत विष्णुदास यांच्या साहित्याचा पण त्यांचा दांडगा अभ्यास आहे. संत कवी विष्णुदासांच्या रचनांवर त्यांनी पीएचडी पण केली आहे. आदिवासी, बंजारा समाजाच्या प्रगतीसाठी त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. लोकसाहित्य समिती पुणे याचे पण ते सदस्य आहेत. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कामाची योग्य ती दखल राज्य शासनाने या नियुक्तीने घेतली आहे असे मत याप्रसंगी संस्कार भारती देवगिरी प्रांत महामंत्री प्रा.डॉ. जगदीश देशमुख यांनी व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष जयंत वाकोडकर व महानगराध्यक्ष प्रा.सौ. राधिका वाळवेकर यांच्या हस्ते प्रा. कुलकर्णींचा यथोचित सत्कार करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या. या भागातील नवोदित कवी व लेखकांचे दर्जे दार साहित्य प्रकाशित करण्यास मी प्राधान्य देईन तसेच या भागातील संत साहित्य लोकांसमोर आणण्याचा मी प्रयत्न करेन असे आश्वासन सत्काराला उत्तर देताना डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी दिले. या सत्कार सोहळ्याला शर्वरी सकळकळे, विभाग प्रमुख, वैशाली गोस्वामी, रश्मी वडवळकर, उज्वला जोशी, गणेश भोरे, पल्लवी व सुमेध पांडे, चैतन्य पिंपळडोहकर व प्रकाश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या शेवटी वीणा देव व जेष्ठ सारंगी वादक पं. रामनारायण यांच्या दु:खद निधना मुळे संस्कार भारती नांदेड समिती तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तीन दिवसात ८.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त

## नांदेड जिल्हयाच्या दलाकडून ७ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत ३३ धडक कारवाया

नांदेड, दि. १० नोव्हेंबर : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहितेमध्ये अवैध मद्य जप्त करण्याची धडक कारवाई नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. दिनांक ७ ते ९ नोव्हेंबर रोजी विभागाने एकूण ३३ ठिकाणी धडक कारवाया करुन दि. ७ नोव्हेंबर रोजी २ लाख २६ हजार ५२० आणि ८ ते ९ नोव्हेंबर २०२४ रोजी एकूण ५ लाख ९० हजार ५१० रुपयांच्या असा एकूण ८ लाख १७ हजार ३० रुपयांचा मुद्देमालाची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली आहे.

तसेच ७ नोव्हेंबर रोजी भोकर पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव व भोकर पोलीस स्टेशनचा स्टाफ यांचेसमवेत राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करुन ७ कारवाया करुन ५७ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.७ नोव्हेबर रोजी झालेल्या कारवाईमध्ये एकूण गुन्हे १४, वारस १३, अटक आरोपी १३, हातभट्टी ३० लि, रसायन ८१० लि. देशी मद्य ७९.९० लि, विदेशी मद्य १७.२८ लि, ताडी १७० लि, जप्त वाहन संख्या ०१ असा एकूण २ लाख २६ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दिनांक ८ व ९ नोव्हेंबर रोजी झालेल्या कारवाईत एकूण गुन्हे १९, वारस १९, अटक आरोपी १९, हातभट्टी ४० लि, देशी मद्य ८१.३६ , विदेश मद्य २२.९६ लि, ताडी ११० लि, जप्त वाहन संख्या २ असा एकूण सर्व मुद्येमाल ५ लाख ९० हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे पार पाडावी यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास दक्ष राहण्याचे व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेश दिले आहेत. त्यानंतर जिल्ह्यामध्ये विभागामार्फत धाडी टाकण्याचे सत्र सुरू आहे. निवडणूक काळामध्ये यामध्ये अधिक वाढ करण्यात आली असून अवैध दारू विक्रीवर विभागाची काटेकोर नजर आहे. जिल्ह्यात आचारसंहिता लागू असून या काळामध्ये कोणीही अवैध मद्य खरेदी करू नये. तसेच स्वत:जवळ बाळगू नये, असे आवाहन विभागाने केले आहे. मद्याचा गैरवापर निवडणूक काळात होत असल्यास या संदर्भात नागरिकांनी विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ व व्हॉटसप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या कारवाईमध्ये अधिक्षक गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नमाला गायकवाड, जावेद कुरेशी, आशिष महिंद्रकर, सरकाळे यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

# सोयगावातील आयोजित रक्तदान शिबिरास उत्तम प्रतिसाद



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ नोव्हेंबर : रक्तपेढी मध्ये रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुडवडा भासू लागल्याने रक्तपेढीनी केलेल्या आवाहनाची दखल घेत क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने दि.११ सोमवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळत सत्तावीस रक्तदात्यांनी रक्तदान केले. दरम्यान सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष दिलीप शिंदे,जेष्ठ पत्रकार विजय पगारे यांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर रक्तदान संकलनास सुरुवात करण्यात आली.

रक्ताची गरज लक्षात घेता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गरजूंना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे,रक्ता अभावी कोणाचा मृत्यू होऊ नये या अनुषंगाने क्रांती जनहित बहुउद्देशिय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना सोयगाव यांच्या मार्फत व रेड प्लस रक्तपेढी जळगाव (खान्देश) यांच्या सहकार्याने सोयगाव येथील बसस्थानक मागे रक्तदान शिबिर आयोजित केले होते.या रक्तदान शिबिरात सत्तावीस रक्तदात्यांनी रक्तदान केले.रक्तदान संकलन करण्याचे काम रेड प्लस पतपेढीचे डॉ.रवींद्र पाटील,दीपक पाटील,शाहिद शेख,रोशन तितरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे,अनिल लोखंडे,अशोक ढगे,ज्ञानेश्वर गाडेकर,उर्मिला इंगळे,रुपाली लोखंडे,मीना गाडेकर,पद्मा शिंदे,गणेश गायकवाड,अमोल निकम,गणेश कापरे,विष्णू पंडित,शेख गुलाब,भास्कर श्रीखंडे,यासिन बेग,मयुर शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 102-Badnapur | Narayan Tilakchand Kuche | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble District Judge-1 And Addl. Sessions Judge, Jalna. SC No. 262/2023 Pending. | U/s. 143, 149, 188, 447, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act, u/s.11 Maharashtra State Statue Defacement Act . | Nil | Nil | Nil |

Name of constituency : 102 - Badnapur

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 95- Jintur | Meghna Deepak Sakore Bordikar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1980/2019 Before | U/s. 188 of IPC | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1283/2022 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 3. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 730/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC and other | Nil | Nil | Nil |
| 4. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 339/2021 | U/s. 188, 269, 270 ofIPC. | Nil | Nil | Nil |
| 5. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 713/2021 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 6. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1220/2020 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 7. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 309/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 8. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 656/2019 | U/s. 336, 287 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 9. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 106/2022 | U/s. 341, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 10. | | | Hon'ble J.M.F.C Patoda Dist. Beed-1 S.C.C. No. 185/2022 | U/s. 188, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 11. | | | Cri. No. 77/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 12. | | | Cri. No. 335/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |

Name of constituency : 95- Jintur

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# दानवे व खोतकर यांचे मनोमिलन होणार का?

## भोकरदन येथील रावसाहेब दानवे यांच्या निवासस्थानी दोन्ही नेत्यांत बंद दाराआड चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील एकमेकांचे पारंपरिक व राजकीय शत्रू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाजप नेते रावसाहेब दानवे व शिंदे गटातील शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकर यांची अखेर आज मनोमिलन झाले आहे, मात्र दानवे व खोतकर यांचे मनोमिलन होणार का? असा प्रश्न आता राजकीय वर्तुळात बोलल्या जात आहे.



दरम्यान या दोन्ही नेत्यांची दिनांक ११ सोमवार रोजी भोकरदन येथे बंद दाराआड चर्चा झाली. या भेटीचा तपशील समजला नाही. पण त्यांनी या विधानसभा निवडणुकीत एकमेकांना मदत करण्याची घोषणा केली असल्याचे समजते. यामुळे त्यांच्यातील राजकीय वितुष्ट संपल्याची चर्चा आहे. जालना लोकसभा मतदारसंघात भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना मानहाणीकारक पराभव स्वीकारावा लागला असून तेव्हापासून अर्जुन खोतकर यांच्यासोबतच्या त्यांच्या संबंधांत वितुष्ट निर्माण झाले होते. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपूर्वी दानवे यांनी स्वतःचा उल्लेख जखमी वाघ म्हणून केला होता. तर खोतकर यांनीही देखील आपण कुणाच्याही बापाला घाबरत नसल्याचे ठणकावून सांगितले होते. या विधानांमुळे या दोन्ही नेत्यांतील राजकीय वैर एका नव्या उंचीवर पोहोचल्याची चर्चा होती. पण त्यांनी सोमवारी अचानक एकमेकांना मदत करण्याची भूमिका घेऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे,

### कुणी घडवून आणली रावसाहेब दानवे व अर्जुन खोतकरांची भेट?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जालन्यात प्रचारसभा आहे. या सभेला रावसाहेब दानवे उपस्थित राहणार किंवा नाही याविषयी साशंकता होती. पण खोतकर यांनी स्थितीचे भान राखून दोन दिवसांपासून त्यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सुरू केला होता . यात त्यांच्या निकटवर्तीयांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर सोमवारी सकाळीच या दोन्ही नेत्यांची भोकरदन येथे मनोमिलन झाली असून या भेटीत आपली मनोमिलन होणार का? तसेच आपसातील सर्व गैरसमज दूर होणार का? अशी चर्चा देखील आता रंगत आहे.

### रावसाहेब दानवे यांनी शिवसेनेला मदत करण्याची दिली ग्वाही

रावसाहेब दानवे यांनी शिवसेनेला जालना जिल्ह्यात मदत करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे येथील शिवसेनेचे पारडे जड झाले आहे. दानवे अर्जुन खोतकर यांच्यासोबत पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मी राज्याचा नेता आहे. त्यामुळे मी महायुतीचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. आजच्या मुख्यमंत्र्यांच्या सभेचे निमंत्रण घेऊन स्वतः खोतकर माझ्याकडे आले. ते आले नसले तरी मी त्यांच्या सभेला देखील जाणारच होतो. जालना जिल्ह्यातील महायुतीचे सर्व उमेदवार निवडून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. दानवे यांनी यावेळी राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असल्याचाही विश्वास देखील रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला.

### माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा लाथा मारताना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

दरम्यान हे कोणत्या ना कोणत्या का निमित्ताने चर्चेत असते भोकरदन येथे अर्जुन खोतकर यांनी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्याशी बंद दाराआड चर्चा करून, चर्चा झाल्यानंतर दोन्हीही नेते बाहेर आले असता मा.केंद्रीय मंत्री दानवे हे अर्जुन खोतकर यांचा सत्कार करताना त्यांच्या जवळील एका अल्पसंख्याक कार्यकर्त्याला लाथा मारताना सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्याने शहरात एकच चर्चाझाल्याची दिसून येत आहे,दरम्यान विद्यमान आमदार संतोष यांचा उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी ही मतदारांना काठ्या मारताना व्हिडिओ समोर आला होता, आता त्यातच आधी काठ्या लाथा मारताय निवडून आल्यावर का जीव घेताय असा उल्लेख करेल व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे,

## संक्षिप्त

### नेर-सेवली भागात लोणीकरांचा झंझावात; लाडक्या बहिणी सोबत केला प्रचार



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतूर – मंठा – नेर – सेवली विधानसभा मतदार संघातील परतूर तालुक्यातील आंबा या गावात भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री मा श्री आमदार बबनराव लोणीकर साहेब यांनी जनसंपर्क दौऱ्यात प्रचारा निमित्त आयोजित बैठकीत मतदारांशी संवाद साधला. याप्रसंगी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या महिला लाभार्थ्यांनी परतुर विधानसभा मतदारसंघाची महायुतीचे उमेदवार आमदार बबनराव लोणीकर यांचं ऑप्शन करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महायुती चे नेते, पदाधिकारी, गावातील शेकडो प्रतिष्ठित नागरिक, महिला, युवक, युवती, शेतकरी, शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मतदान अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे -गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

मतदान अधिकाऱ्यांनी नेमून दिलेले काम अचूक व जबाबदारीने पार पाडावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी केले.

विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना सोमवारी (दि. ११) शहरातील भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी नाट्यगृहात निवडणुकीचे दुसरे प्रशिक्षण देण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना गायकवाड बोलत होते. गायकवाड पुढे म्हणाले की, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे कामकाज मतदान केंद्राध्यक्ष तसेच सर्व मतदान अधिकारी यांनी जबाबदारीने पार पाडावे.कामकाज करताना वेळेचे कटाक्षाने पालन करावे.नियमानुसार कामे करावीत.प्रशिक्षणात सांगितलेल्या नियमानुसार सर्व कामे हाताळवीत.काही अडचण असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करावा असेही गायकवाड म्हणाले. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे यांनीही निवडणूक कामकाजा विषयी मार्गदर्शन केले. निवडणूक कर्मचारी संतोष पवार,संजय कास्तोडे,जावेद पठाण,सोपान वडेकर यांनी मतदान यंत्र हाताळणे यासह इतर अनुषंगिक माहिती दिली.पोस्टल बॅलेटबद्दल यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी नायब तहसीलदार विनोद भालेराव,एस. यु. शिंदे,कुलदीप कुलकर्णी,कल्याण काळदाते, दिलीप कुलकर्णी, पठाण सर,लक्ष्मीकांत खळीकर,निवडणूक कर्मचारी रमेश आवटे,विजय बोरुळे,कृष्णा सोनवणे यांच्यासह निवडणूक कर्मचारी उपस्थित होते. सकाळ व दुपार अशा दोन सत्रात हे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाला २६ कर्मचारी अनुपस्थित असल्याची माहिती निवडणूक विभागातून देण्यात आली.

### खर्च निवडणूक निरीक्षक देवप्रकाश बमणावत यांनी केली उमेदवारांच्या खर्च लेख्यांची प्रथम तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील खर्च तपासणीसाठी खर्च निवडणूक निरीक्षक म्हणून देवप्रकाश बमनावत (आयआरएस) यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोगाने केलेली आहे. उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी जालना येथील तहसील कार्यालयात खर्च निवडणूक निरीक्षक देवप्रकाश बमनावत यांनी केली. उमेदवाराच्या प्रचाराच्या कालावधीत किमान तीन वेळा प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करण्यात येत असते. उमेदवारांना व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०३- भोकरदन, १०२-बदनापूर व १०१- जालना विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात आली.

## त्यांना फक्त आरोप करायचे आणि दुसर्याने केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचे काम -अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यानी धावेडी, सोरटीनगरला भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, त्या आमदाराला फक्त दुसर्यांवर नको ते आरोप करायचे आणि दुसर्याने केलेल्या, आणलेल्या कामाचे श्रेय घ्यायचे एवढेच काम शिल्लक आहे. मतदारांनी आता खोट्या भुलथांपाना बळी न पडता, आपला कोण आणि परका कोण यातला फरक ओळखावा आणि येणार्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटण दाबून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहनही श्री. खोतकर यांनी केले.

याप्रसंगी शिवसेना युवासेना, शिवसैनिक, तसेच भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जेष्ठ मंडळी, महिला भगिनी, ग्रामस्थ, युवा पिढी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी अर्जुनराव खोतकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले.



पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, काही भामटे हे आम्ही आणलेल्या योजना चोरतात, आणि पुन्हा आपण योजना आणली म्हणून सांगतात. मेडीकल कॉलेस आपण आले मात्र तो भामटा सांगतो आम्ही आणले, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. आपण सत्तेवर आलो तर संपूर्ण कामगार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा आपण आणले मात्र हा भामटा स्वत:ला जलसम्राट म्हणून घेत आहे. पदवी ही लोकांनी द्यायला हवी. स्वत:तर कोणीही जलसम्राट म्हणून मिरवेल, असे सांगून ते म्हणाले की, राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. त्यामुळे देते देशातील पहिले सरकार ठरले आहे. आपले कोणतेही काम असू द्यात ते मार्गी लावण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही शेवटी श्री. खोतकर यांनी दिले.

## शरद पवार ही एक व्यक्ती नसुन शक्ती आहे -विलास खरात



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड घनसावंगी महाराष्ट्राचे चित्र योग्य दिशेने जावे महाराष्ट्राच्या जनतेचे प्रश्न सुटावे याकरिता मी आपल्या भेटीला आलो, नव्यांची ओळख होते जुन्यांची आठवण येते विलास खरात यांची आणि माजी भेट ही व्यक्तीगत आहे त्यांनी यापूर्वी घेतलेल्या भूमिका मला माहिती असुन राजकारणात ते सक्रिय होवोत त्यांनी समाजाची सेवा अविरत करो अशी त्यांना शुभेच्छा देत असल्याचे पवार यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची माझ्या घरी भेट झाल्यानंतर माझे वडील माझ्या घरी आले असल्याचे आम्ही मानतो शरद पवार ही एक व्यक्ती नसुन एक शक्ती असल्याचे प्रतिपादन विलास खरात यांनी केले. माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी माजी आमदार विलास खरात यांच्या अंबड येथे निवासस्थानी आज दि.१० रोजी भेट दिली यावेळी होळकर राजघराण्यांचे भूषणसिंह होळकर,खा.कल्याण काळे,आ.राजेश टोपे, खा.फौजिया खान,बबलु चौधरी ,बप्पासाहेब गोल्डे आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना श्री.खरात म्हणाले की इथून पुढच्या काळात मला राजकारणात सक्रिय होवू वाटते मला काँग्रेसचा वारसा आहे.जायकवाडी पाणी संघर्ष समितीच्या वतीने अंबड तालुक्यातील अवर्षण प्रवन भागाला देण्यात यावे या मागणीचे निवेदन शरद पवार यांना देण्यात आले.काँग्रेसचे राजाभाऊ देशमुख,राष्ट्रवादीच्या पल्लवी तारडे,शिवसेनेचे हनुमान धांडे,अँड शाम पाटील, चंद्रशेखर मोहरीर, रामभाऊ लांडे, अशोक शिंदे, आदी उपस्थित होते.

## उडानच्या संस्थापिका कीर्ती अग्रवाल उत्कृष्ट आदर्श व्यापारी पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

येथील उडान ग्रुपच्या संस्थापिका, पाककला तज्ञ कीर्ती शिवप्रसाद अग्रवाल यांनी महिलांना कुटीर उद्योग, व्यवसायात चालना देऊन दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स ( कॅट) आणि जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने उत्कृष्ट आदर्श व्यापारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सकलेचा नगर परिसरातील जैन भवन येथे रविवारी ( ता. १०) झालेल्या दिपावली स्नेहमिलन कार्यक्रम, पुरस्कार वितरण सोहळ्यात कॅट चे प्रदेशाध्यक्ष सचिन निवंगुणे, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब, शहराध्यक्ष सतीश पंच, सुखदेव बजाज आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन कीर्ती अग्रवाल यांच्या कार्याचा कुटूंबियांसह गौरव करण्यात आला. दरम्यान सर्वसामान्य कुटुंबातील कष्टकरी महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या व्यापक दृष्टिकोनातून कीर्ती अग्रवाल यांनी कोरोना संसर्गजन्य परिस्थितीत 'उडान' ग्रुप ची स्थापना केली. दैनंदिन कामांसाठी आवश्यक असलेल्या सेवा, गृहोपयोगी वस्तू, दागिने, कपडे, सौंदर्य प्रसाधने, खाद्यपदार्थ ,आदी साहित्यांसह घरकाम,करणाऱ्या कष्टकरी महिला आणि ग्राहक यांच्यात समन्वय घडवून आणला.

याशिवाय वेळोवेळी खरेदी मेळावे आयोजित करून ग्राहकांना माफक दरात दर्जेदार वस्तू, सुविधा उपलब्ध होतात. सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी मागील चार वर्षांपासून कीर्ती अग्रवाल यांची धडपड सुरू आहे.जालना आणि छत्रपती संभाजी नगर येथील तब्बल १७०० महिलांचे संघटन त्यांनी उभे केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत कॅट आणि व्यापारी महासंघाच्या वतीने पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी व्यापारी , महिला तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुरस्कार मिळाल्याबद्दल उडान ग्रुपच्या सदस्यांनी कीर्ती अग्रवाल यांचे अभिनंदन केले आहे.

## माझ बूथ -सर्वात मजबूत अभियान आपल्या गावात राबवा -अविनाश राठोड

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

नायगाव येथे महायुतीचे उमेदवार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ चर्चासत्राचे नियोजन करण्यात आले होते.याप्रसंगी बोलताना मा.तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा मंठा अविनाश राठोड यांनी आपले बूथ हे मजबूत असले पाहिजे असे झाल्यास विजय आपला निश्चित आहे.,असे त्यांनी गावकऱ्यांना बोलताना सांगितले.लोणीकरांनी तालुक्यात केलेल्या विकासाचा कामाचा लेखाजोखा गावकऱ्यांना सांगितले.नायगाव मध्ये ग्रामपंचायत कार्यालय,जगदंबा मातेच्या पटांगणात सभा मंडप, वॉटर ग्रेड योजनेतून सर्व



गावकऱ्यांना स्वच्छ फिल्टरचे पाणी, ग्रामपंचायतला वैयक्तिक फिल्टर,विद्युतीकरणाचे अनेक पोल आणि त्यावर स्टेट लाईट, अनेक अंतर्गत सिमेंट रस्ते, शाळेला सुसज्ज प्रयोगशाळा, शेतकऱ्यांना विकासाकरिता खोराड सांवगी धरण पूर्ण करून देणे, प्रधानमंत्री,यशवंतराव चव्हाण आणि रमाई योजनेतून विविध गोरगरिबांना घरकुल आवास प्राप्त करून देणे, ३७० माता -भगिनींना लाडकी बहीण योजनेतून लाभ मिळवून देणे,अपंगांना साहित्य देणे, शेतकऱ्यांना चार्जिंग चे फवारे देणे, इतर कामे लोणीकरांच्या सहकार्याने झालेले आहेत. शेवटी त्यांनी लोणीकरांच्या विकासातून बूथ कार्यकर्त्यांना आपले बूत मजबूत करण्यासाठी अथांग परिश्रम घ्यावे अशी विनंती त्यांनी मंठा तालुक्यातील कार्यकर्त्यांना त्यावेळी केली. याप्रसंगी बबनराव लोणीकर सह नायगाव येथील अनेक गावकरी उपस्थित होते.

### पाच हजार समर्थकांसह आष्टीत महायुतीचे उमेदवार आ.बबनराव लोणीकरांची प्रचार फेरी

## भ्रष्टाचारी महाविकास आघाडीला मतदार त्यांची जागा दाखवतील - आ.लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**आष्टी/प्रतिनिधी**

प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्या-वेतन महायुती सरकार देईल. या बरोबर गावा गावांत पांदण रस्ते बाधणार, अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.



परतूर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदार संघातील परतूर तालुक्यातील आष्टी या गावात भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री मा श्री आमदार बबनराव लोणीकर साहेब यांनी जनसंपर्क दौऱ्यात प्रचारा निमित्त पाच हजार समर्थकासह भव्य पदयात्रा करीत आष्टीतील मतदारांशी संपर्क साधला. या पद यात्रेत आष्टीतील मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे पहावयास मिळाले. याप्रसंगी पदयात्रेनंतर आयोजित सभेत उपस्थित समर्थकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं. महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असताना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यामुळे माता भगिनी महाविकास आघाडीला नक्कीच त्यांची जागा दाखवतील असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत महिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिली. भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघन कणसे, रमेश भापकर, संपत टकले, रवी सोळंके, माजी सभापती रंगनाथ येवले, प्रदीप ढवळे, तुकाराम सोळंके, अर्जुन राठोड, बंकट सोळंके, सुदाम प्रधान, सीताराम राठोड, सुरेश जगताप, नंदू गांजे, विलास सोळंके, गजानन लोणीकर, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विष्णू काका शहाणे, खंडेराव काका पाटील, मोहन काका आठवे, रामदास काका सोळंके मोहम्मद भाई जमीनदार शफीभाई कुरेशी सादेकभाई कुरेशी माजी सरपंच बाबाराव दादा थोरात श्री सर गांजाळे बाबुरावजी गोसावी सरपंच मधुकर मोरे उपसरपंच नसरुलाखा काकड ग्रामपंचायत सदस्य असिफ भाई कच्छी अनंता आगलावे रमेश थोरात मारोती थोरात उमेश सोळंके रफिक भाई राज बबलू सातपुते सईद शेख बळीराम थोरात अल्ताफ कुरेशी मुजीब भाई राज शिवशक्ती आढाव छत्रपती थोरात अशोक शेळके सर रवी लोंढे योगेश मोरे तसेच व्यापारी महासंघाचे सर्व प्रमुख व संपूर्ण व्यापारी डॉक्टर व मेडिकल असोसिएशनचे सर्व प्रमुख पदाधिकारी व संपूर्ण डॉक्टर व सर्व केमिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# ब्राह्मणवाडा गावातील मुख्य रस्ता सा.बां.विभागाने गत महिनाभरापूर्वी एकसाईड खोदून ठेवल्यामुळे संबंधित शाखा अभियंता यांच्यावर गुन्हा दाखल करा

## एकनाथ ब्राह्मणवाडेकर यांची मुख्य अभियंता यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ नोव्हेंबर**

ब्राह्मणवाडा गावातील मुख्य रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने गत महिनाभरापूर्वी एक साईड खोदून ठेवला असल्याने लोकांना त्यांच्या घरात जाता येत नाही. साईडची नाली २ फुटाची आहे, त्यामुळे तीन वयोवृद्ध माणसं नालीवरून पडल्यामुळे रूग्णालयात उपचार घेत आहेत, याला सर्वस्वी जबाबदार काम करत असलेली कंपनी व शाखा अभियंता यांच्यावर गुन्हा नोंद करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे, या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकाही अभियंता यांच्याकडे एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी दिले आहे.

याबाबतीत एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी अनेक दिवसांपासून मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकाही अभियंता यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. २५ दिवसापूर्वी गावातील एक साईड सिमेंट रोड या कंपनीने खोदून ठेवला व गावास वेठीस धरले आहे. यामुळे ये-जा करण्यास लोकांना त्रास होत आहे. करिता लवकरात लवकर सिमेंट रोडचे काम करण्यात यावे, अशी मागणीही केली आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे गावातील दोन्ही साईडची नाली बाबतीत जवळपास ७० ते



८० लोकांचे बांधकाम होते. त्या बाबतीत केवळ अदांजित ३५ लोकांना नालीवरील बांधकामाचा मोबदला सा.बां. विभागाने दिला आहे. बाकी अंदाजित ४० लोकांना मोबदला मिळाला नाही. याबाबतीत येथील शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत चुकीची नोंद केल्याची तक्रार ब्राह्मणबाडेकर यांनी केली आहे. या बाबतीत कार्यकारी अभियंता यांनी लेखी आश्वासन देऊनसुद्धा कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. करिता चुकीची मोजमाप पुस्तिका करणाऱ्या शाखा अभियंता यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी व गावालगत असलेल्या फालाजी सोनटक्के व डिगांबर सोनटक्के यांच्या शेतात चुकीचा पाईप या शाखा अभियंताने टाकल्याने त्या शेतकऱ्याने काम अडवले होते. करिता त्या शेतकऱ्याच्या लगत असलेल्या गावातील रोडवर कोणताही पाईप टाकू नये. याबाबत भविष्यात कोणतीही परिस्थिती उदभवल्यास हे शाखा अभियंता जबाबदार राहतील. तसेच अंदाजपत्रकानुसार काम करावे, असेही निवेदनात म्हटले आहे.

## 'वागले की दुनिया' मालिकेत आर्थिक घोटाळ्यांविरुद्ध जागरुकतेचा प्रयत्न

सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' मालिका नेहमी सामान्य माणसाला दैनंदिन आयुष्यात सतावणाऱ्या समस्या आपल्या मालिकेतून दाखवत असते. मालिकेच्या अलीकडच्या भागात राजेश वागले (सुमित राघवन)ची बॉस कियारा (अंजू जाधव) एका भयंकर आर्थिक घोटाळ्यात अडकली आहे. एकामागून एक तणाव वाढवणाऱ्या घटना घडतात आणि आपण चौकशी अधिकारी असल्याचे नाटक करणारा घोटाळेबाज कियाराला एक फसवा आर्थिक व्यवहार करायला भाग पाडतो. काहीतरी गडबड असल्याची शंका येऊन राजेश मध्ये पडतो आणि जास्त नुकसान होण्यापासून रोखतो.

## कर्जत जामखेड विधानसभा समन्वयकपदी प्रा. बेरड

अहिल्यानगर : जिल्ह्यातील कर्जत जामखेड मतदार संघाच्या समन्वयक पदी माजी जिल्हाध्यक्ष



प्रा. भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश भाजपाने ५५ मतदारसंघांमध्ये समन्वयक नेमले असून त्यांच्याकडे बुथ यंत्रणा नियोजन, प्रचार प्रसिद्धी व्यवस्थापन यासाठी पूर्ण वेळ जबाबदारी देण्यात आली आहे.

# ग्रामीण भागात गुलाबी थंडीत निवडणुकीच्या चर्चांना आले उधाण

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ११ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची धामधूम जिल्हाभर गतीने सुरू असताना ग्रामीण परिसर राजकीय चर्चांनी अक्षरशः ढवळून निघत आहे. गुलाबी थंडीत या निवडणूक खलबतांनी वातावरण अगदी तापल्याचे चित्र जागोजागी पहायला मिळत आहे. परंपरागत शेकोटीचा आधार घेताना शेतीविषयक, रोजगार, हमीभाव आदि चर्चेसह ओघाने अनायासे आगामी निवडणूकीच्या गप्पांचाही फड जिकडे तिकडे रंगू लागला आहे. अमूकतमुक पक्षांकडून नवे जुने उमेदवार आपले विचार समाज माध्यम किंवा वृत्तपत्रातून पटवून देण्यात प्रयत्नशील आहेत.निवडणुका नेहमीप्रमाणे येतात जातात मात्र दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होताना दिसून येत नाही.राजकीय पुढारी,लोकप्रतिनिधी,एखाद्या गावात येतात अमूकतमुक कामाचे भूमिपूजन किंवा उद्घाटन करतात आणि सोशल मिडिया व वृत्तपत्रातून प्रसिद्धीपुरता कामाचा गवगवा करतात.मात्र,त्या सदरील कामाचा पाठपुरावा करायला चक्क विसरूनही जातात.हा नेहमीचा कित्ता मग निवडणुकीत पुन्हा वापरतात.

यंदा खरीप हंगामात शेतकरी अगदी मेटाकुटीला आला आहे. पीक बाजारात येईपर्यंत ऐनवेळी हमीभावाची घसरण जाणूनबुजून केली जाते. शेतकऱ्यांची दैना होताना कोणताच पुढारी, सरकार त्याचा खंबीरपणे विचार किंवा जबाबदारी स्वीकारत नाही.हिवाळी अधिवेशन किंवा विधानसभेत एखादा मुद्दा मांडला जातो, मात्र त्याचा पाठपुरावा त्यानंतर कुणीच करीत नाही.प्रसंगी एखादी तुटपुंजी मदत मिळते त्याचा भलताच गवगवा केला जातो. बेरोजगार तरूणांचे तांडेच्या तांडे गावोगावी हाऊसफुल्ल आहेत.बेरोजगार तरूण रोजगारविना देशोधडीला लागत आहेत.त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळवून देण्यात तत्कालीन सरकार अपयशी ठरले आहे. कंत्राटीकरण करण्याचा मनसुबा सरकारचा आहे.महागाईचा उच्चांक शेतकरी,शेतमजूर,कष्टकरी सर्वसामान्य लोकांचे कंबरडे मोडून ठेवले आहे. लोकप्रतिनिधी किंवा कोणतेही सरकार आले तरी शहरी व ग्रामीण समस्यांबाबत 'जैसे थे'अशी परिस्थिती पुन्हा का निर्माण होते? नवीन उमेदवार निवडून जरी आला तरी मागचाच कित्ता का गिरवला जातो?

अशा एक ना अनेक प्रश्नांची सरबत्ती राजकीय पुढाऱ्यांना प्रचारास आल्यानंतर सर्वसामान्य मतदारांकडून, जनतेतून रोखठोक केली जात आहे. निवडणुकीनंतर शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, युवकांसाठी रोजगार, महिला व जेष्ठांचे कळीचे प्रश्न, पिकविलेल्या मालास हमीभाव, महागाईवर नियंत्रण, आरोग्य विषयक योजना, तरूणांना नौकरी, सरकारी आर्थिक योजना अशा सर्वसामान्य, कष्टकरी, गरजूंचा सकारात्मक विचार करणारे स्थिर सरकार हवे असल्याचे मतदारांकडून व्यक्त केले जात आहे.इकडून तिकडे बिनकामी स्वहितासाठी कोलांटउड्या मारणारे सरकार किंवा पुढारी जनतेला नको आहेत.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 111 - Gangapur | Prashant Bansilal Bumb | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Judicial Magistrate First Class Court, Gangapur. RCC No. 64/2022 Pending. | U/s. 420, 406, 467, 468, 469, 471, 472, 474, 34, 120Bof IPC. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrate, Aurangabad. CC No. 4351/2024 Pending. | U/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 111 -Gangapur**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**


# देशातील तरुणांसाठी कौशल्य विकास मोहिम,राष्ट्रीय शिक्षण दिनी टोयोटा किर्लोस्कर मोटरचा पुढाकार

बंगलोर : देशातील तरुणांची कौशल्यातील दरी दूर करत त्यांना रोजगारासाठी सक्षम करण्यासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने पुढाकार घेत समाजाविषयी आपल्या वचनबद्धतेची पुष्टी केली केली. राष्ट्रीय शिक्षण दिनाचे निमित्त साधून समुहातर्फे संपूर्ण कर्नाटक आणि देशातील आर्थिकदृष्ट्या वंचित तरुणांना सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे. रोजगाराचे नवीन मार्ग तयार करताना स्वावलंबनाला चालना देऊन देशाच्या औद्योगिक विकासात योगदान देता यावे, हा त्यामागचा उद्देष आहे.

२००७ मध्ये स्थापन टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ही टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाच्या मिशनचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. गेल्या १५ वर्षांहून अधिक काळात या माध्यमातून ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील तज्ज्ञ आर्थिकदृष्ट्या वंचित घटकातील तरुणांना मोफत, उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करीत आहेत.

संस्थेमार्फत तीन वर्षांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. यात तरुणांना केवळ तांत्रिक कौशल्येच प्रदान केले जात नाहीत तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे. हा निवासी अभ्यासक्रम प्रशिक्षण, जागतिक उत्पादन पद्धतींची सखोल माहिती, भौतिक आणि समुदाय विकासासाठी सक्रिय सहभाग यावर मुल्यांवर भर देतो.

ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या कुशल तंत्रज्ञांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि महिला सक्षमीकरणाला पाठिंबा देण्यासाठी, टोयोटा किर्लो स्कर मोटर समुहाने (ढघच् ) ने अलीकडेच टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (ढढढख) मधील प्रशिक्षणार्थींची क्षमता १,२०० विद्यार्थ्यांपर्यंत दुप्पट केली आहे. यात ६०० महिला विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आहेत. संस्था निवासी सुविधा, प्रगत वर्गखोल्या आणि तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून दिले जाते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विजय चव्हाण यांनी ठाकरे गटाचे शिवबंधन बाधले

तभा वृत्तसेवा
बिडकीन दि. ११ नोव्हेंबर

महाराष्ट्र राज्य मध्ये विधानसभा निवडणूक काळामध्ये अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष सह कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश,पैठण तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष तभा जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांच्यासह पदाधिकारी यांनी आज दि .११ रोजी जिल्हाप्रमुख तथा महाराष्ट्र विधानसभा विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट मध्ये प्रवेश केला, आगामी विधानसभा



निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस मोठा धक्का देत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केल्याने महायुतीला विधानसभा निवडणुकीमध्ये धक्का बसण्याचा संभव नाकारता येत नाही, यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण,बिडकीन ग्रामपंचायत सदस्य अविनाश राठोड, अजय राठोड,हाफीज इनामदार,शेख अख्तर, आशुतोष नरवडे, संजय पवार,आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 83 - Kinwat | BHIMRAO RAMJI KERAM | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble JMFC Court, Yewatmal. CC No. 4456/2017 Pending. | U/s. 341, 143, 188, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 83-Kinwat**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



प्रपत्र सि- १

(उमेदवाराने वृत्तपत्र, दुरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)
फौजदारी प्रकरणाबातचे घोषणा पत्र

(मा.सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) कमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेषन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दि.२५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार)

उमेदवाराचे नांव व पत्ता :- श्री तान्हाजी सखारामजी मुटकुळे, मु. पो. आडगांव, ता. जि. हिंगोली.
राजकीय पक्षाचे नांव :- भारतीय जनता पार्टी.
(अपक्ष उमेदवारांने अपक्ष असे लिहावे)
निवडनुकीचे नांव :- विधानसभा सार्वत्रिक निवडणुक महाराष्ट्र राज्य २०१९
मतदार संघाचे नांव :- ९४ हिंगोली विधानसभा मतदारसंघ

मी तान्हाजी संखारामजी मुटकुळे (उमेदवाराचे नांव) वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असुन माझ्या फौजदारी पुर्वचारीत्र्याबदलचा पुढील तपसिल जनतेच्या माहितीसाठी घोषीत करित आहे.

| अ. क्र | प्रलबित फौजदारी प्रकरणे | | | फौजदारी अपराधासाठी दोषीसिध्द ठरविलेल्या प्रकरणाचा तपशील | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व प्रकरणाची सध्यस्थिती | सबधित अधिनियमाची कलम (कलमे) आणि अपराधाचे (अपराधाचे) थोडक्यात वर्णन | न्यायालयाचे नांव व आदेशाचा (आदेशाचे दिनांक) | अपराधाचे (अपराधाचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा |
| १. | मा न्यायदडाधिकारी प्रथम वर्ग हिंगोली | एस.सी.सी.न ३११/२०२१ हजेरीसाठी | कलम १४३.१८८ भादवी गैर कायदेशीर मंडळी जमवण्यासाठी शिक्षा व लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा करणे | लागू नाही | लागू नाही |
| २. | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हिंगोली | क्री.एम.ए.नं. १९९/२०२२ हजेरीसाठी | कलम १८८ भा.द.वी. लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा करणे | लागू नाही | लागू नाही |

राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदार संघाच्या नावांच्या जागी संबंधीत निवडणुकीचे नांव नमूद करावे.
टीप (१) प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र ओळीमध्ये स्वतंत्र तपशील द्यावा.

दि. ०६/११/२०२४
ठिकाण : हिंगोली
हिंगोली

उमेदवाराची सही
नांव : तान्हाजी सखारामजी मुटकूळे



**Format C-1**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate: Pramod sakharam kute, M. Po. Mangalwara bazar, Hingoli, Tq. Zilla Hingoli.**
**Name of political party : Maharastra Navnirman Sena.**
(Independent candidates should write "Independent" here)
**Name of Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of Constituency: Hingoli 94**

I **Pramod sakharam kute** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|
| १. मा. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग हिंगोली. | एसएससी ८३५/२०२४ | हजेरी | कलम ४४७, ४२७, ६०४, ३४ भा.द.वी |
| २. मा. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग हिंगोली. | आर.सी.सी. २६७/२०२१ | हजेरी | कलम ३२४, ३४१, ३२३ भा.द.वी. |
| ३. मा. जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली. | एसटी ३२/२०२२ | हजेरीसाठी | कलम ३५३, १४३, १४७ भा.द.वी. |
| ४. मा. जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली. | एसटी नं. १५/२०१७ | उलट तपासासाठी | कलम ३९५, १४७, १४९, Armsact. & B.P.Act. |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl.no. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Imposed Punishment |
|---|---|---|---|
| | Nill | Nill | Nill |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

दि. 07/11/2024

उमेदवाराची सही/-
नाव. प्रमोद सखाराम कुटे

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमायात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ


## मन्मथ स्वामींची कार्तिक पौर्णिमेची ४५०वर्षाची अखंडित परंपरा आजही कायम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंड ामध्ये त्यांनी कीर्ती केली.

महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. 'संत ज्ञानेश्वर' आणि 'संत मन्मथ स्वामी' मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षां पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून 'श्रीक्षेत्र कपिलधार' महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड, श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येणार्या १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात. या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे.

४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म माघ शुद्ध पंचमी १४८२ ला झाला.जगाला पवित्र करण्याचे सामर्थ्य या वीरशैव कुळामध्ये आहे. त्याच कुळामध्ये ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी मन्मथ स्वामी यांच्या आई पार्वती आणि वडील शिवलिंग स्वामी यांच्या पोटी झाला. मन्मथ स्वामी यांचा जन्म दिनोदर बाबा यांच्या आशीर्वादाने झाला होता. त्यांनी शिव सांप्रदायाचा पाया रोवाला तसेच लिंगायत वीरशैव साहित्याचे व समाजाचे ते जनक आहेत. भजन कीर्तन नामस्मरण ही परंपरा त्यांनी चालू केली. तसेच मन्मथ माऊलींनी शिव संप्रदायाचा पाया रचला व क्लस हा शिवसंत लक्ष्मण महाराजांनी




रचला. लक्ष्मण महाराजांची समाधी जोड आष्टी येथे आहे. मन्मथ माऊलींनी पहिली ध्वज पताका खांद्यावर घेऊन कपिलधार ते शिखर शिंगणापूर पदयात्रा काढली.

या ठिकाणची आख्यायिका-या ठिकाणी कपिल मुनी यांचं वास्तव्य होतं. कपिल मुनी यांची गंगासागर येथे समाधी आहे. कपिल मुनी हे तपस्वी असल्यामुळे त्यांनी हे क्षेत्र दिनोदर बाबा यांच्या ओटीमध्ये टाकलं म्हणजे त्यांना दान केलं. दिनोदर बाबा हे एक तपस्वी महाराज होते. ते या ठिकाणी असलेल्या पंचकुंडाच्या ठिकाणी गुप्त झाले. त्याअगोदर दिनोदर बाबा यांनी हे तीर्थक्षेत्र मन्मथ स्वामी यांना स्वाधीन केलं होतं. मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी तपश्चर्या करून वयाच्या २६ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली.

*संजीवनी समाधी घेणारे महाराष्ट्रातील दुसरे संत- मन्मथ स्वामी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणार्या कपिलधार या ठिकाणी गेले. ४५९ वर्षापासूनची ही परंपरा व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. संजीवनी समाधी घेणारे हे महाराष्ट्रातील दुसरे संत म्हणून ओळखले जातात. मन्मथ स्वामी यांनी 'परम रहस्य' हा ग्रंथ कपिलधार या ठिकाणी लिहिला. त्यावेळी त्याठिकाणी दुसरं प्राणी देखील वास्तव्यास होते. अनेक वाघ, सिंह, साप या ठिकाणी वास्तव्य होते. ज्यावेळी मन्मथ स्वामी त्या ठिकाणी तपश्चर्या करत असत त्यावेळी त्यांच्या अंगा खांद्यावर साप खेळत असत असा त्यांचा अनेक वर्षापासूनचा इतिहास आहे.

## पाली तलावात अनोळखी प्रेत आढळले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**



बीड पासून जवळच असणाऱ्या पाली तलावात अनोळखी प्रेत दि.११ रोजी सापडल्याची माहिती ग्रामीण पोलिस स्टेशनचे पो.कॉ.आनंद मस्के यांनी दिली. हा व्यक्ती कोण आहे कुठून आला ? हत्या झाली की आत्महत्या ? या संदर्भात ग्रामीण पोलिस चौकशी करत आहेत. पाली तलावात मिळालेल्या या अनोळखी प्रेत मिळाल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. याची ओळख पटलेली नाही.पोलिस ओळख पटविण्याचे काम चालू आहे.

# मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवावेत, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.



बीड तालुक्यातील चौसाळा, गेवराईतील गेवराई, गुळज, मारफळा, राजपिंप्री, मालेगाव खु., किनगाव, शिरूर कासारमधील जाटनांदूर, मातोरी, पाटोद्यातील पिठ्ठी, आष्टी तालुक्यातील पिंपळा, दौलावडगाव, खडकत, आष्टा ह.ना. केरूळ, डोईठाण, हातोला, माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी, एकदरा, गंगामसला, माजलगाव, वडवणी तालुक्यातील वडवणी, अंबाजोगाईतील लोखंडी सावरगाव, केजमधील लव्हुरी, बोरगाव बु., परळी तालुक्यातील पोहनेर, नागापूर याठिकाणी मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार अन्य दिवशी भरवावेत, असेही आदेशात नमूद आहे.

## शेतकरी क्रांति मोर्चा संघटनेचा केज विधानसभा मतदारसंघात महविकास आघाडीला जाहीर पाठिंबा



**संघटनेचे अध्यक्ष कुलदीप करपे यांची भूमिका जाहीर**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका सद्या सुरू असुन २३२ केज (अ. जा.)विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी कडुन अधिकृत उमेदवार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस -शरद पवार पक्षाचे श्री.पृथ्वीराज साठे निवडणूक लढवत आहेत. केज विधानसभा मतदारसंघात सद्या अनेक समस्या असुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्वच राजकीय पक्ष उदासीन आहेत .आमदार झाल्यावर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबरोबरच सोयाबीन, कापूस, ऊस, तूर, आदि. शेतमालाला रास्त भाव मिळवण्यासाठी विधिमंडळात आवाज उठवून शासनादरबारी विशेष प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली.शेतकरी क्रांति मोर्चा संघटनेचे अध्यक्ष मा. श्री. कुलदीप करपे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख उपस्थितीत केज येथील जनसंपर्क कार्यालयात दि.१० नोव्हेंबर २०२४ रविवारी मुख्य पदाधिकऱ्यांची तातडीची बैठक संपन्न झाली. २३२ केज (अ. जा.)विधानसभा निवडणुकीत शेतकरी क्रांती मोर्चा संघटनेच्या वतीने सर्वानुमते महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष आनंद ढाकणे, जिल्हा कार्याध्यक्ष शरद इंगळे ,केज तालुकाध्यक्ष अतुल गवळी, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अभिजित लोमटे ,केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण ,जेष्ठ शेतकरी नेते प्रमोद पांचाळ ,सुग्रीव करपे ,आदी शेतकरी क्रांती मोर्चा चे केज विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी ,कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत परळी शहरात ठीक ठिकाणी प्रचार रॅली

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ नोव्हेंबर**



परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना, उबाटा, महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी शहरात दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी परळी शहरात ठीक ठिकाणी प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदार बंधू भगिनींना परळी शहरातील विविध समस्या सोडविण्यासाठी मला मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी मतदारांना केले. रॅलीस नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.


राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, परळी शहर काँग्रेस चे सर्व पदाधिकारी महिला आघाडी, युवक काँग्रेस, सर्व सेल, सर्व फ्रंटचे कार्यकर्ते यांनी दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. महाविकास आघाडी चे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत गणेशपार ते धनगर गल्ली, बंगला, आयेशा कॉलनी, मोमदिया कॉलनी आदी परिसरामध्ये प्रचार फेरी काढण्यात आली होती. रॅलीमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मतदान रुपी आशीर्वाद देऊन सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन मतदार बंधू भगिनींना केले.

या रॅलीत वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बहादूर भाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष जीवनराव देशमुख, डॉ. दुष्यंत देशमुख, शशीशेखर चौधरी, कॉ. उत्तम माने, बाबा शिंदे, सय्यद फिरोज, शिवाजी देशमुख, रणजीत देशमुख, दीपक शिरसाट, सुनील मस्के, बद्दरभाई, सद्दाम शेख, रसूल खान, इतेशामा खतीब, सुभाष देशमुख, गफार शहा, वैजनाथ गडेकर, जावेद भाई, मजहर बाबा शेख, अबूतला आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीस मतदार बंधू भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

## डॉ रेणुका भिमाशंकर फुटके हीची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम

### परळीचा शिरपेचात मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ नोव्हेंबर**



शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी भिमाशंकर फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावत परळीचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

शहरातील शास्त्रीनगर भागातील सेवानिवृत्त शिक्षक भिमाशंकर फुटके व आशा फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. डॉ रेणुचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शहरातील न्यु हायस्कूल मध्ये तर उच्च माध्यमिक शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तर वैद्यकीय शिक्षण मुंबई येथील लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण झाले. यानंतर डॉ रेणुकाने मुंबई येथे प्रॅक्टीस करत २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए ची परिक्षा दिली होती. यापरिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत ओबीसी वर्गातून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

भिमाशंकर फुटके यांच्या चारही मुली उच्च शिक्षीत

फुटके यांनी आपल्या चारही मुलींना उच्चशिक्षण दिले आहे. सोनम शिक्षीका, मिनाक्षी आयआयटी मधून पिएचडीकरुन बेंगलोर येथे नौकरी करत आहे, मेघा कॅनरा बँकेत शाखाधिकारी, डॉ. रेणूका एमबीबीएस डॉक्टर नंतर आता मेडिकल ऑफीसर बनली आहे.

## मायबाप जनता मला तिसऱ्यांदा आशीर्वाद देईल-पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.११ नोव्हेंबर**



आताची विधानसभा ही माझी तिसरी निवडणूक आहे. पहिल्या पाच वर्षात जी आश्वासने मी दिली होती ती पूर्ण केली. यानंतर मतदारांनी मला पुन्हा २०१९ च्या निवडणुकीत दुसऱ्यांदा आशीर्वाद दिले. अन या दहा वर्षाच्या काळात मी केलेल्या विकास कामाच्या आश्वासनाची वचनपूर्ती झालेली आसून याचे मला समाधान आहे. आता या निवडणुकीतही मायबाप जनता मला याच विकासाच्या बळावर तिसऱ्यांदा आशीर्वाद देईल असा विश्वास आ. लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केला.

दि. ११ रोजी गेवराई विधानसभा मतदार संघातील मादळमोही येथे आयोजित प्रचार सभे प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जे डी शहा, विठ्ठल मोटे, याहीया खान, मातीन कुरेशी, जगदीश पवार, पवन गावडे, विष्णू तळेकर, रमेश तळेकर, मधुकर यादव, संदीप आंधळे, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, मागच्या दहा वर्षापेक्षा हे पुढचे पाच वर्ष माझ्यासाठी महत्त्वाचे आहेत, गेल्या दहा वर्षात आपण अनेक विकास कामे केलेले आहेत, आता आपण चिखलाच्या बाहेर आलोत म्हणून आता येणाऱ्या काळात शेतकऱ्यांसाठी २४ तास वीज आणि सिंचनाच्या प्रश्नावर काम करायचे आहे. निवडणुकीच्या आधी आरडीएसएस मार्फत महावितरण च्या नूतनिकरणासाठी मी ८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतलेला आहे. येणाऱ्या काळात तो जर व्यवस्थित वापरला तर शेतकऱ्यांसाठी १८ तास उच्च दाबाने वीज पुरवठा होईल. यानंतर सिंचनासाठी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी पात्रातील पाणी सिंदफणा नदीच्या पात्रात आणण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार असून यामुळे या पात्राच्या शेजारील गावच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे हेच आपले प्रमाणिक उद्दिष्ट असून या आश्वासनाची पूर्तता येणाऱ्या काळात नक्कीच केली जाईल असा विश्वास त्यांनी दिला. तर गेल्या दहा वर्षात आपण प्रामाणिक काम केल्यामुळेच विरोधकांची दहशत आता संपली आहे. म्हणून लोक आज आपल्याला प्रत्यक्ष भेटून पाठिंबा देत असल्याने या निवडणुकीत मागील निवडणुकीपेक्षा अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. म्हणून आपण येणाऱ्या २० तारखेला १५ क्रमांकाच्या रिक्षा या चिन्हा समोरील बटन दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करून हा विकासाचा रथ असाच कायम पुढे चालू ठेवा असे आवाहन आ.लक्ष्मण पवार यांनी केले. यावेळी मादळमोहीसह परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जनतेच्या सेवेसाठी कायम तत्पर राहणार-खांडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**



बीड विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, शेतमजुर व कष्टकऱ्याना न्याय देण्यासाठी मी नेहमीच प्रयत्नरत राहिलेलो आहे.आतापर्यंतच्या लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासनांची खैरात वाटली. विकास नावाचा प्रकार त्यांना माहिती नव्हता म्हणूनच बीड विधानसभा क्षेत्राची भकास अशी ओळख निर्माण झाली आहे. शासकिय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासकिय व प्रशासकिय पातळीवर प्रयत्न केलेले आहेत. हे बीडच्या जनतेला माहित आहे. बीड विधानसभा क्षेत्रा विकासाचा नवा सुर्य आणण्यासाठी मी अधिकचे प्रयत्न करणार असून यापुढेही असेच भरीव कार्य करण्यासाठी मतदानरुपी आशिर्वाद द्या असे आवाहन महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार कुंडलिक खांडे यांनी केले.

# वाचनाने जीवन घडते डॉ.डी.एस.कुलकर्णी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

डॉ हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीड बीड तालुक्यात विविध विषयावरील ग्रंथ ,मासिके कादंबरी ऐतिहासिक समृध्द आहे. वाचन संस्कृतीतील एक मुख्य भाग हे वाचनालय कार्यरत आहे. डॉ डी एस कुलकर्णी यानी त्यांच्याकडील ग्रंथसंपदा वाचनालयास सप्रेम भेट दिली. वाचनालयाच्या ग्रंथसंपदेत वाढ झाली व या ग्रंथाचा वाचक सभासदाना लाभ होईल विविध विषयाची हे ग्रंथ आहेत वाचनाने जीवन घडते तरी वाचकानी याचा लाभ घ्यावा असे डॉ डी एस कुलकर्णी यानी मत व्यक्त केले. यावेळी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर, डॉ.डी.एएस.कुलकर्णी सौ.कुलकर्णी, साळुंखे, ग्रंथपाल रमाकांत शेरकर सुरेश जाडे उपस्थित होते .गजानन जगताप प्रमोद कुलकर्णी रविंद्र देशमुख प्रा शशिकांत पसारकर संचालक मंडळ सदस्यानी याचे स्वागत केले.

## एमआयएमचे माजी नगरसेवक शेख शरीफ यांचा धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



शरीफ भाईंची घरवापसी, जोमाने काम करणार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ नोव्हेंबर**

परळीतील एम आय एम चे नेते व माजी नगरसेवक शेख शरीफ यांनी एम आय एम ला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा परळी विधानसभेचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरीफ भाईंचे स्वागत करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शरीफ भाई हे पूर्वाश्रीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच कार्यकर्ते होते त्यामुळे परत एकदा घर वापसी केल्यामुळे आपण आनंदी असून आता धनंजय मुंडे यांचे निष्ठेने व अधिक जोमाने काम करणारा असून या निवडणुकीत मी व माझ्या सर्व सहकारी तन-मंदनाने धनंजय मुंडे यांच्या पाठीशी राहतील असा शब्द यावेळी शरीफ भाईंनी दिला. यावेळी शेख शरीफ, वाजेद खान, मुसा भाई, निसार पठाण, पापा ठाकूर, जमील अध्यक्ष, हाजी बाबा, शेख जमिल, युनूस खान, लायक खान यांसह आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## मोटरसायकलच्या धडकेत एक जखमी

छत्रपती संभाजीनगर : भरधाव मोटर सायकलच्या धडकेत एक जण जखमी झाल्याची घटना एमजीएम हॉस्पिटल जवळ घडली. या प्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील बबनराव दाभाडे रा. सिडको प्रतापगडनगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १० नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास फिर्यादी एमजीएम जवळील मनियार मार्केट समोरून मोटरसायकलवर बसून जात असताना आरोपी मोटरसायकल (क्र.एम एच १६ डिके ५९४४) याने निष्काळजीपणे मोटरसायकल चालवून फिर्यादीच्या मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत फिर्यादी जखमी झाले आहेत. फिर्यादीची मदत न करता आरोपी मोटारसायकलस्वार पळून गेला.

## सातारा परिसरात घरफोडी

छत्रपती संभाजीनगर : सातारा परिसरातील अरुणोदय कॉलनी येथे भरदिवसा घरपोडी करीत चोरट्यांनी सोन्या चांदीच्या दागिन्यांसह २२ हजारांचा मुद्देमान लंपास केला. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवम संजय तराळ रा. अरुणोदय कॉलनी यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ९ नोव्हेंबर रोजी फिर्यादी हे घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. होते. सका सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजता दरम्यान चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटात ठेवलेले १७ हजार रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने तसेच ५ हजार रुपये रोख असा २२ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला.

### तरुण भारतच्या बातमीचा परिणाम

# अंजना नदी पात्रावरील बंधाऱ्याचे दरवाजे टाकण्यास सुरुवात

### ग्रामपंचायत व शेतकऱ्यांनी मानले आभार






अंजना नदी पात्रावरील बंधाऱ्याचे दरवाजे बंद करून पाणी अडवण्याची गरज

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.११. नोव्हेंबर- कन्नड तालुक्यातील नाचनवेल येथील अंजना नदीवरील पुलाचे दरवाजे टाकण्यास सोमवार दिनांक ११ रोजी सुरुवात झाली आहे. ग्रामपंचायत व शेतकरी यांनी संबंधित जलसंधारण विभागाला बंधाऱ्याचे दरवाजे टाकण्यासाठी विनंती केली होती तसेच एमसीएन न्यूजने बातमी प्रसारित करून जलसंधारण विभागाला तात्काळ दरवाजे टाकून पाणी अडवण्याची मागणी बातमीच्या माध्यमातून केली होती. या नदीपात्रात अनेक गावाच्या पाणीपुरवठ्याच्या विहिरी असून. भविष्यात गावाला पाण्याची टंचाई होणार नाही यासाठी तसेच जमिनीच्या पाणी पातळीत वाढ व्हावी टिकून राहावी तसेच नदीकाठच्या शेतकऱ्यांना रब्बी पिकांना पाणीसाठा टिकून राहील यासाठी पाणी अडवणे अत्यंत गरजेचे होते. जलसंधारण विभागाच्या प्रशासनाच्या सतर्कतेमुळे व सहकार्यामुळे तत्काळ पाणी अडवण्याचे दरवाजे टाकण्याचे काम सुरू झाली असून ग्रामपंचायत, शेतकरी यांनी जलसंधारण विभाग व एमसीएन न्यूजचे आभार मानले आहे. तसेच पुलाचे अर्धवट राहिलेले काम देखील सुरू असून पुलाच्या दोन्ही बाजूला बेरिगेट बसवण्याचे काम सुरू आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शिवाजी थोरात, उपसरपंच रावसाहेब शिंदे, सदस्य आकाश चौथमल , दीपक धुमाळ, ग्रामपंचायत कर्मचारी किशोर थोरात आदी उपस्थित होते.

## मतदार संघाच्या चेहरा मोहरा बदलण्यासाठी अब्दुल सत्तार यांना विजयी करा : अर्जुन पा गाढे



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.११, ना. अब्दुल सत्तार यांच्या विकासाचा झंझावात समोर विरोधक उभे राहू शकत नाही. पाच वर्षात ते पहिल्यांदा मतदारसंघात फिरत आहेत. मतदारसंघात झालेला विकास पाहून ते स्वतः आश्चर्य व्यक्त करीत आहेत. त्यामुळे कोणत्याही भूलथापांना बळी न पडता. मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना , महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार यांना विक्रमी मतांनी विजयी करा. असे आवाहन जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे यांनी केले.

अब्दुल सत्तार यांच्या प्रचारार्थ कोटनांद्रा येथे प्रचार सभा पार पडली. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने अब्दुल सत्तार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कोटनांद्रा गावाच्या विकासासाठी अब्दुल सत्तार यांनी भरघोस निधी दिला. त्यामुळे कोटनांद्रा गावातून सर्वाधिक मताधिक्य देऊ अशी ग्वाही अर्जुन पा गाढे यांनी दिली. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पाटील गाढे, यांच्यासह सरपंच दिगंबर टाकसाळे, उपसरपंच दादाराव काकडे, सोसायटीचे चेअरमन संजय काळे ,श्रावण निकम, विलास निकम, तालेफ पठाण , शेख जावेद, पंडित जगताप, लक्ष्मण जंगले आदींसह पंचक्रोशीतील मतदारांची उपस्थिती होते.

## विवाहितेचा पाच कोटींसाठी छळ

छत्रपती संभाजीनगर : कंपनीचा विस्तार करण्यासाठी माहेरहूत पाच कोटी रुपये घेऊन ये, असे म्हणत सासरच्या मंडळींनी विवाहितेचा छळ केला. याप्रकरणी सासरच्या मंडळीवर सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहितेने दिलेल्या फिर्यादीनुसार ३० डिसेंबर २०१८ ते मार्च २०२२ या दरम्यान आरोपी पती वीरेंद्र अनिल चव्हाण, सासू ललिता अनिल चव्हाण, दिर अजित अनिल चव्हाण, जाऊ गीतांजली अजित चव्हाण, सुनंदा भास्कर जाधव, भास्कर जाधव, धवल भास्कर जाधव व स्वप्निल आहेर यांनी संगनमत करून विवाहितेचा छळ केला. माहेरहून कंपनीच्या विस्तारासाठी पाच कोटी रुपये आणण्याची मागणी केली.

# स्वीप उपक्रमः प्रत्येक मतदार मतदान करणार जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रचाररथ रवाना

छत्रपती संभाजीनगर, दि.११(जिमाका)- जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदारांमध्ये जनजागृतीसाठी मतदार जनजागृतीसाठी चित्ररथ आज रवाना झाला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलिप स्वामी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या चित्ररथास रवाना करण्यात आले. प्रत्येक मतदार मतदान करणार, अशा घोषणा देत यावेळी उपस्थित प्रत्येकाने आपण स्वतः तर मतदान करुच शिवाय आपल्या संपर्कातील आप्तेष्ट, मित्रमंडळी यांनाही मतदान करण्यास सांगू असा निर्धार व्यक्त केला. केंद्रीय संचार ब्युरो यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या व्हिडीओ चित्ररथातून



जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदारांमध्ये जनजागृतीसाठी सोमवार दि.११ते बुधवार दि.२० पर्यंत मतदार जनजागृतीची मोहिम राबविण्यात येत आहे. चित्ररथास आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हिरवी झेंडी दाखवून चित्ररथास मार्गस्थ केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खीरोळकर. पत्र सूचना कार्यालयाचे सहाय्यक संचालक माधव जायभाये, जिल्हा माहिती अधिकारी डॉ .मिलिंद दुसाने स्वीप कक्षाचे सहायक नोडल अधिकारी स्वप्निल सरदार, आर जे प्रेषित, आर जे श्रेयस, आरजे अर्चना, आयर्न लेडी ऐश्वर्या, आयर्न मॅन डॉ. प्रफुल्ल जटाले, आघाव जिल्हा स्विप कक्षाचे नोडल अधिकारी स्वप्निल सरदार,तसेच सर्व तालुका स्वीप चे अधिकारी, कर्मचारी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासह विविध माध्यम प्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणामध्ये यानिमित्त पथनाट्य ,भारुड व विविध गीतामधून मतदान जाणीव जागृतीचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर हिरवी झेंडी दाखवून चित्ररथास रवाना करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघांमध्ये हा चित्ररथ फिरणार असून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात येणार आहे येणार आहे, सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन संजीव सोनार यांनी केले.

## बजाजनगर, सिडको परिसरातील पर्यावरण प्रेमींचे कार्य कौतुकास्पद : परदेशी

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : औद्योगिक वसाहतीमुळे वाढते प्रदूषण, वाढते तापमान, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल हे टाळण्यासाठी करत असलेल्या कामाची पाहणी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष संतोष परदेशी यांनी केली. करत असलेल्या कार्याचे कौतुक त्यांनी यावेळी केले. कोरोना काळात



ऑक्सिजन अभावी अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. अशा समस्या दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर पर्यावरण प्रेमी करत असलेल्या कामाची माहिती त्यांनी यावेळी दिली. मंडळाचे काम प्रभावीपणे चालू आहे. त्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आव्हान त्यांनी यावेळी करून वाळूज महानगर परिसरात निसर्गाप्रती निष्ठेने काम करणाऱ्या सामाजिक संस्था व पर्यावरण प्रेमींचे कौतुक केले. या वेळी केशव ढोले, कृष्णा गुंड,शिवाजी राऊत, रवींद्र शेलगावकर,रफिक कादरी, विश्वनाथ धोंडगे, परमेश्वर गणाचार्य, व्यंकटेश भोरे, ऋषीकेश पाटील, रामेश्वर जोशी माणिक कुंभार आदी पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.

## श्री अतिशय क्षेत्र कचनेर येथे ३ दिवसीय वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर - कचनेर जैन बांधवांचे श्रध्दा स्थान श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेरजी ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेला वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन परिसरातील चातुर्मास वास्तव्यास असणाऱ्या मुनी संघाच्या मार्गदर्शनाखाली व सानिध्यात करण्यात आले आहे. अशी माहिती आज पत्रकार परिषदेत महामंत्री विनोद लोहाडे भरत ठोले एम आर बडजाते जयेश काला नरेंद्र अजमेरा किरण मास्ट सर दिगंबर क्षीरसागर यानी दिली वार्षिक यात्रा महामोहोत्सव दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत होणार असून मुख्य महामस्तकाभिषेक कार्तिक शुद्ध पौर्णिमा दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ शुक्रवार रोजी होणार आहे. या यात्रा महामहोत्सवा साठी भारत भरातून हजारो जैन बांधव दर्शनास्तव येतात, त्यात दूरदुरून पायी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय असते.श्री क्षेत्र कचनेरचे अधिष्ठाता श्री चिंतामणी पार्श्वनाथ भगवंतांच्या अतिशयकारी मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतर सर्व मनोकामना पूर्ण होतात अशी सर्व भाविकांची मान्यता आहे. त्यामुळे यात्रेत मोठ्या प्रमाणात जैन व जैनेत्तर



भाविकांची गर्दी होते. वार्षिक यात्रा महामहोत्सव निमित्त चार दिवस विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे.

वार्षिक यात्रा महामोहोत्सव दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून तयारी अंतिम टप्यात आहे. त्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आलेली असून सर्व समित्यांचे पदाधिकारी आपआपली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

वार्षिक यात्रा महामहोत्सव प्रसंगी दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ या तीन दिवसाच्या कालावधीसाठी महाप्रसादाचे आयोजन धर्मानुरागी दानशूर अर्पण ग्रुप द्वारा श्री जयकुमारजी अमितजी अभिजितजी सुमितजी कासलीवाल ( जैन ) परिवार गल्लीवाला, श्री प्रमोदकुमारजी( पप्पू ) निशांत कासलीवाल परिवार गल्लीवाला, श्री रितेशजी राहुलजी कैलासजी पाटणी परिवार अंधारीवाला, श्री आशिषजी स्वप्नीलजी अशोककुमारजी छाबडा परिवार तांडापूरवाला, श्री सुमितजी संयोगजी सुभाषचंदजी गंगवाल परिवार पुरीवाला पैठण , श्री डॉ अनिलकुमारजी डॉ चेतन नितेश डॉ कार्तिक चि. कबीर कासलीवाल आडूळवाला बालानगर पैठण, श्री माणिकचंदजी राजेंद्रजी डॉ पवनजी डॉ किशोरजी अपनजी चि. तिर्थ बडजाते नांदरवाला पैठण, श्री बाबुलालजी राकेशकुमारजी चेतनकुमारजी पांडे साष्टपिंपळगाववाला यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

दिलीपजी स्वामी ( जिल्हाधिकारी ) यांच्या नेतृत्वात मा. श्रीमान राठोड ( उपविभागीय अधिकारी ) यांच्या मार्गदर्शनाखाली मा. श्रीमान रमेशजी मुनलोड ( तहसीलदार ) यांनी मा. सौ कमलताई फतपुरे ( सरपंच ), ग्रामस्थ, संस्था पदाधिकारी व सर्व विभाग प्रमुखांना महत्वाच्या सुचना करून यात्रा यशस्वी व उत्कृष्ट रितेने संपन्न करण्याचे आदेशित केले. मा सरपंच कचनेर व जोड्वाडी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ हे सुद्धा यात्रा यशस्वीते साठी प्रयत्न करीत आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी , उपविभागीय अधिकारी, पोलीस अधीक्षक ग्रामीण हे यात्रा तयारीवर जातीने लक्ष ठेऊन आहेत. प्रशासनाच्या माध्यमातून तहसीलदार श्री रमेश मुनलोड हे प्रत्यक्ष भेटी देऊन तयारीचा आढावा घेत आहेत, कायदा व सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून उपविभागीय पोलीस अधिकारी श्री भोये साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री दरवडे साहेब जय्यत तयारी करीत आहेत.

समितीनिहाय नियोजनानंतर सर्व समिती सदस्यांनी नियोजन करून यात्रा निर्विघ्न संपन्न करण्याचा मानस घेतला व प्रत्यक्ष कार्यास सुरुवात केली आहे. यात्रा नियोजन व आयोजन बाबत डी. यु. जैन ( अध्यक्ष विश्वस्थ मंडळ ) ,सुरेशकुमार कासलीवाल ( मॅनेजिंग ट्रस्टी ), संजयकुमार कासलीवाल ( उपाध्यक्ष विश्वस्थ मंडळ ), महेंद्रकुमार काले व यात्रा नियोजन समिती संयोजक, सहसंयोजक, सदस्य व सर्व कर्मचारी प्रयत्न करीत आहेत.

# अजून किती विकास हवा..? द्या पुन्हा निवडून उमेदवार..!

( भाग - २)

वाळूज महानगर(प्रतिनिधी) : गेल्या आठ वर्षांपासून आम्ही नरक यातना सहन करतोय आणि आम्ही विकास केला आम्हाला निवडून द्या अशी मागणी लोकप्रतिनिधी करत आहेत. आम्ही काय म्हणून त्यांना पुन्हा निवडून द्यायचे ? त्यांनी आमच्यासाठी काय केले असा संतप्त सवाल पश्चिम विधानसभा मतदारसंघातील वडगाव को. येथील समर्थनगर येथील महिला करत आहेत.

समर्थनगर हा वडगाव को. येथील गट नं. ८१ मध्ये जवळपास ६०० लोकसंख्या असलेली कामगारांची वसाहत आहे. म्हणायला वसाहत परंतु याठिकाणी लाईट व पाण्याशिवाय कोणतीही सुविधा नाही. या वसाहतीमध्ये जाण्यासाठी मुख्य रस्त्याच्या नावाला एक पाणंद आहे. पावसाळ्यात विद्यार्थ्यांना शाळेत ये - जा करण्यासाठी उचलून न्यावे लागते. तर विद्यार्थ्यांच्या बुटाला पन्नी घालून शाळेत पाठवावे लागते. गर्भवती महिला अथवा वृद्ध आजारी पडल्यास बाजीवर उचलून मुख्य रस्त्यावर





**१) मुख्य रस्त्याच्या नावाला फक्त हा एक कच्चा रस्ता आहे. २) अंतर्गत रस्त्यांची अशी आवस्था झालेली आहे. ( छाया : संजय निकम )**

आणावे लागते. गटार नाली नाही , अंतर्गत रस्ते नाही ' लाईट नाही पाणी चार दिवसाला तेही मुबलक नाही अशा अनेक मुलभूत सुविधांपासून ही वसाहत वंचित आहे. स्थानिक प्रशासनाकडे सुविधा देण्याची मागणी केली असता , तुमची वसाहत ब्लॅक लिस्टमध्ये असल्याचे सांगण्यात येते. यावेळी साक्षी डांगे , कल्पना जाधव , लता पायघन ' पूनम पाटील , रेखा वाकळे , रामकिसन वाकळे , चंद्रकांत गावडे , गणेश जमदाडे , कृष्णा इंगळे , नानासाहेब सुरवसे , नंदा भुसारे , नंदा महाजन ' हौसाबाई तुपे ' कलावती वाघमारे , नंदा महाजन आदी उपस्थित होते.



**आम्हाला येथे जवळपास ६ वर्षांपासून वास्तव्यास आहोत. कित्येक वेळा मागणी करूनही आम्हाला रस्ता तयार करून दिलेला नाही . पावसाळ्यात मुलांना खांद्यावर बसून शाळेत सोडावे लागते. आम्हाला चिखलात ठेवणाऱ्यांना मी कदापि मतदान करणार नाही असे येथील रहिवासी मनिषा जमदाडे यांनी सांगितले.**



**सुविधाच नाही तर मते कशाला द्यायची असे म्हणत मते मागायला येणाऱ्यांना आम्ही मतपेटीतून ताकद दाखवू असे आशा गावंडे , कावेरी हिवाळे , भिवराबाई सुरवसे यांनी बोलून दाखवले.**



**गटार नाली नसल्याने पाणी वाहून जाण्यासाठी मार्गच नाही , त्यामुळे बऱ्याच दुर्गंधीचा सामना करावा लागतो असे कविता काळत्रे यांनी सांगितले.**



**पावसाळ्यात विद्यार्थ्यांसह महिला व कामगार वर्गाला रोडच्या बाजूला दुचाकी उभ्या करून गुडघाभर चिखलातून येजा करावे लागते. विकास झाला म्हणून ओरडणारे यांना आम्ही धडा शिकवणार आहोत असे किर्ती सुरवसे यांनी सांगितले.**

## सातवीतल्या अर्णव मुंदडा याचे 'पांडोरा अँड हर अडवेंचर्स' हे पुस्तक प्रकाशित

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - छत्रपती संभाजीनगर शहरातील बीड बायपास रोड लगत असलेल्या लाभवास्तु कॉलनीजवळील अग्रसेन विद्या मंदिर या शाळेत सातवीच्या वर्गात शिकत असलेला अर्णव सचिन मुंदडा याचे 'पांडोरा अँड हर अडवेंचर्स' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. दिल्ली स्थित ड्राय बुक्स. कॉम या नामांकित प्रकाशन संस्थेने ते पब्लिश केले आहे. या ३२ पाणी पुस्तकाची किंमत ३४९/- रुपये इतकी असून पब्लिकेशनच्या वेबसाईटवर ते वाचकांसाठी उपलब्ध केलेले आहे.

वय वर्ष अवघे बारा असलेल्या अर्णव याने हे पुस्तक लिहून आपल्या टोकदार प्रतिभा शक्तीचा परिचय सर्वांनाच करून



दिला आहे. या पुस्तकातील 'पांडोरा' ही मुलगी मुख्य व्यक्तिरेखा असून तिच्या धाडसी करामती वाचताना विद्यार्थी वाचक हरवून जातात. पत्रकारिता करणार्या त्याच्या आजोबामुळेच अगदी लहानपणापासूनच अर्णवला वाचनाची सवय लागली. विविध भाषेतील पुस्तकांच्या वाचनाबरोबरच धार्मिक पुस्तकांचेही वाचनाचाही त्याला छंद आहे.

# धूम



## विधानसभा निवडणुकीचा 'मत'संग्राम

## निवडणुकीमध्ये पैशांचा महापूर

निवडणुका जाहीर झाल्या. आचारसंहिता लागली आणि चौकाचौकामध्ये पोलिसांचा बंदोबस्त आहे. इतकं असूनही, पोलिसांच्या कारवाईमध्ये कोट्यवधी रूपयांचा मुद्देमालजप्त करण्यात येतो आहे. मुंबईमध्ये आज साडेतीन कोटी रूपयांचा माल जप्त केला गेला तर भुलेश्वरमधून २.३ कोटींची रोकड पोलिसांनी ताब्यात घेतली आहे तर शिवडीमध्ये एक कोटी दहा लाखांचे सोने जप्त करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी जालन्यात ५२ लाख ८९ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली. तर जळगाव शहरामध्ये जागरूक पोलिसांनी २५ लाख रुपये ताब्यात घेतले. सोलापूरमध्ये २० लाखांची रोकड जप्त केली गेली आहे.




निवडणूक हा पैशांचा खेळ आहे असे म्हटले जाते. या काळात अशी पैशांची सरळ सरळ वाहतूक होत असते. पण गंमत म्हणजे इकडून तिकडे जाणारे हे पैसे कोणत्या पक्षाचे आणि नेमके कुणी, कसे दिलेले आहेत हे कधीही बाहेर येत नाही. जनतेला ते कधीच कळत नाही. एकीकडे पैसे नाहीत अशी ओरड चालू असताना हे पैसे येतात तरी कुठून?




## फडणवीसांच्या होम ग्राऊंडवर...

**भाजपचे राज्याचे चाणक्य आणि मुख्यमंत्रिपदासाठी सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यांच्या मतदारसंघात कुणबी, ओबीसींची संख्या जास्त असून, त्यांच्या मतांवरच फडणवीस यांच्या यशाचे गणित अवलंबून आहे. त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न फडणवीस यांनी सुरू केला आहे. राज्यभर पायाला भिंगरी लावून फिरताना स्वतःच्या मतदारसंघातील नाराजी दूर करण्याचे आव्हान ते कसे पेलतात, हे पाहायचे.**

नागपूर विधानसभा मतदारसंघामधून देवेंद्र फडणवीस निवडणूक लढवत आहेत. २००९ पासून फडणवीस या मतदारसंघाचे नेतृत्व करतात. या मतदारसंघातून या वेळी काँग्रेसचे सचिव प्रफुल गुडधे यांना उमेदवारी दिली आहे. गुडधे कुणबी चेहरा म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यातली राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. या बदललेल्या राजकारणामध्ये फडणवीस यांचे नाव केंद्रस्थानी राहिले. दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये वर्धा रस्त्यावरील मिहानच्या पुनर्वसनामध्ये गेलेल्या शिवणगाव, सोनेगावपासून तर अंबाझरी तलावापासून मेडिकल चौकापर्यंत असे मोठे क्षेत्र येते. सुरुवातीला हा पश्चिम नागपूर मतदारसंघ होता. इथूनच १९९९ मध्ये फडणवीस पहिल्यांदा आमदार झाले. त्यांनी काँग्रेसच्या अशोक धवड यांच्यासारख्या दिग्गज नेत्याचा पराभव केला. या मतदारसंघामधून २००४ मध्येही त्यांनी विजय मिळवला. त्यानंतर २००८ मध्ये मतदारसंघाची पुनर्रचना झाली आणि दक्षिण-पश्चिम नागपूर असा एक नवीन मतदारसंघ तयार झाला. तिथून २००९ पासून देवेंद्र फडणवीस सलग निवडून येत आहेत. २००९ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या विकास ठाकरे यांचा २७ हजार मतांनी पराभव केला. २०१४ मध्ये त्यांनी ५८ हजारांचे मताधिक्क्य घेत मतदारसंघावर आपले वर्चस्व प्रस्थापित केलं होतं. २०१४ पर्यंत फडणवीस यांच्या मताधिक्क्याचा चढता आलेख होता; पण २०१९ पासून या मतदारसंघामध्ये भाजपच्या मताधिक्क्यांमध्ये घसरण झाली. आशिष देशमुख यांच्यासारखा नवखा उमेदवार विरोधात असताना आणि मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून निवडणूक लढवली असताना आधीच्या निवडणुकीच्या तुलनेत फडणवीस यांचे मताधिक्य नऊ हजारांनी कमी झाले होते. लोकसभा निवडणुकीमध्ये फडणवीस यांच्या मतदारसंघामध्ये नितीन गडकरी यांचे मताधिक्य ३२ हजार मतांनी कमी झाले. त्यामुळे या मतदारसंघामध्ये भाजपची चिंता वाढली आहे. नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघ ओबीसीबहुल आहे. त्यातही कुणबी मतदारांची संख्या जास्त आहे. त्यापाठोपाठ अनुसूचित जाती आणि ब्राह्मण मतदार येतात. तसेच सुशिक्षित मतदारांचा मतदारसंघ म्हणून याची ओळख आहे. या मतदारसंघातला अनुसूचित जातीचा मतदार कधीच भाजपच्या बाजूने नव्हता. हा मतदार काँग्रेसची पारंपरिक व्होट बँक आहे; पण कधी भारिप बहुजन महासंघ, तर कधी बहुजन समाजवादी पक्षाच्या उमेदवारांमुळे दलित मतांचे विभाजन झाले. २००९ ला भारिप बहुजन महासंघ आणि अपक्ष उमेदवार अशा दोघांनी मिळून जवळपास २० हजारांच्या घरात मते घेतली. २०१४ च्या निवडणुकीमध्येही बसपच्या उमेदवाराला १७ हजारांच्या घरात मते मिळली होती. याउलट फडणवीस यांना या मतदारसंघामधल्या कुणबी मतदारांचा नेहमीच पाठिंबा मिळत आला; पण गेल्या पाच वर्षांमध्ये हाच कुणबी आणि ओबीसी फॅक्टर फडणवीस यांच्यासाठी मोठे आव्हान बनला आहे.



**रण तापले**

२०१९ पर्यंत ओबीसींचा मुद्दा इतका चर्चेत नव्हता; पण नंतरच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ओबीसींचे आरक्षण गेले. ओबीसींचे प्रतिनिधित्व कमी झाले. ओबीसींची जातगणना झाली नाही. त्यामुळे गेल्या चार वर्षांत ओबीसी केंद्रस्थानी आला आहे. त्यात फडणवीस यांनी अनिल देशमुख, सुनील केदार यांच्यासारख्या ओबीसी नेत्यांना टार्गेट केले. त्यामुळे ओबीसी वर्गात समाज म्हणून एक नाराजी आहे. २०२४ च्या निवडणुकीची तुलना या आधीच्या इतर निवडणुकांसोबत होऊ शकत नाही. या मतदारसंघामध्ये ओबीसींबद्दलचे बदलते चित्र हेच फडणवीस यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये भाजपला फटका बसला. हा ओबीसी समाज एकत्र आल्याचा परिणाम होता. दक्षिण पश्चिम नागपूरच्या कुणबी मतदारांमध्ये नाराजीचा सूर असला, तरी फडणवीस यांनी डॅमेज कंट्रोल करायला सुरुवात केली आहे. दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघामध्ये ओबीसीनंतर अनुसूचित जातीचे मतदार आहेत. या भागात रामेश्वरीसारखा मोठा परिसर, रामबाग, जयताळा, एकात्मता नगर इकडे अनुसूचित जातींचे मतदार अधिक आहेत. आता फडणवीस यांनी या मतदारांवर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यांच्या मतदारसंघातील ३७८ बूथपैकी अनुसूचित जातीचे मतदार अधिक आहेत अशा १०० बूथवर 'देवेंद्रदूत' नेमले आहेत. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येकी २० बूथ असे पाच कोऑर्डीनेटर नेमले आहेत. देवेंद्रदूतच्या माध्यमातून घरोघरी जाऊन नागरिकांना काय समस्या आहेत? लाडकी बहीण योजनेचा फायदा मिळाला का? देवेंद्र फडणवीसांबद्दल काय मत आहे? अशी माहिती विचारली जात आहे. या समाजाची काही मते वळवता आली तर त्याचा फायदा भाजपला होऊ शकतो.

आता २०१९ सारखी परिस्थिती नाही. त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद तर नाहीच. इथले जातीय समीकरणसुद्धा त्यांच्याबाजूने नाही. कुणबी समाजाचा रोष आहे. असे असले, तरी प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात करायची, हे फडणवीस यांना चांगलेच माहीत आहे. या निवडणुकीमध्ये मेहनत घ्यावी लागेल; पण त्यांच्यासाठी ही निवडणूक इतकी कठीण नाही. कारण फडणवीस यांचे राजकीय वजन जास्त आहे. त्याचा फायदा मतदानामध्ये होतो. त्यामुळे त्यांना तितके अवघड जाणार नाही. काँग्रेसचे प्रफुल गुडधे या मतदारसंघामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून काम करत आहेत. ते फडणवीसांविरोधात लढण्यासाठी इच्छुक होते. त्यामुळे त्यांनी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच प्रचार सुरू केला होता. गुडधे हे दक्षिण-पश्चिम मतदारसंघातल्या जयताळा परिसरातले रहिवासी आहेत. ते कुणबी असून इथल्या जातीय समीकरणात फीट बसतात. त्यांचे या मतदारसंघामध्ये नेटवर्कही आहे. शिवाय आधी याच मतदारसंघाचा भाग असलेल्या पश्चिम नागपूरमधून दोनवेळा भाजपचे आमदार राहिलेल्या विनोद गुडधे पाटलांची राजकीय परंपरादेखील प्रफुल गुडधे यांच्या पाठीमागे आहे. आता राष्ट्रवादी आणि काँग्रेस किती एकत्रितपणे काम करते, यावर बरंच काही अवलंबून असणार आहे. या मतदारसंघात सिमेंट रस्त्यांमुळे लोकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याच्या तक्रारी होत्या. तसेच अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाल्यामुळे या मतदारसंघातल्या शंकरनगरसारख्या वस्त्या पाण्याखाली गेल्या होत्या. त्यामुळे या मतदारसंघातल्या सुशिक्षित आणि विचारपूर्वक मतदान करणाऱ्या मतदारांची नाराजी आहे. त्यांनी हे प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत लावून धरले होते. या मतदारांची नाराजी दूर करणे हे फडणवीस यांच्यासमोरचे आव्हान आहे; पण दुसरीकडे त्यांनी नागपुरमध्ये केलेली विकासकामे ही त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. यात मानकापूर स्पोर्टस् कॉम्प्लेस, विमानतळ नूतनीकरण हे सगळे विकासाचे मुद्दे येतात. विकासकामे घेऊनच फडणवीस निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे ही निवडणूक जातीय समीकरणे विरुद्ध विकासकामे अशी लढली जाईल.

## धनंजय मुंडे यांना 'ममुद' फॉर्म्युल्याची भीती

**राज्यातील हाय व्होल्टेज सामन्यांपैकी एक सामना बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदारसंघामध्ये आहे. या मतदारसंघामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. परळी विधानसभा मतदार संघामध्ये राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी देऊन शरद पवार यांनी जाणीवपूर्वक मराठा कार्ड खेळले आहे. त्यामुळे मुंडे यांना सुरुवातीला सोपी वाटणारी ही निवडणूक एकदम चुरशीची बनली आहे. त्यात राजेभाऊ फड यांनी अखेरच्या क्षणी माघार घेतल्याने मुंडे विरुद्ध देशमुख असा थेट सामना आहे.**

विधानसभेच्या २०१४ च्या निवडणुकीमध्ये धनंजय मुंडे यांना पंकजा मुंडे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये परळी विधानसभा मतदारसंघामध्ये पंकजा यांचा पराभव करून धनंजय विजयी झाले होते. आता परळी विधानसभा मतदारसंघामधून धनंजय हे तिसऱ्यांदा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. यामुळे त्यांच्यासाठी ही अस्तित्वाची निवडणूक मानली जात आहे. परळी विधानसभा मतदारसंघामधून यापूर्वी धनंजय यांनी दोनदा निवडणूक लढवल्याने त्यांना मतदारसंघाची नाडी माहीत आहे. तसेच पूर्वीच्या रेणापूर मतदारसंघामध्ये गोपीनाथ मुंडे यांच्या निवडणुकीची यंत्रणाही सांभाळल्याचा मोठा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. या निवडणुकीमध्ये भाजपबरोबर महायुती असल्याने आणि मनोमिलन झाल्याने धनंजय यांच्यासाठी पंकजा प्रचारात उतरल्या आहेत. परळी शहर आणि ग्रामीण भागात धनंजय, पंकजा आणि वाल्मीक कराड यांच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख हे मतदारसंघाच्या बाहेरचे असले, तरी परळी मतदारसंघ त्यांना नवा नाही. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असताना त्यांचा परळी मतदारसंघामध्ये वावर होता आणि आजही अनेक गावांमध्ये त्यांचा संपर्क आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट या महाविकास आघाडीतील पक्ष कार्यकर्त्यांचा संपर्क राजेसाहेब देशमुख यांच्या कामाला येणार आहे. शरद पवार यांना मानणारा वर्गही त्यांच्या कामाला येणार आहे. भयमुक्त परळी, उद्योग, शिक्षण क्षेत्रातील परळीचे गतवैभव प्राप्त करून देण्याच्या मुद्द्यावर राजेसाहेब देशमुख हे निवडणूक लढवत आहेत. विशेष म्हणजे धनंजय हेही परळी दहशतीखाली असल्याचा आरोप करतात. राज्यामध्ये आणि केंद्रात त्यांचीच सरकारे असताना ते असा आरोप करत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. आमदार धनंजय यांच्या या आरोपाने विरोधकांच्या हाती आयते कोलित दिले आहे.



मराठा, दलित आणि मुस्लिम हा मनोज जरांगे पाटील यांचा 'ममुद' फॉर्म्युला लागू पडला, तर मुंडे यांना केवळ नशीबच तारू शकते. परळी विधानसभा मतदारसंघ मुंडे घराण्याचा बालेकिल्ला असून २००९ आणि २०१४ ला पंकजा मुंडे यांच्याकडे होता; मात्र २०१९ ला बहिणीचाच पराभव करत धनंजय निवडून आले. इथे मुद्दा पक्षाचा नाही तर मुंडे घराण्याचा असतो; पण २०२४ ला इथे मोठे आव्हान मिळाले, ते जरांगे पाटलांचे. संपूर्ण महाराष्ट्रात जरांगे पाटलांच्या नावाची हवा होती. मराठवाड्यात त्यातही खास करून बीडमध्ये या जरांगे फॅक्टरला लोकांनी डोक्यावर उचलून धरले. स्वतः जरांगे हे ही बीड जिल्ह्यातील. त्याचा परिणाम म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणूला बीडचा मुंडेंचा गड बजरंग सोनावणे या नव्या चेहऱ्याने बळकावला. शरद पवार यांच्या बाजूने असणारी सहानुभूती आणि जरांगे फॅक्टर पंकजा यांच्या पराभवाला कारणीभूत ठरला; पण आता मैदानात पंकजा यांचे चूलत बंधू धनंजय मुंडे उभे आहेत. धनंजय मुंडे विद्यमान आमदार आहेत. गेल्या निवडणुकीला स्वत:च्या बहीणचा पराभव करत त्यांनी हा विजय मिळवला; पण आता मुंडे बंधू-भगिणी एकत्र आले आहेत. मुंडे घराण्याला माननाला मोठा गट या भागात आहे. धनंजय सत्ताधारी आमदार आणि कृषिमंत्री आहेत. त्यामुळे मतदार संघाच्या विकासकामांसाठी करोडोंचा निधी मुंडेंनी आणला. त्यात लाडकी बहीण सारखी सक्सेसफुल योजना फायद्याची ठरेल. महायुती एकत्र लढणार असल्याने भाजप आणि शिंदे गटाची ताकदसुद्धा मुंडे यांना मिळू शकते; पण मराठा आरक्षणासाठी केलेला विलंब, इतर जातींच्या आरक्षणाच्या मागण्यांना प्राधान्य देताना मराठ्यांच्या मागण्यांकडे केलेले दुर्लक्ष, आरोप-प्रत्यारोप या सगळ्यांमुळे जरांगे पाटील आणि मराठा आंदोलक आक्रमक झाले आहेत. लोकसभेला जसा दणका दिला तसाच दणका विधानसभेला देणार, असा निर्धार जरांगे पाटील आणि मराठा आंदोलकांनी केला आहे. याचा फटका धनंजय यांना बसू शकतो.कारण जी चूक किंवा भूमिका पंकजा यांनी लोकसभेला घेतली होती, तीच चूक आणि भूमिका सध्या धनंजय घेताना दिसतात.

**रण तापले**

ओबीसी आंदोलनाला उघडपणे दिलेला पाठिंबा असो, की दसरा मेळाव्याला केलेलं आक्रमक भाषण; माझ्या नादी लागू नका असा इशारा त्यांनी जरांगे यांना दिला. त्यात पंकजा यांची कोयत्याची भाषा आगीत तेल ओतणारी ठरल्याची चर्चा आहे. मुंडे यांनी जरांगे यांची भेट घेतली; पण म्हणावा तशी भूमिका स्पष्ट केली नव्हती. लोकसभेप्रमाणे बीडमध्ये मराठा विरुद्ध ओबीसी हा वाद टोकाला जावून पोहोचला आहे. त्यात मुंडेंसमोर पवार यांचेदेखील मोठं आव्हान आहे. कारण पक्षफुटीनंतर शरद पवार आणि मुंडेंमधले आरोप -प्रत्यारोप सगळ्यासमोर आले आहेत.

दिवंगत प्रवीण महाजन यांच्या पत्नी सारंगी महाजन यांनी धनंजय आणि पंकजा बंधू-भगिनीवर गंभीर आरोप केले आहेत. मुंडे बहीण-भावाने संगनमताने धाक दाखवून आणि कारस्थान रचून कोट्यवधी रुपये किंमतीची जमीन हडपली, असा आरोप सारंगी महाजन यांनी केला आहे. दरम्यान, प्रमोद महाजन यांच्या भावाने आणि मुलीने प्रमोद यांच्या हत्येमागे त्यांचा भाऊ नसून दुसरेच कुणी असल्याचा आरोप केला आहे. प्रवीण महाजन यांच्या नावे असलेली बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यामधील मौजे जिरेवाडी येथील गट नंबर २४० मधील कोट्यवधी रुपये किमतीची ३६.५० आर जमीन धनंजय आणि पंकजा यांनी जबरदस्तीने घेतली असल्याचे सारंगी महाजन यांनी म्हटले आहे. ऐन विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात त्यांनी हे आरोप केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. यावर आता धनंजय आणि पंकजा काय उत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. निवडणुकीच्या तोंडावर सारंगी यांनी धनंजय आणि पंकजा यांच्यावर गंभीर आरोप करत एकच खळबळ उडवून दिली आहे.

## विजयाची माळ कोणाच्या गळ्यात?

**श्रीगोंदे तालुक्यामध्ये कायम नागवडे विरुद्ध पाचपुते असा संघर्ष झाला. दुरंगी लढतीत पाचपुते यांना फटका बसतो, हा इतिहास आहे. या वेळी तर चौरंगी लढत आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांमध्ये बंडखोरी झाली आहे; परंतु प्रमुख दोन उमेदवार एकाच भागातील आहेत, त्यांच्या मतविभागणीचा फायदा तिसऱ्या उमेदवाराला होतो का, हे पाहायचे.**

श्रीगोंदे विधानसभा मतदारसंघ परंपरेने काँग्रेस विचारसरणीचा. हा मतदारसंघ राजकीयदृष्ट्या सजग असणारा. त्यातही वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या चिन्हावर निवडणूक लढवून विजयी होण्याची किमया बबनराव पाचपुते यांनी करून दाखवली. नागवडे आणि पाचपुते यांच्यात १९८० पासून आतापर्यंत संघर्ष होत आला आहे. त्यात अवघ्या दोन वेळा पाचपुते यांना पराभव पत्करावा लागला. पाचपुते विरोधकांची संख्या जास्त; परंतु त्यांच्यात एकमत होत नव्हते. त्यामुळे पाचपुते यांचा विजय सोपा होत होता. कुंडलिकराव जगताप, शिवाजीराव नागवडे हे पाचपुते विरोधक एकत्र आले. शरद पवार यांनी त्यांच्यात एकी घडवली आणि २०१४ च्या निवडणुकीत राहुल जगताप या तरुणाने बबनराव पाचपुते यांचा पराभव केला. २०१९ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी देऊनही जगताप हे कारखान्याच्या अडचणीमुळे थांबले. त्यामुळे मागच्या वेळी पुन्हा नागवडे विरुद्ध पाचपुते यांच्यामध्येच लढत झाली आणि पाचपुते विजयी झाले. बबनरावांची प्रकृती चांगली नसल्यामुळे त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. भाजपने त्यांच्या पत्नी प्रतिभा यांना उमेदवारी जाहीर केली; परंतु पाचपुते कुटुंबाचा विक्रमसिंह यांच्यासाठी आग्रह होता. विक्रमसिंह साखर कारखानदारीचे अभ्यासक. त्यांची सुरुवातही आश्वासक झाली. परंतु गेली दहा वर्षे त्यांचा मतदारसंघाशी फारसा संपर्कच नव्हता. आता त्यांना उमेदवारी मिळाली आहे. दुसरीकडे राजेंद्र नागवडे यांना विधानसभेच्या निवडणुकीमध्ये यश येत नाही, म्हणून अनुराधा नागवडे या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये उतरल्या आहेत. काँग्रेस, भाजप, पुन्हा काँग्रेस आणि शिवसेना असा त्यांचा प्रवास आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये आमदार व्हायचेच, या महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या अनुराधा यांनी त्यासाठी तर पक्षांतरे केली. त्यासाठी त्यांना निलंगेकर कुटुंबियांची मोठी मदत झाली. दुसरीकडे गेल्या वर्षभरापासून विधानसभेची तयारी करणाऱ्या राहुल जगताप यांना राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शरद पवार यांच्याकडून उमेदवारी मिळण्याची खात्री होती; परंतु ऐनवेळी हा मतदारसंघ शिवसेनेच्या ठाकरे गटाला सोडण्यात आल्याने आणि अनुराधा नागवडे उमेदवार असल्याने अन्याय झाल्याच्या भावनेतून जगताप अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणामध्ये आहेत. भाजपच्या सुवर्णा पाचपुते यांना पक्षाने नाकारल्याने त्यांची नाराजी कायम आहे. त्यांना पक्षाने काढून टाकले आहे. या पार्श्वभूमीवर नागवडे, पाचपुते आणि जगताप यांच्या दुसऱ्या पिढीमध्ये आता विधानसभेसाठी लढत होत आहे. कुकडी आणि घोड पट्ट्यामध्ये श्रीगोंदे विधानसभा मतदारसंघ विभागला गेला आहे. कुकडी पट्ट्यातून जगताप हे एकमेव उमेदवार आहेत, तर घोड पट्ट्यामध्ये पाचपुते आणि नागवडे या पारंपरिक विरोधकांमध्ये आता मतविभागणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील गावांना महत्त्व आले आहे. नागवडे आणि जगताप साखर कारखानदार आहेत, तर पाचपुते यांनी दोन कारखाने काढूनही त्यांना ते चालविता आले नाहीत. दूध धंद्याच्या बाबतीतही तेच झाले. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांनीही बंड केले आहे.



संत शेख मोहम्मद महाराज यांच्या या तालुक्यात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि वारकरी संप्रदाय हा वैचारिक पाया राहिला आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्येही सहकार चळवळीतील दिग्गजांमध्ये राजकीय सत्तासंघर्ष आहे. या तालुक्यात शिवाजीराव नागवडे यांनी सहकार चळवळ वाढीस लागण्यासाठी मोठे काम केले. ते या मतदारसंघाचे दोन वेळा आमदार होते; मात्र १९८० पासून बबनराव पाचपुते यांनी या मतदारसंघामध्ये राजकीय अस्तित्व निर्माण केले. जनता दल, अपक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप असा राजकीय प्रवास करणाऱ्या पाचपुते यांनी सात वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले; मात्र मंत्री राहूनही या मतदारसंघातील विकासाची पाटी अजूनही कोरी असल्याची भावना जनमानसात असल्याचे सांगितले जाते. पाचपुते हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या खास मर्जीतील होते; मात्र २०१४ मध्ये त्यांनी पवार यांची साथ सोडली आणि त्यांची राजकीय ग्रहदशा फिरली. पवार यांनी राहुल जगताप यांना उमेदवारी दिली आणि निवडून आणले. त्या वेळी नागवडे यांनी जगताप यांना पाठिंबा दिला. या जोरावर पाचपुते यांचा पराभव झाला; मात्र २०१९च्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलली. घनश्याम शेलार यांना पवार यांनी उमेदवारी दिली. शेलार आणि पाचपुते यांच्या संघर्षात पाचपुते यांचा निसटता विजय झाला खरा; मात्र आता बबनरावांचे पुतणे साजन पाचपुते यांनी काकांसमोर आव्हान उभे केले. त्यामुळे पाचपुते घरातूनही अडचणीत आले. राजेंद्र नागवडे यांचा त्यांच्याच साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये पराभव करण्याच्या नादात बबनराव यांनी राजकीय गणिते अधिकच गुंतागुंतीची केली. या निवडणुकीत नागवडे यांनी साखर कारखान्यातील सत्ता राखली; मात्र बबनराव यांना त्यांच्या गावातील बाजारसमिती आणि ग्रामपंचायतमधील सत्ता गमवावी लागली. नागवडे कारखाना निवडणुकीनंतर पुन्हा पाचपुते आणि नागवडे कुटुंबातील राजकीय संघर्ष उफाळून आला आहे. नागवडे यांनी साजन पाचपुते यांच्या मदतीने काष्टी पट्ट्यामध्ये ताकद वाढवली आहे. त्यातच पाचपुते यांच्या कौटुंबिक संघर्षामुळे भाजपने जाहीर केलेली उमेदवारी बदलावी लागली. शिवसेनेच्या ठाकरे गटाने सुरुवातीला उपनेते साजन पाचपुते यांना उमेदवारी देण्याचे निश्चित केले होते, असे समजते; मात्र जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अनुराधा नागवडे याही निवडणूक लढवणार असल्याने मतांचे विभाजन नको, अशी भूमिका घेत साजन पाचपुते यांनी ठाकरे गटाचे तिकीट नागवडे यांना मिळवून दिले. त्यामुळे महाविकास आघाडीकडून अनुराधा नागवडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. नागवडे यांचा मतदारसंघात सहकार व शैक्षणिक संस्थांच्या जोरावर गावोगावी कार्यकर्त्यांचा मोठा संच आहे. यातच पाचपुतेंचा बालेकिल्ला असलेल्या काष्टीतून साजन पाचपुते यांचा आणि महाविकास आघाडीचा पाठिंबा मिळाल्याने अनुराधा नागवडे यांची ताकद आणखी वाढली आहे.

**रण तापले**

## पुढे काय?

अद्याप निवडणुकीच्या प्रचाराला रंग चढतो आहे. एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू झालेत. आश्वासनांची खिरापत वाटली जाते आहे आणि त्याच वेळी 'पुढे काय?' याची चर्चाही रंगू लागली आहे.



भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांची महायुती आणि काँग्रेस, राष्ट्रवादी-शरद पवार गट आणि शिवसेना -उद्धव ठाकरे यांची मविआ हे सहा मोठे पक्ष रिंगणात आहेत. आणि त्याशिवाय मनसे, स्वाभिमानी, वंचित आणि अपक्ष यांनीही रणमैदानात उडी घेतली आहे. मागच्या निवडणुकीच्या वेळी या सर्वच पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. परंतु नंतर राजकीय समीकरणेबदलत आधी मविआ तर नंतर महायुती सत्तेत आली. त्यातच निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असणार याविषयी अनेक तर्कवितर्क सुरू असतानाच सत्तेची नवी समीकरणे कशी असतील याविषयी लोक अंदाज बांधू लागले आहेत. दादांच्या पक्षाचे नेते 'दादाच 'किंगमेकर असतील असं सांगत आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वीच नंतरची चर्चाही रंगू लागली आहे.

## शहराचा विचका झालाय

घाटकोपर येथील प्रचार सभेत बोलताना राज ठाकरे म्हणाले, शहरात किती लोक येत आहेत, रस्त्यावर किती वाहनं येत आहेत. रस्ते आणि फूटपाथ अपुरे पडत आहेत. पण आपण हा सारा भार मुकाट्याने सोसत आहोत. भाषणाच्या जागी येण्यासाठी दीड तास लागला, ही या शहराची स्थिती आहे. रस्त्यांचे विद्रूपीकरण आणि बाहेरून येणाऱ्या नागरिकांच्या लोंढ्यांवरही राज ठाकरे यांनी तोफ डागली. महाराष्ट्रातील मोठ्या शहरातील बहुतेक रस्त्यांची स्थिती हीच आहे. मुळातच अरुंद असलेले रस्ते खड्ड्यामुळे पूर्णत: कुचकामी झालेले आहेत. त्यातच मोठ मोठ्या वाहनामुळे लोकांना वारंवार ट्रॅफिकजामला तोंड द्यावे लागते. प्रचंड वाहनसंख्येमुळे वाहनांना पार्किंग मिळत नाही त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने लावून ठेवलेली असतात. त्यामुळे रस्ते अजूनच लहान होतात. वाईट रस्ते आणि वाढती गर्दी यामुळे सगळ्याच शहरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या निमित्ताने सारेच राजकीय नेते गल्ली बोळात फिरून या रस्त्यांचा अनुभव घेतील तर कदाचित पुढच्या निवडणुकीत सगळे रस्ते चकाचक झाले असतील अशी महाराष्ट्रातल्या जनतेला भाबडी आशा वाटते आहे खरी.



## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# बड्या घराण्यातील बडी माँ...





आज देशातील सर्वात श्रीमंत कोण असे विचारले तर अंबानींचे नाव समोर येईल. श्रीमंतांच्या यादीतील त्यांच्या स्थानाची फेरफार सुरूच असते. मात्र, मुकेश अंबानी मातृसौख्याबाबत खरोखरच आपले अव्वल स्थान राखून आहेत. त्यांच्या मातोश्री कोकिलाबेन यांनी यंदा वयाची नव्वदी पूर्ण केली. अजूनही देवाच्या दयेने त्या ठणठणीत आहेत आणि नातवाच्या लग्नातही नृत्य करण्याइतपत ऊर्जावानही आहेत. आता धनकुबेराची माता म्हणून त्यांचे स्थान असले तरी प्रत्यक्षात त्यांनी अंबानींचे साम्राज्य उभारण्यासाठी आपल्या पतीला दिलेली साथ अजोड अशी आहेत.

कोकिलाबेन यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९३४ रोजी गुजरातच्या जामनगरमध्ये झाला. त्यावेळी भारतात इंग्रजांचे राज्य होते. त्यांच्या वडिलांचे नाव रतिलाल जशराज पटेल असे होते. आजही जामनगरचे महत्त्व अंबानी कुटुंबीयांमध्ये जबरदस्त आहे. कारण इथे त्यांच्या मातेचा जन्म झाला. याच कारणाने धीरूभाई आणि मुकेश अंबानी यांनी जामनगरमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजच्या रिफायनरीज उभारल्या. एवढेच नाही तर अंबानी कुटुंबाने अनंत आणि राधिका यांच्या तीन दिवसांच्या विवाहपूर्व भव्य सोहळ्यासाठी जामनगरचीच निवड केली.

### प्रेरणादायी दाम्पत्य

कोकिलाबेन यांचा जन्म ज्या काळात झाला त्यावेळी मुली-महिलांना शिक्षण देण्याकडे समाजाचा फारसा कल नव्हता. त्यामुळे कोकिलाबेन यांचे शिक्षण दहावीपर्यंतच झाले. त्या गुजराती शाळेत शिकल्या. जेव्हा धीरूभाई आपल्या कुटुंबीयांसह कोकिलाबेन यांना पाहायला आले तेव्हा त्यांना पहिल्या नजरेतच त्या आवडल्या होत्या. पाहुणे मंडळी गेल्यानंतर कोकिलाबेनला त्यांच्या घरच्यांनी विचारले की, तुला मुलगा पसंत आहे का? त्यावर प्रांजळपणे उत्तर देत कोकिलाबेन म्हणाल्या, मुलगा तर काळा आहे...! त्यावर त्यांची आई म्हणाली की, मुलगा काळा आहे पण त्याचे नशीब काळे नाही आणि सासूबाईंचे हेच वाक्य खरे ठरले. १९५५ मध्ये धीरूभाई आणि कोकिलाबेन यांचे लग्न झाले. लग्न करून त्या चोरवडला आल्या. त्यावेळी धीरूभाई ॲडेनला काम करत होते. त्या काही दिवसच पतीसोबत विदेशात राहू शकल्या. मुलगा मुकेशच्या जन्मानंतर त्या भारतात परतल्या. लग्नानंतरच्या काळात जेव्हा बायकोला नवऱ्याची सोबत सर्वाधिक गरजेची असते त्या काळात धीरूभाई आणि कोकिलाबेन एकमेकांपासून लांब होते. कोकिलाबेन सासरच्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत होत्या आणि पत्रातूनच पतीशी संवाद साधत होत्या. ॲडेन येथे काही वर्षे नोकरी केल्यानंतर तेथील नागरिकत्व आपोआपच मिळायचे. धीरूभाईंना जेव्हा ॲडेनचे नागरिकत्व मिळाले तेव्हा दुसऱ्याच दिवशी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. त्यांच्या भावाने रमणिकभाईंनी त्यांना समजावले की, इतकी चांगली नोकरी कशाला सोडतोस? त्यावर धीरूभाई म्हणाले, मला आता भारतात माझे नशीब अजमावायचे आहे. आता देवाने मला हा मार्ग दाखवला आहे त्यामुळे तो जे ठरवेल तसेच होईल.

जेव्हा धीरूभाई मुंबईला आले तेव्हा त्यांनी पत्नीला आणले आणि नंतर कधीही दोघे कामाच्या निमित्तानेसुद्धा वेगळे राहिले नाहीत. पतीच्या उद्योगात त्या बरोबरीने सहभागी व्हायच्या. कारण स्वत: धीरूभाईंचीच तशी इच्छा असायची. प्रत्येक मुद्यावर ते पत्नीचा सल्ला घ्यायचे. तिचे मत लक्षात घेऊन प्रसंगी त्यावर अंमलबजावणीही करायचे.

### इंग्रजी शिकवले

कोणताही उद्योग सुरू करायच्या आधी ते कोकिलाबेन यांना त्या ठिकाणची माहिती गोळा करायला सांगायचे. धीरूभाईंना लक्षात आले की, आपल्या बायकोला इंग्रजी येत नाही. त्यांनी इंग्रजी शिकविण्यासाठी एक शिक्षक नेमले आणि कोकिलाबेन इंग्रजी शिकल्या. त्यामुळे पतीच्या कामात साथ देणे त्यांना अधिक सोपे झाले. उद्योग विस्तारत असताना धीरूभाई विदेशात जायचे तेव्हाही पत्नीला सोबत न्यायचे. प्रत्येक ठिकाणाची माहिती करून द्यायचे. शिष्टाचार आणि औद्योगिक वातावरण अशा सर्व विषयांमध्ये धीरूभाईंनी कोकिलाबेन यांना शिक्षित केले. कोकिलाबेन यांनीही पतीच्या इच्छेचा मान ठेवत त्यांना हवी ती योग्यता प्राप्त केली. कदाचित यामुळेच त्या देशातील सर्वात मोठ्या उद्योग घराण्यातील कुलमाता होऊ शकल्या.

### मिश्किल धीरूभाई

कोकिलाबेन आपल्या नवऱ्याविषयी बोलताना नेहमीच त्यांच्या मिश्किल स्वभावाविषयी सांगतात. लग्नापूर्वी शाळेव्यतिरिक्त अगदी कुठेही घराबाहेर न गेलेल्या कोकिलाबेन यांनी कार वगैरे तर कधी अनुभवलीच नव्हती. धीरूभाईंनी जेव्हा पहिली कार घेतली तेव्हा त्यांनी बायकोला म्हटले, मी कार घेतली. त्याचा रंग कोणता आहे माहिती आहे का? काळा...अगदी माझ्यासारखा...! अशा मिश्किलपणा ते सतत करायचे.

### कोमल तितक्याच कणखर

कोकिलाबेन जितक्या साध्या आणि सरळ तितक्याच परिस्थितीनुरूप कणखरही राहिल्या. पतीच्या माघारी त्यांनी मुलांना आणि कुटुंबाला समर्थपणे सांभाळले. दोन मुले आणि दोन मुली असा संसाराचा डोलारा त्यांनी ढासळू दिला नाही. एक वेळ अशीही आली होती जेव्हा मुकेश आणि अनिल यांच्यात हिस्सेवाटे झाले. त्यावेळी आई कोकिलाबेन यांनी अतिशय कणखरपणे निर्णय घेतले आणि या वाटणीमुळे मनांची आणि प्रेमाची वाटणी होऊ नये याची खबरदारी घेतली. आज रिलायन्स इंडस्ट्रीतील सर्वात श्रीमंत शेअर होल्डर कोकिलाबेनच आहेत. त्यांनी या वाट्यासाठी अट्टहास धरला नाही. मात्र, घरातील मोठ्या म्हणून आपला वठ नक्कीच कायम ठेवला. त्यामुळेच आता अगदी नातवंडांपासून पणतूंपर्यंत सारेच त्यांना यथोचित मान देतात.

धीरूभाईंची अर्धांगिनी म्हणून कोकिलाबेन यांनी प्रत्येक टप्प्यावर त्यांना समर्थ साथ दिली. धीरूभाईंना अपेक्षित असणारी 'बेटर हाफ' बनण्यासाठीही त्यांनी कोणतीच कसूर ठेवली नाही. काळाची पावले ओळखून नव्या गोष्टी शिकल्या, आत्मसात केल्या. नवीन पिढी घडवली. सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यांनी आपल्या मोठेपणाचा बडेजाव कधीही मिरवला नाही. उलट, नवऱ्याच्या मोठेपणातच त्यांनी समाधान मानले. त्यांच्या या स्वभावामुळे धीरूभाई त्यांच्यावर नितांत प्रेम करायचे आणि त्याहीपेक्षा कितीतरी पटीने आदर करायचे. आपल्या प्रत्येक नवीन उद्योगाचा शुभारंभ ते कोकिलाबेनच्याच हाताने करायचे. गुलाबी रंगावर निरातिशय प्रेम करणाऱ्या कोकिलाबेन नेहमी त्याच रंगाच्या पोशाखात दिसतात. कधीकाळी स्वत: कपडे शिवणाऱ्या कोकिलाबेन यांचे कपडे आज मोठमोठे डिझायनर डिझाईन करतात. शुद्ध शाकाहार आणि श्रीनाथजींची भक्ती हे सूत्र आजही पाळणाऱ्या कोकिलाबेन देशातीलच नव्हे तर आशियातील सर्वात मोठे उद्योग घराणे आपल्या शिस्त आणि प्रेमाच्या भरवश्यावर सांभाळत आहेत. स्वत: धीरूभाई म्हणायचे की, कोकिला माझ्या जीवनात नसती तर कदाचित मी नशिबाची साथ मिळूनही कमनशिबीच ठरलो असतो. धीरूभाई कोकिलाबेन यांच्यासाठीच कदाचित म्हणत असतील की....


**तुम थी मेरे साथ तो हर पल यादगार हो गया**
**तुम थी मेरे साथ तो हर रास्ता मंझिल हो गया**
**गर तुम ना होती तो ये मकाम न होता...**
**हर पल कामयाबी का अंजाम ना होता...**
**जो मैं हूँ तेरे दम पर हूँ**
**तुम ना होती ये आम आदमी,**
**खास इन्सान ना होता...**

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/ ७८२१८१६४८५

# बहुगुणी पातुर

विविध प्रकारच्या भाज्या आणि फळं यातून अनेक जीवनसत्वं मिळतात. सोबतच ते चवीलाही छान लागतात. रानभाज्या वर्षातून एकदाच या फळं आणि भाज्या मिळत असल्यामुळे त्यांची आवर्जून आठवण केली जाते. अशीच एक बहुगुणी भाजी म्हणजे झाडीबोलीतील पातूरची भाजी! काही भागात तिला पाथरची भाजी या नावानंसुद्धा ओळखलं जातं. ही भाजी अतिशय गुणकारी असून ती शरीरात उष्णता निर्माण करते आणि पचनक्रियेला मदत करते. मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यावर दुसऱ्या आठवड्यात ही भाजी उगवायला सुरूवात होते. शेतात असलेल्या शेणखतावर किंवा मिरचीची लागवड केलेल्या वाडीत किंवा बोडीत असलेल्या रिकाम्या जागेवर ही भाजी उगवलेली दिसून येते. झुडुपाच्या उंचीची ही वनस्पती जमिनीवरच पसरते. तिची पानं लहान व बारीक असतात. काही दिवसांनी ही पानं जेव्हा जाड होतात तेव्हा झाडीबोलीत तिला कटरणे म्हणतात. काही दिवसांनी तिला बारीक पांढरी फुलंसुद्धा येतात.



या भाजीची पानं बारीक असल्यामुळे ती तोडायला थोडा वेळ लागतो. गावखेड्यात ही भाजी जास्त प्रमाणात मिळत असल्यामुळे तिची ओळखसुद्धा जास्त आहे. ही भाजी बनविण्याची पद्धत खूपच सोपी आहे. आधी ही भाजी दोनतीन वेळा धुवून आणि बारीक चिरून घ्यायची. कढईत तेल तापल्यावर लसणाच्या पाकळ्या ठेचून टाकायच्या. सुकलेल्या लाल मिरच्यांचे फोडून परतवून घ्यायचं. नंतर, त्यात मीठ, हळद टाकून पुन्हा छान परतवून घ्यायचं. आवडीनुसार त्यात मुग किंवा उडदाची डाळ भिजवून टाकतात. ते एकजीव झाल्यावर त्यात चिरलेली पातुरची भाजी टाकून, झाकण ठेवून कमी आचेवर शिजवून घेतात. ही भाजी निसर्गाच्या सान्निध्यात आणि कोणत्याही फवारणीशिवाय वाढल्यामुळे मसाल्यांशिवायही ती चविष्ट होते. पंधरा मिनिटात ही भाजी शिजते आणि शिजल्यानंतर मोकळी होते. विशेषत: भाकरी-ठेच्यासोबत किंवा साध्या वरणभातासोबतही ही भाजी मस्तच लागते. शिजलेल्या भाजीचा सुगंध इतका छान असतो की, जेवण झाल्यानंतरही अर्धा तास तरी हाताचा वास जात नाही. आजूबाजूच्या चार घरापर्यंत या भाजीचा खमंग वास जातो, त्या वेळी सहज ओळखतो येते की, पातुरची भाजी केली आहे. आधीचे माणसं निरोगी राहण्यासाठी अशा या गुणकारी भाज्या नियमित खात असत. ते आजही ही भाजी आणि रानात मिळणाऱ्या इतर भाज्या आवर्जून खाण्याचा सल्ला देतात. ही रानभाजी शरीरात उष्णता निर्माण करते म्हणून हिवाळा लागण्याआधीच ही भाजी आवर्जून खातात. बाजारातसुद्धा ही भाजी विकायला येते.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# जुन्या सोन्याचा 'रिमेक' कशाला ?



घरातील जुन्या सोन्याला मोडून नवीन फॅशनचे दागिने कुणी कुणी करतातत्यात खूप फायदा होतो कुणाचा? तुमचा? सोनाराचा? त्या वस्तूचा? अभिजात भारतीय संगीत म्हणजे समस्त भारतीयांना अभिमानास्पद अशी आपली वैविध्यपूर्ण शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताची विश्व ललामभूत परंपरा...घराणे, रियाज,गायकी, बंदिशी आणि बरंच काही ! अर्थात की गौरवशाली परंपरा आजही आपल्या जागी टिकून आहे. पण, त्याच अभिरुची संपन्न नसलेली ही रिमेक-रीमिक्स गाणी कुठून आली ? तसाच काहीसा सोन्याच्या दागिन्यांचा विषय आहे.

नवीन इमिटेशन ज्वेलरी आणून काय करायचं ते करा. पण, जुन्या अस्सल सोन्याला कशाला छेडायचं? जुन्या पिढीतील दर्दी म्हणू लागले...येतील का फिरूनी ते सोनियाचे दिवस, गेले ते दिन गेले !

पूर्वीचे दिवस अधिक दर्जेदार होते बुवा! हे वाक्य म्हाताऱ्या माणसाच्या तोंडी असते. अर्थात त्याला त्याचे उमेदीचे दिवस रम्य वाटणारच. काहींना हे नॉस्टेलजिक वाटू शकेल. पण, आज तंत्रज्ञानाच्या वाटेने भलेही अधिक प्रगत तरी सुसंस्कृततेच्या अंगाने जर अधोगती किंवा दर्जा खालावत असेल तर पूर्वीच्या दिवसांशी तुलना होणे क्रमप्राप्तच आहे.

उदा. तंत्रज्ञान अधिक प्रगत झालं त्यामुळे स्पष्ट फोटोग्राफी, गाण्याचं सुस्पष्ट रेकॉर्डिंग यात सुधारणा झाली खरी पण, स्टोरीचा आशय, स्क्रिप्ट विषय यांच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहायला हवा. फॅशन शोच्या रॅम्पवर होणारा वस्त्रवियोग, ऑनलाईन प्रश्न स्वयंवर, ऑनर किलिंग, नोट फॉर व्होट, पेड न्यूज इत्यादी अधोगामी वाटचाल कशी रोखावी? सोनं, गोडं तेल तेव्हाही महागच होतं. पण, जे होतं त्याला अस्सल सुगंध होता. भेसळ करण्याचा शोध तेव्हा लागला नव्हता. खोबरेल तेल हिवाळ्यात गोठत होतं. अन्नधान्याची कमतरता असली तरी विदेशी संकरीत वाण, प्लास्टिक तांदूळ असले प्रकार नव्हते. आता रेसिपी वाढल्या पण पोषण बिघडलं. कोल्ड्रिंकच्या बाटलीवर फळांचा फोटो पण आत मात्र केमिकल्स! टोमॅटो सॉससाठी टोमॅटोची गरज नाही. प्रोसेस्ड फूडमध्ये प्लास्टिक, चरबी, पेस्टीसाईड्स यांचा अंतर्भाव चिंताजनक नाही का? फिनिशिंग, पॅकिंग आणि जाहिरात उत्तम असली तरी मजबुती आणि टिकाऊपणा कमीच असतो. आता कपड्यांची रेलचेल आणि प्रसाधने बक्कळ झालीत. भौगोलिक अंतर जवळ झाले. इंटरनेटने जग जोडले पण, संवाद हरवत चालला.

धोतर, उत्तरीय, पातळ, सोवळे, कद, धाबळ, पंचा आदि देशी वस्त्रांना शिवून घालण्याची पद्धत नव्हती. त्यासाठी शिंप्याची गरज नसायची. सलग वस्त्रच उपयोगात आणत. आता थेट कारखान्यातून आलेले रेडीमेड कपडे! हे चांगलं की वाईट हा मुद्दा नाही. जुन्या आणि नव्या दिवसांची तफावत आणि प्रगतीची दिशा ध्यानात घ्यावी.

फौंटेनपेन निब आणि ती लाकडी जीभ कुठे गेली? वीत, पायली, वार-हात ही मोजमापं, इतकंच काय, रोलचा कॅमेरा, व्हीसीडी, व्हीसीपी, व्हीसीआर, फ्लॉपी, सीडी सारे संदर्भ कालबाह्य झाले तरी त्यांचे विशिष्ट काळातील महत्त्व नाकारता येत नाही. पूर्वी चौसोपी वाडा, अंगण, ओसरी, तख्त, वृंदावन, सडारांगोळी हे सर्व फ्लॅट संस्कृतीशी तुलना करून बघा बरं! बंद दारासमोर दारामधून वर जायचा जिना, आतल्या खोल्यांत साऱ्या भावभावनांची गर्दी आणि पूर्ती! हे सुद्धा जुन्या सोन्याचं रिमेक म्हणावं काय?

तात्पर्य काय तर कालजयी निर्मिती सातत्याने सुरू रहावी इतकंच! अल्पावधीतच विस्मृतीच्या गर्तेत लोप पावणारी गाणी काय कामाची? एक मार्मिक प्रश्न मनात आला की, अंताक्षरी खेळताना ती सदाबहार जुनी गाणीच का आपल्याला येतात? नवी गाणी तुम्हाला का आठवत नाहीत? मला वाटतं या प्रश्नातच सारं काही आलंय !

काही वस्तू कालबाह्य झाल्या आहेत. सोयीचे मिक्सर आल्यावर, पाटावरवंट्याचा घाट कोण घालील? रेडीमेड कणिक आल्यावर धान्य पाखडायचे सूप पार गायबच झालं. चक्कीवर दळून मिळतंय तर खलबत्ता हवाय कशाला? छान तयार लोणच्याचे पाऊच मॉलमध्ये बारोमास मिळतात तर मोसमी लोणच्याच्या बरण्या कोण संभाळणार? वॉशिंग मशीनमुळे कपडे आपटून धुण्याचा तो उतरता दगड दिसेनासा झालाय. पण, जुन्या सोन्याच्या प्रेमात पडलेल्यांची व्यथा काही वेगळीच असते.

हल्ली भाजी चिरण्यासाठी चाकू किंवा चॉपरचा वापर घरोघरी यासाठी पारंपरिक विळी वापरली जात असे. तेव्हा चुलीवरचा स्वयंपाक हा खाली बसूनच करावा लागे आणि खाली बसून विळीवर एक पाय ठेवून छान भराभरा चिरले जाई. विळीची धार लागून इजा होऊ नये म्हणून तिला फोल्ड करायची सोय होती. तसेच, त्या विळीच्या मुखाशी खोवण्याचे एक चक्र असे.

हे सर्व सांगण्याचे कारण की, मोठ्या दुकानात हल्ली विळी माहितीही नाही. तिथल्या पोराला मी विचारलं तर त्याला आठवले की, वो चांद जैसा लोहे का रहता था। बचपनमे देखा था। या वस्तू आजही मिळतात पण, हार्डवेअरच्या दुकानात किंवा फुटपाथ वरील लोखंडी वस्तू विक्रेत्याकडे ! दक्षिण भारतातील विळीचा आकार उलटा चंद्राकार आला. एकंदरीत आपल्या विळीचा आकार हा अधिक सुलभ सोयीचा आणि वैज्ञानिक वाटतो

पूर्वी जेवणाची ताटे असत. आता थाळ्या असतात. थाळ्यांचा पृष्ठभाग हा समतोल असून ताटे मधून फुगीर असत. त्यात मध्यभागी पोळी ठेवली तर ती भाजीच्या रस्सामध्ये भिजत नाही. या अर्थी ताटांची रचना अधिक वैज्ञानिक वाटते.

आता पाणी प्यायचे लंबोळके पेले सर्वत्र दिसतात. पूर्वी फुलपात्र असत. नंतरच्या काळात फुलांच्या पाकळ्या जाऊन बसके पेले आले. तेव्हा स्टीलचा पत्रा इतका जाड असे की, भांडी आपटली तरी त्याला पोचे पडत नसत. पूर्वीची स्टेनलेस स्टील आणि प्लास्टिकचे दीर्घायुष्य आता घटले ही अधोगती नव्हे काय? दैनंदिन वापरातील वैज्ञानिक साधने कित्येकदा वापरण्यासाठी फारशी सोयीची नसतात. त्यामुळे पारंपरिक वस्तू टिकून राहतात.

आता धैर्य, सहनशक्ती, श्रद्धा, विश्वास हे शब्द जुनाट झाले. वडीलधाऱ्यांबद्दल आदर आणि त्यांचा अनुभवाचा सल्ला घेणे आता कमीपणाची वाटू लागलेय. अतिथी अध्यागत कोणाला नकोय. अंग मेहनत आणि आहार विहारातील शुचिता आणि स्वयंपाकघरातील दरवळ हे सर्व कमी झालं. परिणामी नकली, भेसळी, रेडीमेड पदार्थ वाढीस लागले. परिणामी दिखाऊ प्रेम, निर्लज्जासारखे कपडे, रात्रीची झोप गेली आणि डोक्यावरचे केसही गेले. विवाहसंस्था मोलाची की लिव्ह इन रिलेशनशिप? ही कसली प्रगती?

त्याऐवजी आता काही कुचकामी गोष्टी नव्याने आल्यात. उदा. क्रोध, हाव, जळफळाट, भ्रष्टाचार हाच शिष्टाचार, कारस्थाने हेच कर्तृत्व व्यसनाधीनता हाच छंद, परिणामी मानसिक रोग, विकतचे पुरस्कार, खोटी प्रतिष्ठा आणि अनितीचा पैसा, नकली संकरित वाण, किरण्याच्या दुकानापेक्षा औषधांची दुकाने अधिक झाली. उच्च शिक्षण प्राप्त करूनही मूल्य शिक्षणाची वानवाच! वैज्ञानिक प्रगतीसोबत जपानी लोकांनी आपली संस्कृती कशी जपली? आपण आकाशात घेतली खरी पण, मातीशी नाळ का तोडली?

# लांबोटी चिवडा अन् वर कुंदा चहा!

सुचित्रा बाकरे/ ९९७५७४३८८४






संध्याकाळचे साडेचार-पाच वाजले असतील. नुकतीच उन्हाची तीरिप कमी झाली. सांज फुलता फुलता कलत होती. आकाशात वेगवेगळ्या रंगांच्या छटा उमटल्या होत्या. पाच-सहा तासापासून प्रवास करत, आत्ता सोलापूर हायवे गाठला होता. प्रवासामुळे थकवा आल्यासारखा वाटला. इतक्यात आमचे फॅमिली फ्रेंड भेटले. आम्ही गाडी बाजूला लावली आणि गप्पा मारत होतो. फ्रेश होण्यासाठी एक वाफाळलेला चहा हवा, असं मनात आलं. अचानक डाव्या बाजूला पाटी बघितली जय शंकर लांबोटी चिवडा अन् वर कुंदा चहा...! या पाटीचे नाव जोराने वाचताच आमचे मित्र म्हणाले, अहो... तुम्हाला माहिती नाही लांबोटी चिवडा आणि कुंदा चहा? मी म्हटलं, नाही! ते म्हणाले, अरे काय सांगू मज्जा तुम्हाला! एकदा प्याल ना तर प्रेमातच पडाल! काय तो लांबोटी चिवडा अन् वर कुंदा चहा! आम्हाला हे नाव ऐकून आश्चर्य वाटलं. आम्ही कधी हे नाव ऐकलंच नव्हतं. त्यांनी ज्या पद्धतीने सांगितलं असं वाटलं, बाप्पा हे नाटक तर नाही करत आहेत. पण, जेव्हा खरंच अनुभव घेतला, तेव्हा प्रचिती आली. आमच्या मित्रांनी हे नाव सार्थक होईल, असे रंगवून सांगितले. म्हणाले, तो कॉर्नफ्लेक्सचा लाल चुटूक तिखट चिवडा, तळलेले घुंगरू शेंगदाणे, कढीपत्त्याचा नाकात घुसणारा स्वाद, लाल तिखटाची उडवलेली, भिरकवलेली चिमूट आणि वर लांबोटी मसाल्याची परत मचमच असा आवाज करत, हावभाव करत सांगत होते. ते ऐकून आमच्या तोंडाला पाणीच सुटले. पुढले ऐकण्याच्या आधीच मी आवंढा गिळला नाहीतर लाळ टपकायला वेळ लागला नसता. मी पटकन विचारले, अहो आणि तो कुंदाचा चहा...माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आत ते सात मजली हसले आणि म्हणाले, कुंदाचा नाही हो, तर कुंदा चहा! त्यांचा या नाटकातील दुसरा अंक सुरू झाला.

ते म्हणले, ऐका तर, ताज्या ताज्या दुधाचा बनवलेला खमंग लालसर खवा! असा लुसलुशीत खवा बघून गटकावासा वाटतो. (तितक्यात मी माझ्या मिस्टरांचा तोंड अलगद बंद केलं.) ऐकताना एकमेकांकडे बघतच होतो. अहो, बघताय काय? तुम्ही जावा समोर दोन किलोमीटर वर हाय. जयशंकर लांबोटी चिवडा आणि कुंदा चहा! माझा पुढला प्रश्न अहो, खव्याचा चहा की काय? बासुंदी चहा मी ऐकला होता. अहो, ऐका तर पुढे मॅडम, असा तो एका किटलीत घट्ट, खळखळ उकळणारा चहा आणि दुसरीकडे ग्लासमध्ये पटकन लुसलुशीत ताज्या खव्याचा गोळा आणि वर उकळता चहा घालायचा, कालवायचा आणि प्यायचा! प्यायचा काय तो खायचाच! हे सगळं वर्णन ऐकून आम्ही त्यांना टाटा करून लगेचच तिथून निघालो. दोन किलोमीटरवर एकदाचा जयशंकर लांबोटी चिवडा आणि वर कुंदा चहा अशी पाटी दिसली. आम्ही लगेच गाडी बाजूला लावली. गाडीतून लगबगीने हॉटेलमध्ये गेलो तर काय? जागोजागी असे लोकांचे समूह उभे होते आणि ते चहा पिताना दिसले. पण प्रत्येकाच्या जवळ मोठा काचेचा ग्लास आणि त्यात चमचा! प्रत्येक व्यक्ती चमच्याने काहीतरी खात होती. आत गेलो तर घ्या कुंदा चहा...घ्या कुंदा चहा आणि सोबत लांबोटी चिवडा... असं वेटर लोक नाटकी पद्धतीने बोलत होते. अहो, आम्हाला आमच्या मित्राने वर्णन केलेली संपूर्ण कथा आठवली. आम्ही हसलोच आणि लगबगीने तो चिवडा आणि चहा काय प्रकार आहे? ते बघण्यासाठी समोर गेलो. तर अहो काय सांगू? चव दाखवण्यासाठी समोरच डिशभर चिवडा ठेवला होता. त्यांनी आमच्या हातावर मुठभर चिवडा ठेवला म्हणजे कोंबलाच. जर हात समोर नसता केला तर तोंडातच कोंबला असता की काय? असे वाटले. इतके ते लोक चव दाखवण्यासाठी आतुर होते. आरारारा काय झणझणीत चिवडा! नाकातोंडातून वाफा निघायला लागल्या खरंच! मी तर नाचायलाच लागले. तर त्यांना वाटलं आवडला चिवडा! त्यांनी आणखीन ओंजळभर चिवडा माझ्या हातात दिला. बापरे...भयंकर टेस्टी, भयंकर तिखट! अहो हे सगळं बघत बघत समोर गेले तर, चहा काऊंटर दिसले. त्यांची सगळी टीम तयार होती. ती टीम एकमेकांना काहीही न बोलता एकामागून एक काम करत होती. एकाने ग्लास ठेवले, दुसऱ्याने लुसलुशीत खव्याचा गोळा टपकन आवाज येईल अशा पद्धतीने ग्लासमध्ये घातला, तिसऱ्याने गॅसवर खळखळ उकळत असलेला घट्ट चहा ओतला. ओतला ना ओतला तोच ग्लास झर्रकन माझ्या चेहऱ्यासमोर आणला. घ्या मॅडम, हे बघण्यासाठी आणि पिण्यासाठी तोबा गर्दी होती. असा वाफाळलेला ग्लास धरला. मी लगेच त्या चहाच्या प्रेमात पडले. ग्लास हातात घेतला. झुर्रकन आवाज करत पहिला घोट घेतला. आ हा हा... स्वर्गसुख स्वर्गसुख काय म्हणतात ते हेच तेव्हा कळले. कुंदा चहा... अक्षरशः त्या खव्याची चव चहात उतरली होती. तो पहिला घोट तोंडात गेला. हळूहळू गळ्यातून उतरून अन्ननलिकेत उतरला. आमच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलत गेले. आम्हाला त्या चहाची जणू नशा चढत गेली. आम्ही चहाचा प्रत्येक घोट त्याच्या आकंठ प्रेमात बुडत पीत होतो. इतका आवडला की, लगेच दुसरा ग्लास खुणेनेच मागवला. तो पिताना आधी घेतलेल्या चहाचा असर होत गेला आणि समाधानाचे वलय चेहऱ्यावर पसरत गेले. सर्वांग त्या कुंदाने जणू डीप डीप झाले होते. शेवटचा घोट घेतला. न बोलताच मी आणि मिस्टर निघालो. त्या चहाचा परिणाम, चव, गंध, स्वाद जिभेवर तरंगत, रेंगाळत निघालो. गाडीत बसलो. खिडक्या उघडल्या. गार हवेची झुळूक आली आणि गाणे लागले,

***ये जिंदगी उसी की है, जो किसी का हो गया***
***प्यार मे ही खो गया...***

धूम
विधानसभा निवडणुकीचा 'मत'संग्राम
www.tarunbharat.net
तरुण भारत
मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४





# पृथ्वीराज चव्हाण राज्यातील काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री



श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

आदर्श घोटाळ्यात तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना सत्ता गमवावी लागल्यानंतर ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. केंद्रीय मंत्रिमंडळात असताना महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून पाठवण्यात आलेले शरद पवारानंतर चव्हाण हे दुसरे नेते आहेत.



राज्याचे आधीचे मुख्यमंत्री आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्यात एक फरक आहे. राज्यात मुख्यमंत्रिपद भूषवल्यानंतर महाराष्ट्राचे अनेक नेते केंद्रात मंत्री झाले. त्यात यशवंतराव चव्हाणांपासून शरद पवारांपर्यंत अनेकांचा समावेश होता. मात्र, पृथ्वीराज चव्हाण आधी केंद्रात मंत्री होते, नंतर ते महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून आले. एका अर्थाने राजकारणातील ही उलटी गंगा म्हणायला हरकत नाही.

बाबा या नावाने राजकीय वर्तुळात ओळखले जाणाऱ्या पृथ्वीराज चव्हाण यांना राजकीय वारसा घरातूनच लाभला होता. त्याचे वडील दाजीसाहेब चव्हाण आणि आई प्रेमलाकाकी चव्हाण काँग्रेसचे कराड मतदारसंघाचे अनेक वर्ष खासदार होते. कराड मतदारसंघ हा चव्हाण घराण्यासाठी जणू राखीव होता. आधी वडील दाजीसाहेब, नंतर आई प्रेमलाकाकी यांनी लोकसभेत कराड मतदारसंघाचे प्रदीर्घकाळ प्रतिनिधीत्व केले. नंतर हा वारसा अनेक वर्ष पृथ्वीराज चव्हाण यांनी सांभाळला. १९५७ ते १९७३ या काळात दाजीसाहेब नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात होते. १९७३ मध्ये दाजीसाहेब यांच्यानंतर निधनानंतर कराड लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी प्रेमलाकाकी विजयी झाल्या. त्यांनीही सलग चारवेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले.

पृथ्वीराज चव्हाण यांच्या संपूर्ण कुटुंबाची निष्ठा काँग्रेस आणि गांधी घराण्यावर होती, त्याचे बक्षीसही त्यांना मिळाले. उच्चविद्याविभूषित पृथ्वीराज चव्हाण यांची संयमी आणि मितभाषी नेते अशी प्रतिमा आहे. राजीव गांधी यांच्या संपर्कात आल्यानंतर पृथ्वीराज चव्हाण काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय झाले. १९८४ ची पहिली लोकसभा निवडणूक त्यांनी कराड मतदारसंघातून जिंकली. १९९१, १९९६ आणि १९९८ अशा नंतर तीन सलग निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून लढवल्या. १९९९ च्या निवडणुकीत मात्र त्यांचा पराभव झाला. २००२ मध्ये राज्यसभेवर त्यांची नियुक्ती झाली. २००८ मध्ये राज्यसभेवर त्यांची फेरनिवड झाली. डॉ. मनमोहनसिंग मंत्रिमंडळात अनेक महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले. मनमोहनसिंग मंत्रिमंडळात असतानाच त्यांना महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून पाठवण्यात आले.

काँग्रेसच्या अंतर्गत वर्तुळात चव्हाण शरद पवारांचे विरोधक मानले जात होते. प्रणव मुखर्जी यांनी अशोक चव्हाण यांच्या जागेवर पृथ्वीराज चव्हाण यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याची घोषणा केली. ११ नोव्हेंबर २०१० रोजी चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. जवळपास ४ वर्ष ते मुख्यमंत्री होते. २०१४ ची विधानसभा निवडणूक काँग्रेसने चव्हाण यांच्या नेतृत्वात लढवली. पण, या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. तेव्हापासून महाराष्ट्रात काँग्रेसचा मुख्यमंत्री झाला नाही. त्याअर्थाने चव्हाण हे महाराष्ट्रातील काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री म्हणायला पाहिजे. आता राज्यात काँग्रेसचा मुख्यमंत्री होणे शक्य दिसत नाही. राज्याच्या राजकारणात काँग्रेसला नेहमीच दुय्यम भूमिका घ्यावी लागली. ■

# सत्तेसाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाऊ शकते



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी झारखंडच्या बोकारो जिल्ह्यात भव्य जाहीर सभा झाली. या सभेसाठी हजारोंच्या संख्येने लोक पायी चालत आले होते. यावरून मोदी यांचे तेजस्वी विचार ऐकण्यासाठी त्यांच्या मनातील जिज्ञासा दिसून येते

### माफियांना तुरुंगात पाठवणार

झामुमोच्या नेतृत्वाखालील आघाडीने तयार केलेले भरती माफिया आणि पेपरफुटीच्या माफियांना तुरुंगात पाठवले जाईल आणि तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असे मोदी यांनी सांगितले. ■

### पंतप्रधान मोदींचा बोकारोत घणाघात

◆ **बोकोरो, ११ नोव्हेंबर**

काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चाची (झामुमो) कटकारस्थाने आणि दुष्ट योजनांपासून दूर राहा. सत्तेसाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाऊ शकते, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केला.

ओबीसींमधील पोटजातींमध्ये फूट पाडून काँग्रेस आणि झामुमोला त्यांना परस्परात झुंजवायचे आहे. तुम्ही 'एक राहाल, तर सेफ राहाल', असे नरेंद्र मोदी यांनी झारखंडमधील बोकारो येथील प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले. ओबीसी, आदिवासी आणि दलितांमध्ये एकी नसेल, तर काँग्रेस केंद्रात सत्ता स्थापन करेल, असे ते म्हणाले.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून काँग्रेस अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींची विरोधक आहे. जोपर्यंत ऐक्य झाले नाही, तोपर्यंत काँग्रेसने केंद्रात सरकार बनवले आणि देशाला लुटले. छोटानागपूर विभागात ओबीसींमध्ये १२५ पोटजाती असल्याचे मानले जाते. या पोटजातींना यादव विरुद्ध कुर्मी आणि सोनार विरुद्ध लोहारप्रमाणे परस्परांच्या विरोधात उभे करून ओबीसींमध्ये फूट पाडण्याची काँग्रेस आणि झामुमोची इच्छा आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० पुनर्स्थापित करण्याच्या मुद्यावर नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्ला चढवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान पुन्हा जम्मू-काश्मीरच्या बाहेर ठेवण्यासाठी काँग्रेस आणि या पक्षाच्या साथीदारांना कलम ३७० पुन्हा आणायचे आहे. दुसरीकडे आमचे जवान तिथे दहशतवादाची धग सहन करीत आहे. जम्मू-काश्मिरातील कलम ३७० मोदींनी गाडले आहे. सात दशकांपर्यंत आंबेडकर यांचे संविधान तिथे लागू नव्हते, असे मोदी म्हणाले.

जम्मू-काश्मीरच्या मुख्यमंत्र्याने प्रथमच भारतीय संविधानाच्या नावाने शपथ घेतली. ही खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली आहे. भाजपाला झारखंडमधून घुसखोरांना बाहेर करायचे तसेच भ्रष्टाचार संपुष्टात आणायचा आहे. ◂(वृत्तसंस्था)

## इति-उवाच...



ओमराजे मला तुमची गोष्ट अजिबात पटली नाही. या वयातही मी फिरतो, असे तुम्ही म्हणालात, मी काय म्हातारा झालोय् का? हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. शांत बसणार नाही.
**शरद पवार,** राकाँशप प्रमुख



ज्या उमेदवाराला तुतारी गटाने उमेदवारी दिली आहे, ते बापू पठारे यांच्यावर त्यांच्याच सुनेने विनयभंग, शारीरिक व मानसिक अत्याचाराचे गुन्हे दाखल केले आहेत. सुप्रिया सुळे हाच का तुमचा महिला सन्मान?
**रूपाली चाकणकर,** राकाँ नेत्या



कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे पैसे हाणले, दुसऱ्या ठिकाणी काढलेले कारखाने हाणण्याचे काम जयंत पाटील करतात. लोकांना पिण्याचे पाणी देत नाहीत, अंगातच पाणी नाही, तर लोकांना कुठून देणार? पहिले शेतकऱ्यांना पैसा द्या, मग मुख्यमंत्रिपदाच्या गप्पा मारा.
**अजित पवार,** उपमुख्यमंत्री



वारे उबाठा तुझे हिंदुत्व...! हे हिंदुत्व असते...? याला म्हणतात हिंदुत्व...? अरे मतासाठी एवढी लाचारी पत्करायची असेल...तर आम्हाला सांगा, आम्ही बिनविरोध निवडून देतो; पण गुडघे नका रे टेकू...!
**संजय शिरसाट,** शिवसेना नेते

# तिरंगी लढतीमुळे इंदापुरात चुरस वाढली

◆ **बारामती, ११ नोव्हेंबर**

बारामतीच्या बांधावर असलेल्या इंदापूर मतदारसंघात तिरंगी लढत होत असल्याने मोठी चुरस निर्माण झाली आहे. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत झालेल्या फाटाफुटीचा कोणाला फायदा होणार, कोणाला तोटा होणार, यावर चर्चा रंगत आहेत.

शरद पवार गट विरुद्ध अजित पवार गट अशी थेट लढत येथे होणार, अशी अटकळ बांधली जात होती. त्यासाठी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश करीत तिकीट मिळविले. अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे निवडणूक लढवणार, हे आधीच स्पष्ट झाले होते. परंतु, पाटील यांचा पक्षप्रवेश आणि त्यानंतर त्यांची जाहीर झालेली उमेदवारी शरद पवार गटाला हादरे देणारी ठरली. पाटील यांना उमेदवारी देताच लोकसभेवेळी सुप्रिया सुळे यांना मदत करणारे आप्पासाहेब जगदाळे नाराज झाले. त्यांनी वेळ न दवडता अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. दुसरीकडे सोनाईचे संचालक प्रवीण माने स्वतःच्या अपक्ष उमेदवारीवर ठाम राहिले. माने लोकसभेवेळी अजित पवार यांच्यासोबत होते. लोकसभेनंतर आपल्याला उमेदवारी मिळावी, ते शरद पवार गटात गेले होते. परंतु, उमेदवारी पाटील यांच्याकडे गेल्याने तेही अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरले.

इथपर्यंत सगळे ठीकठाक चालले, असे दिसत असतानाच सोनाईचे सर्वेसर्वा दशरथ माने यांनी हर्षवर्धन पाटील यांना जोरदार धक्का दिला. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापूर शहर मध्यमध्ये चौरंगी लढतीने चुरस

**फडणवीसांकडून ''देवेंद्र''च्या पालकत्वामुळे विजयाचा निर्धार !**

**महाविकास आघाडीतील बिघाडीचा फायदा महायुतीला होणार?**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर दि. ११ नोव्हेंबर-**

गेली तीन टर्म काँग्रेसने विजयाची हॅट्रिक साधलेला सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघाचा गड खेचून आणण्यासाठी भाजपने वज्रमुठ आवळली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देवेंद्र कोठे यांचे पालकत्व स्वीकारल्याने अभी नही कभी नही म्हणत विजयाचा निर्धार केला आहे. दरम्यान, महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचा फायदा महायुतीलाच होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सोलापूर जिल्ह्यात ११ मतदारसंघापैकी शहर मध्य वगळता सर्वच इतर सर्व १० मतदारसंघावर महायुतीचे वर्चस्व आहे. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात सन २००९ सन २०१४ आणि सन २०१९ या तिन्ही निवडणुकीत काँग्रेसने विजय संपादन करत आपले वर्चस्व सिद्ध केले. तीन टर्म आमदारकी भूषवण्याचा मान काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी मिळविला. यामुळे शहर मध्य हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे आ. प्रणिती शिंदे यांनी भाजपचे उमेदवार आ. राम सातपुते यांचा पराभव केला. सोलापूर लोकसभा निवडणुकीत सोलापूर शहर मध्य मतदार संघात काँग्रेसला ७९६ मताधिक्य मिळाले होते. तर मागील २०१९ च्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत भाजपला ३० हजार ८२९ चे मताधिक्य मिळाले होते. प्रणिती शिंदे या खासदार झाल्यामुळे शहर मध्य मतदार संघात पंधरा वर्षानंतर काँग्रेसने नवा उमेदवार दिला आहे. या मतदारसंघात काँग्रेसने शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना रण मैदानात उतरवले आहे.

राष्ट्रवादी व शिवसेना या दोन पक्षाच्या फुटी नंतर यंदाची ही विधानसभा निवडणूक होत आहे. यादरम्यान महाराष्ट्रात भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यासह इतर पक्ष मिळून महायुती आहे. तर दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि इतर घटक पक्ष अशी महाविकास आघाडी आहे.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत एमआयएम पक्षाने उमेदवार उभा केला नव्हता. तर महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या माकपाने काँग्रेसला पाठिंबा दिला होता. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी अंतर्गत काँग्रेसने माकपला उमेदवारी देत पाठिंबा द्यावा अशी प्राथमिक चर्चा झाली होती. मात्र या मतदारसंघात त्या संदर्भात निर्णय झाला नसल्याचे दिसून येते. यामुळे अखेर या निवडणुकीत काँग्रेसने आणि माकपने आपले स्वतंत्र उमेदवार उभा केला. माकपाकडून माजी आमदार नरसय्या आडम हे मैदानात उतरले आहेत. तर काँग्रेस कडून शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात एकूण २० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

भाजपाकडून माजी नगरसेवक देवेंद्र कोठे हे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. देवेंद्र कोठे यांचे पालकत्व स्वीकारत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना भाजप प्रवेश दिला. शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून देवेंद्र कोठे यांना उमेदवारी देण्यात आली. सोलापूर लोकसभा निवडणुकीत ही देवेंद्र कोठे यांनी झंझावाती प्रचार केला होता. या मतदारसंघात हिंदुत्वाचा मुद्दा प्राधान्याने पुढे आणण्यात आला. गेली तीन टर्म काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला हा मतदारसंघ खेचून आणण्यासाठी भाजपने वज्रमुठ आवळली आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील पराभवाचा वचपा या माध्यमातून काढण्याचा निर्धार भाजपने केला असल्याचे दिसून येते. ''अभी नही तो कभी नही'' असे मानून विजयाची खेळी भाजपने आखली आहे. पद्मशाली, तेलगू भाषिक त्याचबरोबर मुस्लिम, मोची आणि भटके विमुक्त समाज घटकांची मते मोठ्या प्रमाणात आहेत. भाजपने यापूर्वीच पद्मशाली, मोची भटके विमुक्त या समाज घटकांच्या मतांकडे लक्ष केंद्रित केलेले आहे.

**आघाडीतील बिघाडीचा फायदा महायुतीला होणार?**

महाविकास आघाडी अंतर्गत शहर मध्य मतदारसंघात बिघाडी झाली आहे. माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी दंड थोपटले आहे. काँग्रेसने केसाने गळा कापल्याचा आरोप माकपचे नरसय्या आडम यांनी केला आहे. त्यामुळे बिघाडीचा फायदा महायुतीच्या उमेदवाराला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातच काँग्रेसचे माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी काँग्रेसला रामराम करत प्रहार जनहित पक्षाकडून दक्षिण मतदार संघावर स्वारी केली आहे. त्याचा फटकाही काँग्रेसला बसू शकतो. मोची आणि मुस्लिम समाजातील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सुरुवातीला नाराजीचा सूर आळवला मात्र त्यांची नाराजी दूर करण्यात आली. यामुळेही काँग्रेसला इथे निवडणूक आव्हानात्मक आहे.

**२०१९च्या निवडणुकीत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना १२ हजारांचे मताधिक्य**

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर मध्य मतदार संघात काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी एमआयएमचे उमेदवार फारूक शाब्दि यांचा १२ हजार २१९ मतांनी पराभव केला होता. फारूक शाब्दि यांना ३८ हजार २२१ मते (२३.०२ टक्के) तर काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना ५१ हजार ४४० मते (३०.५८ टक्के), अपक्ष उमेदवार माजी महापौर महेश कोठे यांना ३० हजार ८१ मते (१७.८८ टक्के), शिवसेनेचे उमेदवार माजी आमदार दिलीप माने यांना २९ हजार २४७ (१७.३९ टक्के) तर माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांना १० हजार ५०५ (६. २४ टक्के ) मते मिळाली होती. शाब्दि, कोठे, माने आडम या चार उमेदवारांच्या मतांची गोळा बेरीज पाहिली केली असता सुमारे एक लाख दहा हजार मते अशी होते. तर काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना ५१ हजार ४४० मते मिळाली होती. यामुळे यंदा मतांचे गणित आणि राजकीय समीकरण वेगळेच असणार आहे.

**यंदाच्या निवडणुकीत शहर मध्य मतदार संघात हे आहेत उमेदवार**

यंदाच्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत शहर मध्य मतदारसंघात एकूण २० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये नरसय्या आडम (माकप), देवेंद्र कोठे (भाजपा), चेतन नरोटे (आय काँग्रेस), फारुख शाब्दी (एमआयएम), प्रा. डॉ. सुभाष गायकवाड (बसप), खिझार खुद्दुस पिरजादे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), मनीष कोमटी (राष्ट्रीय जनमंच), रविकांत बनसोडे (आरपीआय ए), श्रीनिवास संगेपाग (वंचित बहुजन आघाडी), अपक्ष उमेदवार - म. तौफिक शेख, रोहित मोरे, दत्तात्रय थोरात, देविदास दुपारगुडे, रवी म्हेत्रे, प्रदीप सर्जन, मनीष गायकवाड, योगेश शिदगणे, विक्रम कसबे, सैफन शेख, डॉ. संदीप आडके आदी.

**यंदा होणार चौरंगी लढत**

शहर मध्य मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत चौरंगी लढतीचे चित्र आहे. माजी आमदार नरसय्या आडम (माकप), माजी नगरसेवक देवेंद्र कोठे (भाजपा), काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे (आय काँग्रेस), फारुख शाब्दी (एमआयएम) यांच्यात प्रमुख लढत होईल. महाविकास आघाडी अंतर्गत बिघाडी झाली आहे. यामुळे आघाडीचे मत विभाजन होणार असल्याचे चित्र आहे. धार्मिक मुद्द्यांमुळे मतांचे ध्रुवीकरण होणार आहे.

**महायुतीची वज्रमूठ अभेद्य !**


एकीकडे महाविकास आघाडीत बिघाडीचे चित्र तर दुसरीकडे महायुती अंतर्गत असलेले भाजपा , शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची वज्रमूठ अभेद्य राहिली आहे. शिवसेना शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी सुरुवातीला इतर पक्षात जात नाराजी दर्शवली होती. मात्र लागलीच ते संबंधित सर्वजण घर वापसी करत सक्रिय झाले. यामुळे यंदाच्या निवडणुकीत महायुती ताकदीने मैदानात उतरली आहे.

**वाढलेल्या ४४ हजार ५१७ मतदारांचा कौल कोणाकडे?**

सन २०१९ च्या निवडणुकीत या शहर मध्य मतदारसंघात एकूण ३ लाख २ हजार १६० मतदार होते. मागील निवडणुकीत ५५.६७ टक्के मतदान झाले होते. तर यंदाच्या २०२४ च्या निवडणुकीसाठी एकूण ३ लाख ४६ हजार ६७७ मतदार आहेत. दरम्यान, यंदाच्या निवडणुकीत वाढलेल्या हे ४४ हजार ५१७ मतदारांचा कौल कोणाकडे जातो? हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

# निमगावच्या 'हिरे' घराण्याची चर्चा होणारच

## दहा हजार लोकवस्तीच्या गावाने दिले आठ आमदार



◆ **नाशिक, ११ नोव्हेंबर**

मालेगाव तालुक्यातील दहा हजार लोकवस्तीचे गाव असलेल्या निमगाव गावाने आतापर्यंत वेगवेगळ्या मतदारसंघात एकट्या हिरे घराण्याचे आठ आमदार दिले आहेत. निमगावला राजकीयदृष्ट्या आजही तितकेच महत्त्व असून, राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणून निमगावकडे पाहिले जाते.

निमगाव हे मालेगाव तालुक्याच्या कक्षेत येत असले, तरी त्याचा अंतर्भाव हा नांदगाव मतदारसंघात होतो. इथल्या 'हिरे' घराण्याचा लौने राजकारणाशिवाय समाजकारण, शिक्षण, उद्योग ही क्षेत्रेही चांगल्यापैकी गाजवली. किक अवघ्या राज्यभर आहे. या घराण्यातील तब्बल पाच जणांनी मंत्रिपदाची धुरा सांभाळली आहे. या पाच जणांपैकी स्व. भाऊसाहेब हिरे यांचे नाव एकेकाळी राज्याच्या मुख्यमंत्रिपदासाठी चर्चेत आले होते. भाऊसाहेब हिरे यांच्यासमवेत व्यंकटराव हिरे, बळीराम हिरे, पुष्पाताई हिरे आणि प्रशांत हिरे यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात यापूर्वी स्थान पटकावले आहे.

**हिरे घराण्याचा इतिहास**

नाशिक जिल्ह्याला महाराष्ट्राच्या राजकीय कॅन्व्हासवर चमकवण्याचे काम डॉ. भाऊसाहेब हिरे यांच्यामुळे झाले. पारतंत्र्याच्या काळापासून हिरे घराण्याकडे सत्तेची सूत्रे राहिली. मालेगावमधील लोकल सेल्फ गव्हर्नमेंटपासून तर राज्याच्या महसूलमंत्र्यापर्यंत डॉ. भाऊसाहेब हिरे यांनी नानाविध पदे भूषवली. नाशिक जिल्हा बँकेच्या स्थापनेसाठीही हिरे यांनीच सहभाग घेतला. भाऊसाहेब हिरे यांच्यानंतर व्यंकटराव हिरे १९६७ ते १९७२ मध्ये राज्यमंत्री राहिले. त्यानंतर व्यंकटराव हिरे यांनी चुलतभाऊ डॉ. बळीराम हिरे यांना राजकारणात उतरवले. त्यानंतर बळीराम हिरे यांनीही आरोग्यमंत्रिपद भूषवले. पुढे पुष्पाताई हिरे काँग्रेस उमेदवार झाल्या व त्यांनीही आमदारकी व परिवहन राज्यमंत्रिपद भूषविले. पुष्पाताईंचे सुपुत्र प्रशांत हिरे यांनी देखील आमदारकी व राज्यमंत्रिपद भूषवले आहे. अपूर्व हिरे हे विधान परिषदेवर आमदार झाले, तर सीमा हिरे या नाशिक पश्चिम या मतदारसंघातून आमदार झाल्या आहेत. ◂(वृत्तसंस्था)